



# जनमाध्यम


paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार १२ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४







## बेळगावमध्ये इंजिनीअरच्या घरात कोट्यवधींचं घबाड!

### 18 प्लॉट्स, लक्झरी कार, 6 किलो सोनं, 5 किलो चांदी

**बेळगाव :** कर्नाटकच्या बेळगावमध्ये एका इंजिनीअरच्या घरात अफाट संपत्ती असल्याचे उघडकीस आले आहे. सिटी डेव्हलपमेंट सेलमधील असिस्टंट एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर अजय सिंह राजपूत याच्याकडे १४ कोटी रु पयांहून अधिक बेहिशेबी मालमत्ता असल्याचे लोकायुक्त अधिका-यांनी उघड केले आहे. या अफाट संपत्तीची तपासणी करण्यासाठी पथकाला तब्बल दोन दिवस लागले.दोन दिवस चाललेल्या या कारवाईत अंजनैया नगर येथील त्याचे निवासस्थान, कार्यालय परिसर आणि बँक लाकरसह एकूण सात ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. तपासादरम्यान अधिका-यांना बेळगावमध्ये तीन घरं आणि सवदत्ती, हुबळी व हुक्केरी येथे १८ प्लॉट्स आढळले आहेत. छापेमारीत ६ किलो सोनं, ५ किलो चांदी, ३.१२ कोटी रु पये, तसेच महागड्या लक्झरी कार आणि बाईक्स जप्त करण्यात आल्या आहेत. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असून, उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांपेक्षा अधिक कमावलेल्या मालमत्तेवर अधिका-यांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे.दिल्लीमध्ये ईडीने पुन्हा एकदा मोठी कारवाई करत रिअल इस्टेट क्षेत्रातील एका मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे. अर्थ इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि त्याच्याशी संबंधित कंपन्यांशी हे प्रकरण निगडित आहे. ईडीच्या दिल्ली विभागीय कार्यालयाच्या पथकाने १० एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणी दिल्ली आणि गुरु ग्राममधील १० ठिकाणांवर एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, दागिने, सोन्याच्या विटा आणि महागडी घड्याळं जप्त करण्यात आली आहेत.



## नाशिकमध्ये अपघातानंतर पिकअपने पेट घेतला; चौघांचा होरपळून मृत्यू

**नाशिक :**सिन्नरमध्ये भीषण अपघातामध्ये चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव ट्रकने पिकअपला जोरदार धडक दिली. अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या आगीमध्ये होरपळून चौघांचा मृत्यू झाला. तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जागरण गोंधळाच्या कार्यक्रमावरून परत येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.मिळालेल्या माहितीनुसार, सिन्नर तालुक्यात पंचाळेजवळ हा भीषण अपघात झाला. ट्रक आणि पिकअपची समोरासमोर धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या अपघातामध्ये बाहेर फेकल्या गेलेल्या एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर तिघांना पिकअपमधून बाहेर पडता न आल्याने त्यांचा होरपळून मृत्यू झाला. मध्यरात्री या अपघाताची माहिती मिळताच सिन्नरच्या रु ग्णवाहिका, सिन्नर नगरपालिकेचे अग्निशमन दल, एमआयडीसीचे अग्निशमन दल आणि एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मध्यरात्री मदतकार्य केले. या अपघातामध्ये जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी सिन्नर येथील उपजिल्हा रु ग्णालयात हलवण्यात आले. अपघातामध्ये मृत्यू झालेले चौघे जण सिन्नर तालुक्यातील पंचाळे गावातील रहिवासी होते. मृतांवर शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आले.

## सोन्याच्या दरात पुन्हा उसळी

**जळगाव :** आखाती देशात इराण-अमेरिकेने जाहीर केलेल्या शस्त्रसंधीमुळे आंतरराष्ट्रीय बाजार पुन्हा रु ळावर येउ लागले आहेत. सराफा बाजारातही सोने आणि चांदीच्या दरात वाढ झाली आहे. मुंबई, पुणे आणि दिल्लीतील बाजारात सोन्याच्या दरात वाढ झाली आहे. सोन्याचे दर शनिवारी दीड लाखाच्या घरात पोहोचले आहेत. ऐन लग्नसराईत सोन्याचे भाव वाढल्याने ग्राहकांचे टेन्शन वाढल्याचे पाहायला मिळत आहे.मुंबईत आज २४ कॅरेट सोन्याच्या दरात प्रति तोळा ४९० रु पयांनी वाढ झाली आहे. तर चांदी प्रति किलो २,६०,००० रु पयांवर पोहोचली आहे. २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळा ४९० रु पयांनी वाढल्याने भाव १,५२,८४० रु पयांवर पोहोचला आहे. तर २२ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा १,४०,१०० रु पयांवर पोहोचला आहे.१८ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा १,१४,६३० रु पयांवर पोहोचला आहे. मुंबईसह देशभरातील सराफा बाजारात सोन्याचे दर वधारल्याचे समोर आले आहे. मुंबईतील सराफा बाजारात सलग दोन दिवस सोन्याचे दर वाढल्याचे दिसून आले. ऐन लग्नसराईत सोन्याचा दर वाढल्याने ग्राहक आणि गुंतवणूकदारांना जादा दर मोजावा लागणार आहे. तत्पूर्वी, इराण-अमेरिकेमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे सोन्याच्या दरात चढ-उतार पाहायला मिळत आहे. दोन्ही देशांतील वाद मिटल्यास त्याचा थेट परिणाम सोन्याच्या दरावर होण्याची शक्यता आहे. युद्धकाळात सोन्यात गुंतवणूक करणे सुरक्षित मानले जाते. त्यामुळे अनेक गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. त्यामुळे युद्ध सुरू राहिल्यास सोन्याचे दर १ लाख ८० हजारांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.



## श्वसन आणि हृदयविकाराच्या त्रासामुळे आशा भोसले रुग्णालयात दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रख्यात गायिका आशा भोसले यांना हृदय आणि श्वसनाशी संबंधित त्रास जाणवू लागल्यामुळे शनिवारी ब्रीच कँडी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. ९२ वर्षीय भोसले यांची प्रकृती गेल्या काही महिन्यांपासून ठीक नव्हती. रु ग्णालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आशा भोसले यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.या ज्येष्ठ गायिकेच्या रु ग्णालयातील प्रवेशाबाबत त्यांच्या कुटुंबीयांनी अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. त्यांच्या आरोग्याविषयी आणि सध्याच्या स्थितीविषयीच्या अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे.



आशा भोसले या हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी गायकांपैकी एक म्हणून ओळखल्या जातात. आठ दशकांहून अधिक काळ चाललेल्या त्यांच्या कारकिर्दीत, त्यांनी अनेक भारतीय भाषांमधील चित्रपट आणि अल्बमसाठी गाणी रेकार्ड केली असून विविध पुरस्कारही प्राप्त केले आहेत. त्यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कारा'नेही सन्मानित करण्यात आले आहे. २००८ मध्ये, त्यांना देशातील दुस-या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या 'पद्मविभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले होते. या गायिकेने 'दिल चीज़ क्या है', 'इन आँखों की मस्ती के', 'ये क्या जगह है दोस्तों', 'जब भी मिलती है' आणि 'जुस्तजू जिसकी थी' यांसारखी अनेक गाजलेली (चार्टबस्टर्स) गाणी गायली आहेत. २०२३ मध्ये 'हिंदुस्तान टाइम्स'शी साधलेल्या संवादात, या गायिकेने समकालीन संगीत क्षेत्रातील परिस्थितीवर आपले विचार मांडले होते. ती म्हणाली, 'खरं सांगायचं तर, मी आजकालची गाणी ऐकतच नाही. जर मला गाणी ऐकायचीच असतील, तर मी (दिवंगत गायक) भीमसेन जोशी यांची गाणी, शास्त्रीय संगीत आणि गझला ऐकते; कारण त्यातून मला काहीतरी शिकायला मिळते आणि त्याच वेळी, माझ्या गायनाचा सराव होउन त्यात अधिक निखार आणता येतो.

## हात जोडून स्वागत, त्यानंतर संवाद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केरळ, बंगाल आणि आसामसह पाच राज्यांमधील निवडणुकीच्या लढाईमुळे राजकीय वातावरण तापत आहे. भारतीय राजकारणात आज एक अत्यंत विशेष क्षण आला, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी अचानक समोरासमोर आले. राहुल गांधींनी हात जोडून पंतप्रधानांचे स्वागत केले. पंतप्रधान मोदींनीही हात जोडून त्यांचे स्वागत स्वीकारले. इतकेच नाही, तर त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला.

आज महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती आहे. या निमित्ताने संसद परिसरातील प्रेरणा स्थळ येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे खासदार, तसेच लोकसभा अध्यक्षांसह अनेक राजकीय दिग्गज उपस्थित होते. या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची भेट झाली.

**पंतप्रधान मोदींनी पुष्पहार अर्पण केला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद परिसरातील 'प्रेरणा स्थळ' येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल, राज्यसभेचे माजी उपसभापती हरिवंश आणि इतर राजकीय दिग्गजही उपस्थित होते. मोदी यांनी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहताना म्हटले की, त्यांचे जीवन समानता, न्याय आणि शिक्षण या आदर्शांना समर्पित होते. फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी महाराष्ट्रात झाला आणि २८ नोव्हेंबर १८९० रोजी त्यांचे निधन झाले.

***या प्रसंगी पंतप्रधान काय म्हणाले?***

पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्टमध्ये म्हटले आहे, 'महान समाजसुधारक महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती सोहळ्याला सुरुवात होत आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण, ज्ञान आणि लोककल्याणासाठी समर्पित केले. ते महिला आणि वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे अग्रणी होते. त्यांचे विचार सर्वांना सामाजिक प्रगतीच्या दिशेने मार्गदर्शन करत राहोत.' ते म्हणाले की, फुले यांच्या प्रयत्नांमुळे शिक्षण हे सक्षमीकरणाचे एक शक्तिशाली साधन बनले.



## वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी-खा.शरद पवार

**मुंबई/प्रतिनिधी :**'वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोाकांची घुसखोरी झाली आहे. वारकरी संप्रदायात ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी आहे', असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. शासकीय महिला अधिका-यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली आहे. या स्मरणिकेतील मुलाखतीत शरद पवार त्यांनी वारकरी संप्रदायाबद्दल भाष्य केले आहे.



शरद पवार भूमिका मांडताना म्हणाले, 'वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीतही हे प्रतिगामी लोक घुसखोरी करू लागले आहेत. वारकरी संप्रदायात ६० टक्के लोक हे बोलताना धर्मांध शक्तींना अधिक बळ मिळेल, अशा पद्धतीने मांडणी करतात.'पवार पुढे म्हणाले की, 'म्हणून आम्ही यादी करायला सुरुवात केली आहे. आता साधारणत? चाळीस लोक असे आहेत की ते वारकरी संप्रदायामध्ये कीर्तन आणि प्रवचन यामधून पुरोगामी भूमिका मांडत असतात. त्यांची अत्यंत गरज आहे. दुर्दैवाने प्रबोधनाच्या या मार्गावर महिला कुठे दिसत नाहीत', अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

**शरद पवार सत्य बोलले, अमोल मिटकरींची भूमिका**

आमदार अमोल मिटकरी म्हणाले की, 'शरद पवार काय चुकीचे बोलले आहेत? त्यांनी मांडलेले विचार सत्य आहेत. पवार यांनी मांडलेल्या ६० टक्के आकडेवारीपेक्षा ही संख्या अधिक आहे. शरद पवारांवर टीका करणारे काही तथाकथित महाजांनी जेव्हा अल्पवयीन मुलींवर अत्याचार केले, तेव्हा शांत का होते?', असा सवाल मिटकरींनी केला आहे. 'गेल्या तीन महिन्यांत लिंगपिसाट अशोक खरात नावाच्या धर्मबुडव्याला जेव्हा पांडुरंगाची उपमा दिली गेली, तेव्हा वाईट न वाटणारे आता ओरडत आहेत. अहिल्यानगरमधील पारनेरमध्ये दुर्गादेवी वारकरी संस्थेचा गुंजाळ महाराज, ज्याने १७ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केले. तेव्हा आंदोलन न करणारे आता कसे बोलतात?', असा सवाल मिटकरींनी केला. 'आळंदीमध्ये खासगी वारकरी शिक्षण संस्थेत मुलीला डांबून ठेवून अत्याचार केले गेले. तेव्हा शांत बसणारे, जे कथित प्रतिगामी आहेत त्यांची टक्केवारी शरद पवार यांनी मांडली आहे, ती ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे अध्यात्मिक आचार्याला उप बडवायची काही गरज नाही', असे मिटकरी म्हणाले.

## लैंगिक अत्याचार, धर्मांतर प्रकरणानंतर नाशिकमधील कंपनीला टाळे

### कर्मचा-यांना मुंबई-पुण्यात शिफ्ट करणार

**नाशिक /प्रतिनिधी :** लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणानंतर नाशिकमधील नामांकित कंपनीला टाळं लागणार आहे. कंपनीमधील कर्मचा-यांना आता मुंबई, पुण्यातील इतर प्रोजेक्टमध्ये शिफ्ट केलं जाणार असल्याची माहिती आहे. नाशिकमधील धर्मांतर प्रकरण उघडकीस आल्यानंतर कर्मचा-यांना नाशिक युनिटमध्ये जाण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचा-यांना एकतर मुंबई-पुण्याला स्थलांतरित व्हावं लागणार आहे किंवा नवीन नोकरी शोधावी लागणार आहे. नाशिकमधील एका कंपनीमधील लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणानंतर देशभर खळबळ उडाल्याचं चित्र आहे. त्यामुळे या कंपनीने आता नाशिकमधील त्यांचं युनिटच बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कंपनीतील कर्मचा-यांवर एकतर मुंबई-पुण्यात स्थलांतरित होण्याची किंवा बेरोजगारी टाळण्यासाठी नविन नोकरी शोधण्याची वेळ आली आहे. सध्या या कंपनीमध्ये पोलीस तपासाच्या कारणास्तव मोजकेच कर्मचारी येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या घटनेचा तपास करण्यासाठी नाशिक पोलिसांनी एसआयटी स्थापन केली आहे. कागदपत्रांची तपासणी तसेच इतर माध्यमातून पोलिसाची चौकशी सुरू आहे. कंपनीच्या आवारात काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

**मोठं रॅकेट असल्याचा संशय**

नाशिकमधील नामांकित आयटी कंपनीतील महिला कर्मचा-यांचं लैंगिक शोषण आणि धर्मांतरण प्रकरणाचा तपास केंद्रीय यंत्रणांकडून होण्याची शक्यता आहे. एनआयए, एटीएस आणि सीबीआय या प्रकरणाचा तपास करण्याची शक्यता आहे. SIT कडून प्रकरणाची महत्वाची माहिती तिन्ही तपास यंत्रणांना कळवण्यात आली आहे. लैंगिक शोषण ➩(पान २ वर)

## नारायण राणे म्हणजे मोजमाप न ठेवणारा दिलदार माणूस

### फडणवीसांकडून स्तुतीसुमने, ७४ वा वाढदिवस साजरा


सिंधुदुर्ग/**प्रतिनिधी :** नारायण राणे म्हणजे मोजमाप न ठेवणारा दिलदार माणूस, त्यांच्या कामामुळे प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्यांना मानणारा वर्ग तयार झाला, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी भाजपचे खासदार नारायण राणे यांचे कौतुक केलं. नारायण राणे यांच्यात हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार असल्याने त्यांनी हिंदुत्व आणि मराठी माणसाचा विचार सोडला नाही, असंही मुख्यमंत्री म्हणाले. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि खासदार नारायण राणे यांचा ७४ वा वाढदिवस सिंधुदुर्गात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह भाजपचे अनेक नेते उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात नारायण राणेंसोबत काम करताना मिळालेल्या अनुभवांची आठवण सांगितली. मी सभागृहात पहिल्यांदा भाषण केलं, तेव्हा राणेंनी पाठवलेली छान बोललास ही चिठ्ठी आजही आठवते, असे ते म्हणाले. त्यांनी पुढं सांगितलं की, नारायण राणे आणि गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत काम करणे ही मोठी संधी होती. दोन्ही नेत्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले.



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नारायण राणेंची अर्थसंकल्पावरची पकड विलक्षण होती. ते एखाद्या अर्थतज्ज्ञाप्रमाणे बजेटवर बोलायचे. युती सरकारच्या काळात झालेल्या कामाची काँग्रेस सरकारने श्वेत पत्रिका काढल्यानंतर नारायण राणेंनी त्यावर भगवी पत्रिका मांडत सरकारची जोरदार बाजू मांडली होती, याची आठवणही त्यांनी करून दिली.➩(पान २ वर)

## रस्ते अपघातात 13 जणांचा मृत्यू, 32 जखमी

### ■ मृतांमध्ये एकाच कुटुंबातील 5 लोक ■ बसने पिकअपला उडवले ■ रस्त्यावर मृतदेह विखुरले





**कटिहार/वृत्तसंस्था :** बिहारच्या कटिहारमध्ये शनिवारी संध्याकाळी बस आणि पिकअपच्या धडकेत १३ लोकांचा मृत्यू झाला आहे. यात एकाच कुटुंबातील ५ लोकांचा समावेश आहे. मृतकांमध्ये १० महिला, २ पुरुष आणि एक लहान मुलगी आहे. तर, या अपघातात ३२ पेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत.हा अपघात कटिहारच्या कोढा ब्लॉकमधील NH-31 वर झाला. अपघातानंतर रस्त्यावर मृतदेह विखुरले होते.

अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. माहिती मिळाल्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि ३२ जखमींना रु ग्णालयात दाखल केले. यातील ३१ जखमींची प्रकृती गंभीर आहे.या अपघातावर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दुःख व्यक्तकेले आहे. त्याचबरोबर मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २-२ लाख रु पये, तर जखमींना प्रत्येकी ५०-५० हजार रु पये देण्याचे आदेश दिले आहेत.अपघातानंतर बसचा चालक स्टिअरिंगमध्ये अडकला. चालकाचा पुढचा भाग दाबला गेला होता, तो लोकांनी रॉडने सरळ केला. यानंतर चालकाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, भरधाव बसने आधी दोन दुचाकीस्वारांना चिरडले. यानंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात पिकअपला धडक दिली. अपघातानंतर स्थानिक लोक आणि पोलिसांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून रु ग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी पूर्णिया जीएमसीमध्ये रेफर करण्यात आले, जिथे अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. माहिती मिळताच कोढा पोलिस आणि प्रशासन घटनास्थळी पोहोचले. बचावकार्य सुरू करण्यात आले, क्रेनच्या मदतीने वाहने हटवून रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यात आली.


**जखमींना रु ग्णालयात दाखल करण्यात आले-** पोलिसांनी सांगितले की, शनिवारी संध्याकाळी बस आणि पिकअपची धडक झाली आहे. जखमींना तात्काळ रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर कटिहारचे एसपी शिखर चौधरीही घटनास्थळी पोहोचले. त्यांनी सांगितले की, हा अपघात कटिहारच्या कोढा ब्लाकमधील NH-31 वर झाला. जखमींना जवळच्या सरकारी रु ग्णालयात नेण्यात आले आहे. मृतांची संख्या १३ पेक्षा वाढू शकते.

## मतदान करण्याचा आणि निवडणूक लढवण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार नाही-सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मतदान करण्याचा आणि निवडणूक लढवण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार नाही, तर तो कायद्याने दिलेला अधिकार आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे. राजस्थानमधील जिल्हा दुग्ध संघाच्या निवडणुकीशी संबंधित प्रकरणावर सुनावणी करताना न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठानं हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. न्यायालयानं स्पष्ट केलं की, मतदान आणि निवडणूक लढवण्याचे अधिकार हे पूर्णपणे वेगवेगळे असून त्यांना समान मानणं चुकीचं आहे. या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेबाबत सुरू असलेल्या चर्चांना नवं वळण मिळालं आहे.



सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं की, मतदानाचा अधिकार नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देतो. मात्र निवडणूक लढवण्याचा अधिकार हा अतिरिक्त असून त्यावर विविध अटी आणि पात्रता लागू करता येतात. त्यामुळे दोन्ही अधिकार एकसारखे नाहीत, हे स्पष्ट करण्यात आलं. न्यायालयानं यापूर्वीच्या ज्योती बसू विरुद्ध देवी घोषाल (१९८२) आणि जावेद विरुद्ध हरियाणा राज्य (२००३) या निर्णयांचा दाखला देत हे अधिकार केवळ कायद्याने दिलेले असल्याचं सांगितलं. संविधानातील मूलभूत अधिकारांमध्ये त्यांचा समावेश होत नाही, असंही स्पष्ट केलं.➩(पान २ वर)



### इराणी चलनाचे मूल्य घसरले

## अंडे सव्वा लाखाला एक.. दूध प्रतिलिटर 8 लाख रुपये!

**तेहरान/ वृत्तसंस्था-**अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला धमकी दिली की, तुम्हाला पाषाण युगात पाठवीन. आता त्यापेक्षाही भयानक अवस्था इराणमध्ये आहे. तिथे एका अंड्याचा भाव सव्वालाख रु पये तर एक लिटर दुधासाठी ८ लाख रु पये मोजावे लागत आहेत. भारतात साधारण एका अंड्याचा भाव ८ ते ९ रु पये आहे. एक लिटर दूध ५५ ते ५६ रु पयांना मिळते. इराणमध्ये एक डझन अंड्याचा दर १५ लाख रियाल पर्यंत जाउन पोहोचला आहे. एक लिटर दुधाची किंमत ८ लाख रु पयांपर्यंत आहे. एक किलो तांदळाचा भाव ३२ लाख रियाल आहे. १ किलो मटण ➩(पान २ वर)




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३५ ■ रविवार, १२ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## खानवडीत 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' उद्घाटन

### -महिलांना लोकसभेत आणि विधानसभेत आरक्षण देण्याचा निर्णय हे महात्मा फुले यांना खरे अभिवादन-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे । जनमाध्यम :** महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे उभारण्यात आलेल्या 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळे'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी त्यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय हा महात्मा फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना दिलेली खरी आदरांजली असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महात्मा फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही आधुनिक शाळा द्विशताब्दी वर्षाची योग्य सुरुवात ठरत आहे. सीबीएसई पद्धतीवर आधारित इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार, आधुनिक व आंतरराष्ट्रीय पातळीवरील शिक्षण उपलब्ध करून देण्याचा हा महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता निर्माण होत असून काही विद्यार्थिनी इस्त्रो व नासासारख्या संस्थांपर्यंत पोहोचल्याचे उदाहरण त्यांनी दिले.

या कार्यक्रमास अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुणे जिल्हा परिषदेकडून 'इंडस्ट्री ४.०' अंतर्गत शाळांमध्ये आधुनिक प्रयोगशाळा उभारण्याचे काम सुरू असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. महात्मा फुले यांच्या नावाने राज्यात एक हजार कौशल्य विकास केंद्रे उभारण्याची घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. या माध्यमातून युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यावर भर दिला जाणार आहे.

महात्मा ज्योतिराव फुले हे दूरदृष्टीचे समाजसुधारक, प्रगतशील शेतकरी आणि विचारवंत होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने देशातील पहिली मुलींची शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाचा पाया रचला. समाजातील अन्यायकारक प्रथा, अंधश्रद्धा आणि विषमता याविरोधात त्यांनी लढा देत समतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत राज्य शासन 'महात्मा फुले जनआरोग्य योजना'सारख्या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपत आहे. खानवडी येथे सुमारे १२ एकर परिसरात उभारण्यात आलेल्या या शाळेत अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या, क्रीडा सुविधा तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय करण्यात येत आहे. गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. या शाळेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे नवे दालन खुले होणार असून महात्मा फुले यांच्या शिक्षणविचारांना प्रत्यक्ष स्वरूप मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दुरंतो एक्सप्रेसला वर्धा स्थानकावर १५ पासून प्रायोगिक थांबा



**वर्धा जनमाध्यम :** प्रवाशांसाठी दिलासादायक निर्णय घेत भारतीय रेल्वे प्रशासनाने गाडी क्र. १२२८९/९० मुंबई-नागपूर दुरंतो एक्सप्रेस ला वर्धा स्थानकावर प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वे मंत्रालय व रेल्वे बोर्डाच्या निर्देशानुसार हा निर्णय अमलात आणण्यात येत असून, १५ एप्रिल पासून तो लागू होणार आहे.

नवीन वेळापत्रकानुसार, नागपूरहून मुंबईकडे जाणारी १२२९० दुरंतो एक्सप्रेस रात्री सुमारे २०:४४ वाजता ( ८,४४) पोहोचेल आणि २०:४५ वाजता (८.४५) पुढे रवाना होईल.

तर मुंबईहून नागपूरकडे जाणारी १२२८९ दुरंतो एक्सप्रेस वर्धा येथे सकाळी अंदाजे ०६:५७ ते ०६:५८ दरम्यान वर्धा स्थानकावर थांबेल.

या निर्णयामुळे वर्धा, वरोरा, चंद्रपुर, वणी, या परिसरातील प्रवाशांना मुंबई-नागपूरदरम्यान जलद प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. विशेषतः दुरंतो ही प्रीमियम व कमी थांबे असलेली गाडी असल्याने तिचा थांबा मिळणे हे वर्ध्यासाठी महत्त्वाचे मानले जात आहे. दरम्यान, रेल्वे प्रशासनाने संबंधित विभागांना सुधारित वेळा आरक्षण प्रणालीत समाविष्ट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच प्रवाशांच्या माहितीसाठी स्थानकांवर घोषणा व प्रसिद्धी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रायोगिक तत्त्वावर देण्यात आलेल्या या थांब्याला प्रवाशांचा प्रतिसाद कसा मिळतो, यावर पुढील निर्णय अवलंबून राहणार आहे. त्यामुळे वर्धा स्थानकासाठी हा निर्णय दीर्घकालीन ठरतो का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### खा.अमर काळे दाखविणार दुरंतोला हिरवी झेंडी

रेल्वे प्रवाशांसाठी दिलासादायक घडामोड म्हणून दुरंतो एक्सप्रेसला वर्धा स्थानकावर थांबा मिळाला असून बुधवारी (१५ रोजी) रात्री ८.४४ वाजता गाडीला पहिल्यांदाच हिरवी झेंडी दाखवली जाणार आहे. या कार्यक्रमाला खासदार अमर काळे उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते गाडीचे प्रस्थान होणार आहे.

## सागवानाला भीषण आग; क्षणात पाच लाखांची राख



**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील खडकी येथील शेतकरी मोहम्मद रियाज रशीद मुसानी यांच्या शेतातील सागवान झाडांना दुपारी सुमारे १.३० वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत सुमारे पाच लाख रुपयांचे सागवान जळून खाक झाले असून शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आग कशी लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. धगधगत्या ज्वाळांमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच खडकी येथील समाजसेवक माणिक देडे व त्यांचे वडील खंडोजी देडे यांनी तातडीने शेताकडे धाव घेतली. त्यांनी पाण्याच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र आगीची तीव्रता वाढत गेल्याने त्यांच्या प्रयत्नांना मर्यादा आल्या.

दरम्यान, अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होताच फायरमन हर्षल गोरखे, संदीप शिर्के व सहाय्यक फायरमन प्रमोद रहांगडाले यांनी तातडीने कारवाई करत आगीवर नियंत्रण मिळवले.या घटनेमुळे शेतकरी मुसानी यांच्यावर आर्थिक संकट कोसळले असून पंचनामा करून शासनाकडून तातडीची मदत देण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

## जाम येथे वैद्यकीय महाविद्यालयासाठी निधीत ७६ कोटींची वाढ; भूमिपूजन लवकरच

**समुद्रपूर जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील जाम येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी मंजूर निधीत तब्बल ७६ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली असून, एकूण निधी आता ४७६ कोटींवर पोहोचला आहे. हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार यांच्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय झाला.

सुरुवातीला या प्रकल्पासाठी सुमारे ४०० कोटींचा निधी प्रस्तावित होता. मात्र, वाढत्या गरजा आणि अत्याधुनिक सुविधा लक्षात घेऊन अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली होती. नुकत्याच झालेल्या हायपॉवर कमिटीच्या बैठकीत ही मागणी मान्य करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महाविद्यालयाचे लवकरच भूमिपूजन होणार असून, त्यामुळे प्रकल्पाला गती मिळणार आहे. हिंगणघाट शहरात जागेअभावी जाम येथील कृषी विभागाची जागा निवडण्यात आली. आ. कुणावार यांनी या महाविद्यालयासाठी सातत्याने पाठपुरावा करत अधिवेशनात आंदोलनही केले होते. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत आता अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## मोबाईलच्या किरकोळ वादातून तरुणाची हत्या

### सेलू हादरले, दुसऱ्या साथीदाराचा शोध सुरू



**सेलू जनमाध्यम :** एका किरकोळ मोबाईल हिसकावण्याच्या वादाने भीषण वळण घेत तरुणाच्या खुनापर्यंत मजल गेल्याने सेलू परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. बेलगाव येथील प्रवीण योगीराज राऊत (वय २०) हा तरुण अचानक बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली होती.

१० एप्रिल रोजी तक्रार दाखल होताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयाच्या आधारे सूरज रमेश ढगे याला ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, मोबाईल हिसकावण्याच्या किरकोळ वादातून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संतापाच्या भरात आरोपीने दगडाने प्रवीणवर हल्ला केला. यात त्याचा जागीच मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेनंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने मृतदेह विश्रामगृहाच्या मागील डोहात फेकून दिल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकातील अमलदार अखिलेश गव्हाणे, मनोहर मुडे, सचिन वाटखेडे, विनायक गोडे यांनी ही कारवाई केली. तसेच फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट देऊन महत्त्वाचे पुरावे गोळा केले आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रीतम निमगडे करीत आहेत.

दरम्यान, या गुन्ह्यात आणखी एका व्यक्तीचा सहभाग असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून लवकरच संपूर्ण कट उघडकीस येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## रायजा टाउन रस्ता राजकीय अनास्थेचा बळी

### ग्रा.पं.चे साफ दुर्लक्ष, पालकमंत्री यांनाही दिले तीनदा निवेदन



**वर्धा जनमाध्यम:** पिपरी (मेघे) ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या जुनापाणी चौकालगत स्थित रायजा टाउन आणि परिसरातील वस्त्यांकरिता असलेला प्रमुख मार्ग राजकीय अनास्थेचा बळी ठरला आहे. हा डांबरी रस्ता पूर्णतः उखडला असून, त्यावरून मार्गक्रमण करणे धोकादायक ठरत आहे. स्थानिक रहिवाशांनी वारंवार निवेदन दिल्यावरही लोकप्रतिनिधींनी कोणतीच दखल घेतलेली नाही.

रायजा टाउन आणि इतर वस्त्यांकडे घेऊन जाणारा हा रस्ता सावंगी बायपास रोडशी येऊन मिळतो. स्थानिक रहिवाशांना वस्तीतून येण्या-जाण्याकरिता हाच एकमेव मार्ग आहे. हा रस्ता आधीच निमुळता आहे. त्यात दोन्हीकडच्या नाल्यांचे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे या दोन्ही नाल्या नागमोडी वळणाच्या आणि कुठे उंच, कुठे सखल झाल्या आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी सांडपाणी साचून आहे.

सुमारे १६ वर्षांपूर्वी या अरुंद रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. गेल्या पाच वर्षांपासून हा रस्ता मोठ्या प्रमाणात उखडायला सुरुवात झाली. त्यावर उपाय म्हणून पिपरी ग्रा.पं.ने मुरुम आणि चुरी टाकली. मात्र, काही दिवसांतच चुरीचा थर दुचाकीचालकांसाठी धोकादायक ठरू लागला. याबाबत पिपरी (मेघे)च्या सरपंच वैशाली गौळकार, त्यांचे पती माजी सरपंच अजय गौळकार, स्थानिक सदस्य यांच्याकडे रहिवाशांनी तक्रार केली. मात्र, त्यांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना भेटा, असा सल्ला दिला. परंतु, यातून मागील दीड वर्षांत काहीच निष्पन्न न झाल्याने स्थानिक रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

### मागणी बेदखल केल्याचा रहिवाशांत रोष

रायजा टाउन येथील रहिवाशांनी अजय गौळकार यांच्या उपस्थितीत पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना तीनदा निवेदन दिले. त्यांना रस्ता आणि दोन्ही बाजूच्या नाल्या बांधून देण्याची विनंती केली. तिसऱ्यांदा निवेदन दिले तेव्हा या रस्त्याला क्रमांक नसल्याने टप्प्याटप्प्याने बांधावे लागेल, असे सांगण्यात आले. प्रत्यक्षात ना रस्त्याचा अर्धा भाग बांधून देण्याबाबत, ना दोन्हीकडील नाल्या बांधून देण्याविषयी हालचाली झाल्या. या गंभीर प्रश्नाला बेदखल करण्यात आल्याचा रोष रहिवाशांनी व्यक्त केला आहे.

## महात्मा फुले विचारांचा युवांमध्ये संस्कार हवा - प्रा.डॉ.प्रभाकर ढाले



**देवळी जनमाध्यम :** समाजातील अनिष्ट चालीरीती, अन्यायकारक परंपरा आजही ठामपणे टिकून असल्याने सुजाण नागरिकांनी त्याविरोधात ठामपणे उभे राहणे गरजेचे आहे. त्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार युवा पिढीमध्ये रुजवणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रभाकर ढाले यांनी केले.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी एनसीसी भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते एनसीसी छात्र सैनिकांशी संवाद साधत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीही प्रा. डॉ. प्रभाकर ढाले होते. प्रमुख अतिथी म्हणून एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, प्रा. जगदीश यावले, प्रा. नरेंद्र डेबे, प्रा. हर्षदीप वासेकर, प्रा. स्वाती पातुरकर आदी प्राध्यापक उपस्थित होते.

एनसीसी विभाग व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. यावेळी इतिहास विषयाच्या प्राध्यापिका वंदना मुनेश्वर यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या सामाजिक सुधारणा, स्त्री शिक्षण आणि समतेच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका वंदना तलमले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार, सार्जंट वैष्णवी कन्नाके, साक्षी पारीसे, सलोनी अजमीरे, कुंदन कावडे तसेच एनसीसी छात्र सैनिकांनी परिश्रम घेतले.

## वर्धा-कळंब रेल्वेचा खेळखंडोबा

### -वेळापत्रकाचा 'तमाशा' अन् प्रवाशांची फरफट

**वर्धा रवींद्र लाखो :** विकासाच्या गप्पा मारणाऱ्या रेल्वे प्रशासनाचा वर्धा–कळंब मार्गावर मात्र पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. तब्बल पंधरा वर्षे रखडलेला वर्धा–नांदेड रेल्वे मार्ग अजूनही अपूर्ण असताना, केवळ कळंबपर्यंतचे काम उरकून श्रेय लाटण्याच्या नादात सुरू करण्यात आलेली रेल्वे आज अक्षरशः अपयशी ठरत आहे.

वर्षांपूर्वी मोठ्या गाजावाजात वर्धा–नांदेड रेल्वे मार्गाचा शुभारंभ झाला आणि कामाला संथ गतीने सुरुवात झाली. मात्र पंधरा वर्षे उलटूनही मार्ग पूर्णत्वास गेलेला नाही. केवळ वर्धा ते कळंब इतकाच टप्पा पूर्ण झाला असताना, माजी खासदाराने श्रेय घेण्यासाठी या मार्गावर रेल्वे सुरू करण्याचा घाट घातला. मोठ्या थाटामाटात उद्घाटन झाले, पण प्रत्यक्षात या रेल्वेचे 'बारा' वाजल्याचेच चित्र आज दिसत आहे.

पूर्वी आठ डब्यांची धावणारी गाडी आता चार डब्यांवर आली, तरीही प्रवाशांचा पत्ता नाही. कारण स्पष्ट आहे, अव्यवस्थित आणि गोंधळलेले वेळापत्रक! सोमवार, गुरुवार, शुक्रवारच गाडी चालते; मंगळवारी आली की वर्ध्यातच थांबते; बुधवारी जाते पण परत येत नाही, शनिवारी बडनेराला वॉशिंगसाठी पळते, आणि रविवारी पुन्हा कळंबकडे रवाना होते. हा नेमका रेल्वेचा कारभार आहे की एखादा विनोदी प्रयोग, असा प्रश्न नागरिक करत आहेत.

प्रवाशांची अवस्था मात्र बिकट झाली आहे. वेळेवर गाडी नाही, खात्रीचा प्रवास नाही मग नागरिकांनी रेल्वेकडे का वळावे, आधी सेवा द्या, मग प्रवासी मिळतील, असा थेट टोला स्थानिकांकडून लगावला जात आहे.



यापूर्वीही या गोंधळावर आवाज उठवण्यात आला; मात्र रेल्वे प्रशासनाने कानावर हात ठेवत नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष केले. जनतेच्या पैशातून उभारलेला प्रकल्प आणि उपयोग मात्र शून्य हा विकासाचा नमुना की निष्काळजीपणाचा कळस,

वर्धा–कळंब मार्गावरील नागरिक आता संतापले आहेत. रेल्वे सुरळीत चालवा, अन्यथा बंद करा, असा इशारा त्यांनी दिला आहे. आता तरी रेल्वे प्रशासन जागे होणार का, की श्रेयाच्या राजकारणातच गाड्या अडकून राहणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**कळंब रेल्वे मार्गाबाबत**

### पर्यायी जोडणीची मागणी

**-नागपूर/बडनेरा जोडणीची मागणी**

**वर्धा–**कळंब रेल्वे प्रकल्पाच्या रखडलेल्या कामामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, या पार्श्वभूमीवर पर्यायी मार्गाची मागणी जोर धरू लागली आहे. सध्याच्या वर्धा–कळंब मार्गाऐवजी कळंब–नागपूर किंवा कळंब–बडनेरा असा रेल्वे मार्ग विकसित करण्याचा पर्याय पुढे येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरू असून अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. परिणामी, अपेक्षित प्रवासी वाहतूक आणि आर्थिक लाभ मिळण्यात अडथळे येत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळेच या मार्गाच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, कळंब–नागपूर मार्ग झाल्यास विदर्भातील प्रमुख शहराशी थेट संपर्क प्रस्थापित होईल, ज्यामुळे प्रवास सुलभ होण्यास मदत होईल. तसेच कळंब–बडनेरा मार्गामुळे अमरावती विभागाशी रेल्वे जोडणी मजबूत होऊन व्यापारी हालचालींना चालना मिळू शकते. दरम्यान, या मागणीमुळे रेल्वे विभागाने प्रकल्पाच्या व्यवहार्यता आणि भविष्यातील फायद्यांचा पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे. नागरिकांकडूनही लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# समाजातील सर्वच घटकांस विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न-सामाजिक न्याय मंत्री शिरसाट

## हिंगणघाट येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरण, सौंदर्यीकरण कामाचे लोकार्पण





**वर्धा, दि.११ (जिमाका) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आदर्श आणि आपल्या हक्काची जाणीव करुन देउन प्रत्येकाला विकास प्रक्रियेत आणण्याठी व त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी राज्य शासन कटीबध्द आहे. त्यादृष्टीने विविध विकासकामे राबवून राज्य शासन काम करीत आहे, असे प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांनी केले.

हिंगणघाट येथे नगर परिषदेच्यावतीने जिल्हा वार्षिकच्या नाविण्यपूर्ण योजनेतून १ कोटी रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण व परीसराच्या सौंदर्यीकरण कामाचे लोकार्पण श्री.सिरसाट यांच्याहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून खासदार अमर काळे, आमदार समीर कुणावार, नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर, उपाध्यक्ष निलेश ठोंबरे, नगर परिषदेचे बांधकाम सभापती वामन मावळे, मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे, छत्रपती संभाजीनगरचे माजी महापौर विकास जैन, विद्याताई सोमकुंवर, विजय तामगाडगे उपस्थिते होते.

राज्य शासनाच्यावतीने समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करण्यासाठी भरीव निधीची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. महाड येथील चवदार तळ्याच्या विकास कामासाठी ५६ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला. दादर येथील चैत्यभूमीचा विकास करण्यासाठी ५०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. महाराष्ट्रातून अनेक बौध्द बांधव बौध्दगया येथे जात असतात, तेथे त्यांच्या राहण्याची सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने १० एकर जागा खरेदी करणयात येणार आहे. यासाठी लवकरच बिहारच्या मुख्यमंर्त्यांशी चर्चा करुन जमीन खरेदीची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे मंत्री संजय शिरसाट म्हणाले.

मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेंतर्गत पुढील महिन्यात बौद्धगया येथील दर्शनासाठी भाविकांसाठी विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे. प्रवासासह सर्व सुविधा राज्य शासनाच्यावतीने मोफत दिल्या जाणार आहे. त्यामुळे या योजनेचा बौध्द बांधवांनी लाभ घ्यावा, असेही आवाहन यावेळी श्री.शिरसाट यांनी केले. राज्य शासनाच्यावतीने विविध कल्याणकारी योजना राबवित असतांना मागासवर्गीस समाजातील लोकांना केंद्रबिंदू ठेवून सामाजिक न्याय विभागासाठी अर्थसंकल्पात १२०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ५० कोटी रुपये वसतीगृहाच्या निर्मितीवर खर्च करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले. हिंगणघाट येथील पुतळा सौंदर्यीकरणाच्या उर्वरीत कामासाठी १ कोटी रुपये मंजूर करण्यात येत असल्याचेही ते पुढे बोलतांना म्हणाले. देशात ठिकठिकाणी महापुरुषांचे पुतळे मोठ्या प्रमाणावर आहेत. महापुरुषांचे पुतळे केवळ जयंती व पुण्यतिनिमित्त अभिवादन करण्यासाठी मर्यादित न ठेवता त्यांचे विचार सदैव आचरणात आणण्याची गरज आहे. बाबासाहेबांनी दिलेला मंत्र शिकाल तर वाचाल या विचाराप्रमाणे गाव तिथे वाचनालय व अभ्यासिका होणे गरजेचे आहे. जेणेकरुन तळागाळातील विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची ओढ निर्माण होउन प्रसासकीय अधिकारी होण्याची त्यांनी संधी मिळेल, असे खा.अमर काळे म्हणाले.

गेल्या अनेक वर्षापासून असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा दुरुस्त करण्याचे निवेदन प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे पुरातत्व विभागाकडून पुतळ्याची तपासणी करुन नवीन पुतळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून १ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. नगर पालिकेचे कमी वेळेत पुतळा उभारण्याचे व सौंदर्यीकरणाचे काम केल्याबद्दल आ. समीर कुणावार यांनी नगर पालिकेचे आभार मानले. यावेळी त्यांनी हिंगणघाट येथे आर्टी व बार्टीचे प्रशिक्षण केंद्र व्हावे, विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून वातानुकुलीत अभ्यासिका व्हावी तसेच अण्णाभाउ साठे वस्ती सुधार निधीत वाढ करण्याची मागणी मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे केली.यावेळी नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवराचे हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण करुन सौंदर्यीकरणाच्या कोनशिलचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते.

## अनु.जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाबाबत 17 व 18 एप्रिलला सुनावणी

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी गठीत समितीसमोर आपली मत मांडण्यासाठी संबंधित व्यक्तींनी १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे.अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण संदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (नि. न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल १६ मार्च २०२६ रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालाच्या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या गठित समितीसमोर १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी आपली मत मांडता येणार आहे. त्यासाठी संबंधितांनी dg-sw@barti.in या ई-मेल आयडीवर १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज पाठवावेत.अर्जासोबत अर्जदाराने आपला दूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.सुनावणीचे ठिकाण, वेळ व इतर तपशील संबंधितांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## बालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी एकलव्य फाऊंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे मानसिक आरोग्य हे राज्याच्या उज्ज्वल भविष्याचे पायाभूत तत्व आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आपण बालकांच्या भावनिक आणि मानसिक सक्षमीकरणासाठी एकत्रित प्रयत्न करण्यात येत आहेत.याचा फायदा भविष्यात होणार असून प्रत्येक बालक आत्मविश्वासाने आणि सकारात्मकतेने आयुष्याचा सामना करू शकेल.

हा करार एकलव्य फाऊंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत करण्यात आला आहे.राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये केअरगिव्हर-लेड सेल्फ हेल्प ग्रुप्स च्या माध्यमातून मानसिक आरोग्य सेवा अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. ऑफलाइन आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना आधार देणे, जनजागृती वाढवणे आणि मानसिक आजारांबाबतचा कलंक कमी करणे यासाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. हा कार्यक्रम जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (डीएमएचपी) सोबत समन्वय साधून राबवला जाणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेला हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षासाठी कार्यान्वित असणार आहे. या करारामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच एकलव्य फाऊंडेशन फॉर मेंटल हेल्थचे संस्थापक-संचालक, डॉ. प्रा. अनिल वर्तक, उपाध्यक्ष प्राची बर्वे, सचिव स्मिता गोडसे, खजिनदार मंजिरी चव्हाण, आजीवन सदस्य संध्या वर्तक यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

## महात्मा जोतिराव फुले यांच्या द्वि-जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभानिमित्त विधानभवनात अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** महात्मा जोतिराव फुले यांच्या द्वि-जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभानिमित्त आज शनिवार, दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजी विधान भवन येथे त्यांच्या प्रतिमेस विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. निलम गो-हे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी विधानमंडळ सचिवालयाचे सचिव ४ शिवदर्शन साठ्ये व उप सचिव विजय कोमटवार, विधानपरिषदेच्या उपसभापतींचे यांचे खाजगी सचिव अविनाश रणखांब, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र संचालक आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचा-यांनीही महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांचा कायापालट होणार- सामाजिक न्याय मंत्री

**वर्धा/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातून स्वप्न उराशी बाळगून येणा-या या मुलांच्या डोळ्यांत भविष्याचा उद्धार करण्याची जिद्द असते. त्यांना दर्जेदार सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. म्हणूनच आता नवीन होणारी सर्व वसतिगृहे अत्याधुनिक असतील. तसेच मुलांच्या अभ्यासासाठी असणा-या लायब्ररी आणि स्टडी रूम आता वातानुकूलित असतील. सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहाची क्षमता देखील वाढविण्यात आली असून वसतिगृहांचा कायापालट होणार असल्याचे प्रतिपादन सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी केले. वर्धा शहरातील सामाजिक न्याय विभागाच्या महादेवपूरा व नालवाडी येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहाचे भुमीपूजन सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट व पालकमंत्री डा. पंकज भोयर यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी वान्मथी सी, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, समाज कल्याण उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, डा.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठाण नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर, विजय आगलावे आदी उपस्थित होते. प्रकल्पांच्या कामात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या कामांसाठी आगाउ निधी उपलब्ध करुन दिला आहे. जेणेकरून निधीअभावी काम थांबू नये. काम वेळेत पूर्ण न झाल्यास थेट खात्यातून पैसे कपात करण्याचा इशारा कंत्राटदारांना देण्यात आला असल्याचे संजय शिरसाट म्हणाले. डा. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला गुलामातून माणूस बनवले आहे, ही गोष्ट कधीही विसरू नका. तुम्ही शिक्षण घेउन मोठे व्हा आणि आपल्या कुटुंबाचा व समाजाचा उद्धार करा, असे आवाहन सामाजिक न्यायमंत्र्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. येत्या मे महिन्यात संपूर्ण विदर्भ दौ-यावर राहून विविध वसतिगृहांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी आणि उद्घाटन करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मे महिन्याच्या दुस-या किंवा तिस-या आठवड्यात मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचे नियोजन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले असून इच्छुकांनी आपली नावे नोंदवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## राज्यात तापमानात वाढ

### अकोल्यात सर्वाधिक ३८.७ अंश से. तापमानाची नोंद

**वर्धा/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांत अवकाळी पावसाने राज्यभरात चांगलाच धुमाकूळ घातला. मात्र आता तापमानात वाढ होत असून उकाडा जाणवू लागला आहे. मुंबई, पुणे, ठाण्यात उन्हाचे चटके तापदायक ठरत आहेत. दिवसभर उन-सावलीचा खेळ आणि संध्याकाळनंतर गारठा जाणवत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. आज कोकणात उष्ण व दमट हवामानाचा अंदाज असल्याने हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. तसेच मुंबईतही पुढील ५ दिवस तापमानवाढीचा इशारा दिला आहे. उर्वरित राज्यात उन्हाचा चटका आणि उकाडा वाढण्याची शक्यता आहे. राज्याच्या कमाल तापमानात वाढ झाली आहे. काल म्हणजेच शुक्रवारी अकोला येथे राज्यातील उच्चांकी ३८.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. निफाड येथे नीचांकी १५.५ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. आज पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत उष्ण व दमट हवामानाची शक्यता असल्याने यलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. तसेच सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाला पोषक हवामान आहे. उर्वरित राज्यात उन्हाचा चटका आणि उकाडा वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे शेतकरी राजाच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. तर दुसरीकडे मे महिना सुरू होण्यापूर्वीच वाढलेल्या उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे या कडाक्याच्या उन्हातून बाहेर पडताना नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

**कोकणात यलो अलर्ट**

दरम्यान हवामान विभागाने पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग यांसारख्या किनारपट्टीच्या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये कमाल तापमान ३४ ते ३८ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तापमानाचे आकडे जरी खूप जास्त वाटत नसले तरी, हवेतील आर्द्रतेमुळे प्रत्यक्ष जाणवणारी उष्णता खूप जास्त असेल, ज्यामुळे लोकांना अत्यंत दमट हवामानाचा सामना करावा लागू शकतो. मुंबईसारख्या शहरांमध्ये, दमट उष्णतेमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होउ शकतात, त्यामुळे नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# खानवडीत 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन





**पुणे/प्रतिनिधी :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मुळगाव खानवडी (ता. पुरंदर) येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाउल ठरणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर झेप घेण्याची क्षमता निर्माण होत असून काही विद्यार्थिनी इस्रो आणि नासासारख्या संस्थांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातल्याचेही मुख्यमंर्त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी फ्रेंच व जर्मनसारख्या परकीय भाषा आत्मसात केल्या आहेत, हे बदलत्या शिक्षण व्यवस्थेचे द्योतक असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले.

**महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य विकासाची एक हजार केंद्रे उभारणार**

पुणे जिल्हा परिषदेकडून इंडस्ट्री ४.० अंतर्गत १०० शाळांमध्ये १०० अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

महात्मा फुले हे दूरदृष्टीचे विचारवंत आणि थोर समाजसुधारक

महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते प्रगतशील शेतकरी, यशस्वी उद्योजक आणि दूरदृष्टीचे विचारवंत होते. शेतीत नवनवीन प्रयोग करून शेतक-यांना वर्षभर उत्पन्न मिळवून देणारे माडेल त्यांनी तयार केले. शेतक-यांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी लढा दिला. मुंबई महानगरपालिकेची इमारत, खडकवासला धरण, येरवडा कारागृह आणि कात्रज बोगदा यांसारख्या प्रकल्पांमध्ये त्यांची दूरदृष्टी दिसून येते, असे त्यांनी नमूद केले.

स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत त्यांनी भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध लढा देत विधवांचे केशवपन थांबवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढून पहिली शिवजयंती साजरी करण्याचे कार्यही महात्मा फुले यांनीच केले, असे त्यांनी सांगितले. आजचा शिक्षणाचा अधिकार कायदा ही त्याच विचारांची फलश्रुती असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राज्य शासन महात्मा फुले जनआरोग्य योजना राबवत असून त्याअंतर्गत नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार दिले जात आहेत. महाज्योतीच्या माध्यमातून ओबीसी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले.मंत्री श्री. भुजबळ म्हणाले, महात्मा फुले यांच्या जन्मतिथीबाबत संशोधनातून ११ एप्रिल १८२७ ही तारीख निश्चित झाली आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८९१ मध्ये प्रकाशित केलेल्या महात्मा फुले यांचे अमर जीवन या ग्रंथात या तारखेचा उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे मुख्य कार्य बहुजन समाजाला शिक्षित करणे हेच होते. त्याच विचारातून खानवडी येथे उभारलेली ही आधुनिक सीबीएसई शाळा ही त्यांच्या कार्याची पुढची पायरी आहे. महात्मा फुले हे नेशन बिल्डर होते तसेच अंधश्रद्धा आणि ब्राह्मण्यवादी प्रवृत्तींच्या विरोधात लढणारे विचारवंत होते. त्यांच्या कार्यात विविध समाजघटकांनी सहभाग घेतला होता. त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेउन समतेचा आदर्श निर्माण केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महिलांना राजकीय आरक्षण देण्याचा निर्णय हा त्यांच्या विचारांना दिलेली खरी आदरांजली असल्याचे श्री. भुजबळ म्हणाले.ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी महात्मा फुले यांच्या जन्मगावातून द्विशताब्दी वर्षाच्या कार्यक्रमाची सुरुवात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. खानवडी येथे महात्मा फुले यांच्या मूळ घराची प्रतिकृती तसेच नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. सुमारे १० ते १२ कोटी रुपयांचा प्रकल्प कटगुण येथे तर नायगाव येथे सुमारे १५० कोटी रुपयांचे स्मारक उभारण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल घोरपडे यांनी या शाळेच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रसार होणार असून ग्रामीण विद्यार्थ्यांना नवे दालन उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला.प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. खानवडी येथे १२ एकर जागेवर उभारलेल्या या शाळेत प्रयोगशाळा आणि सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. ही शाळा ज्युनिअर केजी ते इयत्ता १२ वीपर्यंतची सीबीएसई पॅटर्नची असून गरजू विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण दिले जाणार आहे. पुढील वर्षापर्यंत २८० विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे वसतिगृह पूर्ण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंती निमित्ताने महात्मा फुले स्मारकात जाउन अभिवादन केले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या तैलचित्राचे अनावरण मुख्यमंर्त्यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. फडणवीस यांनी शाळा संकुलास भेट देत विविध सुविधा पाहणी केली. यावेळी पुणे जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या सायकल बँक योजनेचे लोकार्पण करण्यात आले. जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या विविध शैक्षणिक नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण असलेल्या शैक्षणिक दालनास मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट देउन उपक्रमांची माहिती घेतली. जिल्हा परिषद शाळांमध्ये उभारण्यात आलेल्या ८८ विविध लॅब्सचे उद्घाटनही मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला खासदार सुप्रिया सुळे, आमदार योगेश टिळेकर, राहुल कुल, शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल घोरपडे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, कौशल्य विकास विभागाचे आयुक्त अमित सैनी, विभागीय आयुक्त डा. चंद्रकांत पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, तसेच जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मतदानाचा वाढता टक्का

दशकभरापूर्वीपर्यंत वाढीव मतदानाचा अर्थ बहुतेकदा सत्तांतराला कौल असा काढला जात असे. कारण, तोवर 'अँटिइन्कम्बसी' या एकाच घटकाच्या परिप्रेक्ष्यातून याकडे पाहिले जात असे; परंतु २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकांनी मतदारांचा सक्रिय सहभाग हा केवळ सत्तापालटासाठीच नसतो, तर विद्यमान शासनावर आपला विश्वास असून त्यांनाच पुन्हा संधी देण्यासाठी मतदार हिरिरीने मतदान करतात, ही बाब ठळकपणाने स्पष्ट झाली. नुकतेच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांसाठीचे पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले. आसाम आणि केरळ या राज्यांसह केंद्रशासित प्रदेश असणाऱ्या पुद्दुचेरीमध्ये पार पडले असून येथील मतदानाच्या वाढलेल्या टक्क्याने भारतीय मतदारांच्या जागृततेची पुन्हा एकदा साक्ष दिली आहे. भारतात पार पडणाऱ्या निवडणुका लोकशाहीच्या आरोग्याचे प्रतिबिंब असतात. मतदारांचा त्यातील सहभाग शासन व्यवस्थेबरोबरच लोकशाही प्रणालीवरील विश्वासाचे एकक म्हणून पाहिला जातो. या पार्श्वभूमीवर या तिन्ही राज्यांत झालेल्या विक्रमी मतदानामुळे जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास अधिक ठळकपणे समोर आला आहे. आसाममध्ये यंदा ८५.३८ टक्के मतदान झाले असून २०२१ मधील ८२.०४ टक्क्यांपेक्षा ते तीन टक्क्यांनी जास्त आहे. पुद्दुचेरीमध्ये २०२१ च्या तुलनेत तब्बल ११ टक्क्यांनी मतदानाची टक्केवारी वाढली आहे. १९६४ मध्ये पुद्दुचेरी भारतीय संघराज्यात विलीन झाल्यानंतरच्या काळात नोंदवण्यात आलेला हा उच्चांक आहे. यापूर्वी २००६ मध्ये ८६ टक्के मतदानाचा विक्रम झाला होता, जो यंदा मतदारांनी मोडीत काढला. केरळमध्येही ३९ वर्षांनंतर ७८.०३ टक्के मतदान झाले आहे. २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्येही आसाम व पुद्दुचेरीमध्ये ८० टक्क्यांदरम्यान मतदान झाले होते, तर केरळमध्ये हा आकडा ७१ टक्के होता. त्या तुलनेनेही यंदा झालेले मतदान लक्षणीय आहे. या निवडणुकांमध्ये एकूण २९६ विधानसभा जागा असून यासाठी १,८९९ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात होते. यंदा सर्व मतदान केंद्रांवर थेट वेब प्रसारणाची व्यवस्था केली होती. त्यामुळे मतदानातील पारदर्शकतेबाबत जनतेचा विश्वास अधिक दृढ होण्यास मदत झाली. अलीकडील काळात मतदानाच्या प्रक्रियेवर विरोधकांकडून केले जाणारे आरोप आणि घेतले जाणारे आक्षेप लक्षात घेता या भरघोस मतदानाला एक वेगळा अर्थ आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाला दिलेल्या अधिकारांमुळे मतदार यादीची अचूकता, मतदानाची निष्पक्षता आणि संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता राखण्याचा प्रयत्न सातत्याने झाला. मतदारांना आपले मत महत्त्वाचे वाटते, निर्णय प्रक्रियेत स्वतःचा सहभाग आवश्यक वाटतो आणि सत्तेतील बदल किंवा सातत्य याबद्दल त्यांची स्पष्ट भूमिका असते, तेव्हाच मतदानाची टक्केवारी वाढते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, २०१४ नंतरच्या काळात महिला मतदारांचा भरभरून सहभाग हे भारतीय निवडणुकांचे वैशिष्ट्य म्हणून पुढे आले आहे. या तीन राज्यांमध्येही महिलांचे उत्स्फूर्त मतदान हा निवडणुकीचा महत्त्वाचा पैलू ठरला. या निवडणुकीचे निरीक्षण करण्यासाठी २२ देशांतील ३८ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी मतदान प्रक्रिया, तांत्रिक व्यवस्था आणि पारदर्शकतेची पद्धत यांचे निरीक्षण केले. पंतप्रधान मोदींनी २०१९ नंतरच्या निवडणुकांमध्ये 'प्रो इन्कम्बसी' चा उल्लेख वारंवार करून राजकीय विश्लेषकांना आपले चष्मे बदलण्याचे आवाहनही केले होते. त्यामुळे मतदानाचे प्रमाण जास्त असणे म्हणजे जनतेत राजकीय जागरूकता वाढत आहे, असा व्यापक अर्थ अधिक योग्य ठरतो. विशेषतः केरळसारख्या राज्यात विचारसरणीतील संघर्षाची परंपरा मजबूत आहे. आसाममध्ये गेल्या दशकात ओळख, स्थलांतर आणि विकास या प्रश्नांवर तीव्र राजकीय चर्चा झाली आहे. पुद्दुचेरीमध्ये प्रादेशिक राजकारण आणि राष्ट्रीय पक्ष यांच्यातील स्पर्धा अधिक स्पष्ट झाली आहे. या सर्वांबाबत मतदारराजाचे आकलन काय आहे, याचा निकाल ४ मे रोजी समोर येईल. मतदानपूर्व स्थितीचे आकलन करता डाव्यांचा एकमेव बालेकिल्ला राहिलेल्या केरळमध्ये गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असणाऱ्या मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांच्या विरोधात नाराजीची लाट स्पष्टपणाने दिसून आली आहे. माकपाविरोधात मुस्लीम मतदारही मोठ्या प्रमाणावर बाहेर पडल्याचे मतदानादरम्यान दिसले. निवडणुकांपूर्वी माकपामधील अनेक नेत्यांनी भाजप आणि काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे विजयन यांच्या अडचणींत वाढ झाली होती. सबरीमाला मंदिरातील सोन्याच्या चोरीचा मुद्दाही महिला मतदारांमध्ये नाराजी पसरवणारा ठरला. याखेरीज आजवर काँग्रेसप्रणीत यूडीएफ आणि सत्ताधारी सीपीआयएमच्या नेतृत्वाखालील एलडीएफ यांच्यात दुरंगी रंगणाऱ्या सामन्याला यावेळी भाजपच्या निमित्ताने तिसरा कोन प्राप्त झाला होता. 'मराथथु इनी मारुम' म्हणजेच 'आतापर्यंत जे बदलले नाही, ते आता बदलेल' हे घोषवाक्य वापरून प्रचार करणाऱ्या भाजपने १० ते १५ टक्के मतांचा टप्पा ओलांडला, तर अनेक मतदारसंघांतील निकालांचे समीकरण बदलू शकते आणि याचा थेट फटका एलडीएफ किंवा यूडीएफला बसण्याची शक्यता आहे. ईशान्येकडील महत्त्वाचे राज्य असणाऱ्या आसाममध्ये हिमंता बिस्वा सरमा हेच मुख्यमंत्री पदासाठी लोकांची पहिली पसंती असल्याचे जनमत चाचण्यांमध्ये समोर आले आहे. निकालांनी यावर शिक्कामोर्तब केल्यास प्रचारात मोठी ताकद लावणाऱ्या काँग्रेसचे गौरव गोगोई यांचा भ्रमनिरास होणार आहे. २०२३ मध्ये झालेल्या मतदारसंघांच्या फेररचनेनंतर ही पहिलीच विधानसभा निवडणूक होती. या प्रक्रियेमुळे अनेक मतदारसंघांचे समीकरण बदलले असून याचा फायदा कुणाला होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पुद्दुचेरीमध्ये मुख्यमंत्री एन. रंगासामी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' आणि काँग्रेस-द्रमुक यांची 'इंडिया' आघाडी यांच्यात सत्तेसाठी थेट संघर्ष झाला असला, तरी अभिनेते विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) या पक्षाच्या प्रवेशामुळे अनेक मतदारसंघांत ही लढत बहुकोणीय झाली आहे. यामुळे राजकीय गणिते अधिक गुंतागुंतीची बनली आहेत. पहिल्या टप्प्यातील या विक्रमी मतदानाची लाट पुढील टप्प्यांमध्येही कायम राहणे आवश्यक आहे. कारण, मतदान प्रक्रियेतील मतदारांचा अधिकाधिक सहभाग, हेच सुदृढ लोकशाहीचे लक्षण आहे.

# केरळमध्ये पारंपरिक आघाड्यांमध्येच लढत

**केरळमधील आगामी विधानसभा निवडणूक केवळ सत्तांतराची लढाई नसून राज्याच्या राजकीय संस्कृतीची, मतदारांच्या बदलत्या मनोवृत्तीची आणि तिसऱ्या शक्तीच्या वाढत्या महत्त्वाची गुंतागुंतीची परीक्षा ठरणार आहे. निवडणुकीत डावी आघाडी आणि काँग्रेसप्रणीत 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' मध्ये मुख्य संघर्ष असला, तरी तिसऱ्या पर्यायाच्या रूपाने भारतीय जनता पक्ष देखील आपली उपस्थिती ठळकपणे दाखवून देत आहे.**

केरळमध्ये सध्या एलडीएफ ही डाव्यांची आघाडी सत्तेवर आहे. त्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट हा प्रमुख पक्ष आहे. ही आघाडी सलग दसऱ्या कार्यकाळात सत्तेत आहे. परंपरेने केरळमध्ये प्रत्येक निवडणुकीनंतर सत्तांतर होत आले आहे; मात्र २०२१ मध्ये 'एलडीएफ' ने ही परंपरा मोडत पुन्हा सत्ता मिळवली. या पार्श्वभूमीवर या वेळी सलग तिसऱ्यांदा एलडीएफ सतेत येऊन हॅट्रिक करणार का, हा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. 'एलडीएफ' सरकारच्या कामगिरीकडे पाहिले तर सामाजिक कल्याण योजना, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा आणि शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूक यांचा उल्लेख करावा लागेल. विशेषतः कोविड काळातील व्यवस्थापनामुळे सरकारची प्रतिमा मजबूत झाली; मात्र याचबरोबर आर्थिक तुटीचा वाढता बोजा, बेरोजगारी आणि काही भ्रष्टाचाराच्या आरोपांनी विरोधकांना सरकारवर टीका करण्याची संधी दिली आहे. विरोधी आघाडीतील काँग्रेसची स्थिती मात्र काहीशी विस्कळीत दिसते. काँग्रेस ही 'यूडीएफ'चा मुख्य आधार असला, तरी अंतर्गत मतभेद, नेतृत्वातील अस्पष्टता आणि सातत्यपूर्ण रणनीतीचा अभाव यामुळे पक्षाला अपेक्षित गती मिळालेली नाही. काही भागांमध्ये काँग्रेसचे पारंपरिक मतदार अजूनही पक्षाशी निष्ठावान असले, तरी राज्यव्यापी पातळीवर प्रभावी लाट निर्माण करण्यात पक्षाला अडचणी येत आहेत. काँग्रेस सत्तेत येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही; मात्र ती आव्हानात्मक आहे. केरळमधील निवडणुकीचा निकाल बहुधा 'स्विंग' मतदारसंघांवर अवलंबून असतो. काँग्रेसला या मतदारसंघांमध्ये निर्णायक आघाडी मिळवता आली, तर सत्तांतर शक्य आहे; परंतु 'एलडीएफ' कडे असलेली मजबूत संघटनात्मक रचना आणि स्थिर मतदारवर्ग काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे करतो.

### केरळमधील संघर्षात भाजपचा शिरकाव

केरळमधील पारंपरिक संघर्षात भाजपचा वाढता शिरकाव हा एक महत्त्वाचा घटक आहे. भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये केरळमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. विधानसभा पातळीवर मोठे यश मिळाले नसले, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपने काही ठिकाणी लक्षणीय कामगिरी केली आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांमध्ये मिळालेल्या जागांमुळे पक्षाला स्थानिक स्तरावर पाय रोवण्यास मदत झाली आहे. या वाढत्या उपस्थितीमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीर्घकालीन कामही महत्त्वाचे मानले जाते. संघाने सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक पातळीवर केलेले कार्य भाजपसाठी आधारभूत ठरले आहे. कार्यकर्त्यांचे जाळे, शाखांची उपस्थिती आणि स्थानिक मुद्यांवर सातत्याने केलेले काम यामुळे भाजपला काही प्रमाणात सामाजिक स्वीकार मिळू लागला आहे. केरळमधील राजकीय वास्तव अद्याप द्विध्रुवीय आहे. 'एलडीएफ' आणि 'यूडीएफ' या दोन आघाड्यांमधील संघर्षात भाजपला निर्णायक तिसरी शक्ती म्हणून उदयास येण्यासाठी अजून वेळ लागेल, असे अनेक विश्लेषक मानतात, तरीही भाजपची उपस्थिती ही दोन्ही आघाड्यांसाठी 'स्पॉइलर' ठरू शकते. चुरशीच्या लढतीत भाजपचे मतविभाजन दोन्ही आघाड्यांसाठी त्रासदायक ठरू शकते. आगामी निवडणुकीकडे पाहता, काही महत्त्वाचे घटक निर्णायक ठरणार आहेत. त्यात सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजी किती प्रभावी आहे, काँग्रेसला संघटित आणि आक्रमक रणनीती राबवता येते का आणि भाजप कितपत मतविभाजन करू शकतो, हे पहावे लागणार आहे.



### तरुण मतदारांचा निकालावर प्रभाव

दक्षिण केरळमधील अंदाज येऊ न शकणारे मतदारसंघ आणि तरुण मतदारांचा कल निकालावर प्रभाव टाकू शकतो. विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे या राज्याच्या राजकारणातील सूक्ष्म प्रवाह अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. परंपरेने उच्च राजकीय जाणीव, साक्षरता आणि सामाजिक भान यासाठी ओळखल्या जाणाऱ्या केरळमध्ये निवडणूक ही केवळ पक्षांमधील लढाई नसते, तर समाजातील विविध घटक, त्यांच्या अपेक्षा आणि बदलत्या प्राधान्यक्रमांची एकत्रित अभिव्यक्ती असते. या निवडणुकीत चर्चेत आलेल्या प्रमुख प्रश्नांकडे पाहता सर्वप्रथम आर्थिक स्थिती आणि बेरोजगारी हे मुद्दे समोर येतात. राज्याची आर्थिक तूट, वाढते कर्ज आणि मर्यादित औद्योगिक वाढ यामुळे तरुणांमध्ये अस्वस्थता आहे. परदेशी रोजगारावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेले केरळ आता स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीची मागणी अधिक ठळकपणे करत आहे. यासोबतच महागाई, इंधनदर आणि दैनंदिन खर्चाचा वाढता ताण हे ही सामान्य मतदारांसाठी महत्त्वाचे मुद्दे ठरत आहेत. 'एलडीएफ' आपल्या कामगिरीवर भर देत आहे. सार्वजनिक आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये केलेल्या गुंतवणुकीचा उल्लेख करून कल्याणकारी राज्य' ही प्रतिमा टिकवण्याचा प्रयत्न होत आहे. दुसरीकडे, काँग्रेस नेतृत्वाखालील 'यूडीएफ' आघाडी बेरोजगारी, भ्रष्टाचाराचे आरोप आणि आर्थिक कुप्रबंधन या मुद्यांवर सरकारला घेरत आहे. भाजप मात्र विकास, पायाभूत सुविधा आणि पर्यायी राजकारण' या मुद्यांवर आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

### केरळमधील मतदार जागरूक

विविध पक्षांची आश्वासनेही या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. 'एलडीएफ' कल्याणकारी योजनांचा विस्तार, पेन्शन आणि सामाजिक सुरक्षेची हमी देत आहे. 'यूडीएफ' रोजगारनिर्मिती, उद्योगांना प्रोत्साहन आणि प्रशासनातील पारदर्शकता यावर भर देत आहे. भाजप राज्यात अधिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा आणि केंद्र राज्य समन्वयातून विकासाचे आश्वासन देत आहे. मतदारांचा विचार मात्र केवळ आश्वासनांवर मर्यादित नाही. केरळमधील मतदार पारंपरिकदृष्ट्या जागरूक असून ते स्थानिक उमेदवाराची प्रतिमा, त्याची उपलब्धता आणि कामगिरी यालाही तितकेच महत्त्व देतात. 'पार्टी लाइन सोबतच 'लोकल फॅक्टर' हा निकाल ठरवणारा महत्त्वाचा घटक ठरतो. केरळमध्ये तो इतर अनेक राज्यांपेक्षा वेगळ्या पद्धतीने दिसतो. येथे हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन असे गोठे धार्मिक गट आहेत. राज्यात अंदाजे ५५ टक्के हिंदू, २७टक्के मुस्लिम आणि १८ टक्के ख्रिश्चन लोकसंख्या आहे. 'इंडियन नॅशनल युनियन मुस्लिम लोग'चा मुस्लिम मतदारांमध्ये प्रभावी आहे, तर ख्रिश्चन समुदायाचा कल अनेकदा 'यूडीएफ'कडे झुकलेला दिसतो. हिंदू मतदारांमध्ये विविध जातीय विभागणी असून त्यांचा कल वेगवेगळ्या पक्षांमध्ये विभागलेला असतो. तथापि, केरळमध्ये धर्म आणि जात हे निर्णायक असले, तरी ते 'एकमेव' घटक नाहीत. शिक्षण, सामाजिक जागरूकता आणि राजकीय परंपरेमुळे मतदार अनेकदा मुद्द्यांवर आधारित मतदान करतात. त्यामुळेच येथे सत्तांतराची परंपरा दीर्घकाळ टिकून राहिली आहे.

### सत्ताधारी आघाडीला फटका

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अलीकडील निवडणुकांमध्ये सत्ताधारी आघाडीला काही ठिकाणी फटका बसल्याचे दिसून आले. काही नगरपालिकांमध्ये आणि पंचायत स्तरावर विरोधकांनी अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली. या निकालांकडे 'वॉर्निंग सिग्नल' म्हणून पाहिले जात आहे. स्थानिक पातळीवरील नाराजी, विकासकामांमधील विलंब आणि स्थानिक नेत्यांविषयी असलेला असंतोष या गोष्टी या निकालांमागे कारणीभूत मानल्या जातात. आता या पार्श्वभूमीचा आगामी विधानसभा निवडणुकीवर काय परिणाम होईल, हा कळीचा प्रश्न आहे. स्थानिक निवडणुका आणि विधानसभा निवडणुका यांचे मुद्दे वेगळे असले, तरी मतदारांच्या मनातील असंतोषाचे प्रतिबिंब मोठ्या निवडणुकीतही दिसू शकते. हा असंतोष वाढला, तर सत्ताधाऱ्यांसाठी आव्हान निर्माण होऊ शकते. एकंदरीत, केरळची निवडणूक ही अनेक स्तरांवर लढली जात आहे. आर्थिक प्रश्न, सामाजिक रचना, स्थानिक मुद्दे आणि राजकीय रणनीती यांचा गुंता यात आहे. मतदार मात्र या सर्वांचा शांतपणे विचार करत आहे. तो केवळ आश्वासनांकडे पाहत नाही, तर प्रत्यक्ष अनुभव, विश्वास आणि भविष्यातील अपेक्षा यांचा तोल सांभाळत निर्णय घेतो. यामुळेच फेरळमध्ये निवडणुकीचा निकाल शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चित राहतो आणि कदाचित, हाच या राज्याच्या लोकशाहीचा सर्वांत परिपक्व आणि वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहे.

**राही भिडे**

# भारत-कॅनडा सहकार्याची नवी सुरुवात



गेल्या सहा आठवड्यांपासून माध्यमांचे लक्ष इराण-अमेरिका युद्धाच्या घडामोडींवर आहे. याच काळात कॅनडा आता खलिस्तानी दहशतवाद आटोक्यात आणण्यासाठी पुढे येत आहे. अमेरिकेसोबत सध्या कॅनडाचे संबंध ताणलेले असल्यामुळे जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारताशी व्यापार आणि सहकार्य वाढवणे कॅनडाला आवश्यक वाटत आहे. कॅनडाच्या पंतप्रधानांच्या भारत भेटीत काही महत्त्वाच्या करारांवर स्वाक्ष?या झाल्या आहेत. कॅनडा आपल्या देशातील खलिस्तानी उग्रवाद्यांवर लगाम घालत भारताशी आर्थिक संबंध अधिक मजबूत करत असून हे पाऊल भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरत आहे.

कोम्बॅटिंग हेट अॅक्ट हा कायदा कॅनडाच्या प्रतिनिधीगृहाने अलीकडेच संमत केला. या कायद्यामुळे त्या देशामध्ये उजळ माथ्याने वावरणा-या खलिस्तानी चळवळीला पायबंद बसणार आहे. भारताने कॅनडामधील खलिस्तानी गटांच्या विविध हालचालींबद्दल त्या देशाकडे वेळोवेळी चिंता व्यक्त केली होती. कॅनडाचा हा कायदा म्हणजे भारतीय राजनैतिक मुत्सद्देगिरीचा विजय आहे. भाषण स्वातंत्र्याच्या नावाखाली दहशतवादावर पांघरुण घातले जाऊ शकत नाही, असाच संदेश या कायद्याने दिला आहे या कायद्यातील तरतुदींनुसार बंदी घालण्यात आलेल्या 'बब्बर खालसा'सारख्या खलिस्तानी संघटनांना आपले झेंडे किंवा प्रचार साहित्य सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करता येणार नाही. अशी कोणतीही कृती बेकायदेशीर ठरविण्यात आली आहे. तसेच धार्मिक स्थळांच्या बाहेर लोकांना अडवणे किंवा धमकावण्याचे प्रकार हा गुन्हा मानला जाणार आहे. तेथील खलिस्तानी गटांच्या उपक्रमांकडे 'फ्री स्पीच' म्हणून प्रदीर्घ काळ पाहिले जात होते, पण खलिस्तानी तत्त्वज्ञान म्हणजे केवळ वैचारिक विरोध नसून हे तत्त्वज्ञान म्हणजे संघटित दहशतवादाचा आणि फुटीरतावादाचा भाग असल्याचे लक्षात आल्याने कॅनडा सरकारने भाषण स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊ नये म्हणून 'कोम्बॅटिंग हेट अॅक्ट' हा कायदा आणण्याचा निर्णय घेतला.

या कायद्यातील तरतुदींनुसार बंदी घालण्यात आलेल्या 'बब्बर खालसा'सारख्या खलिस्तानी संघटनांना आपले झेंडे किंवा प्रचार साहित्य सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करता येणार नाही. अशी कोणतीही कृती बेकायदेशीर ठरविण्यात आली आहे. खलिस्तानी झेंडे फडकवणे, दहशतवादी संघटनांचे उदात्तीकरण करणे अशा गटांच्या प्रचारात सहभागी होणे या सर्व गोष्टी आता या कायद्यांतर्गत आणण्यात आल्या आहेत. कॅनडात खलिस्तानी विचारांच्या गटांचा प्रभाव मोठा आहे. त्यांच्याकडून हा कायदा येऊ नये म्हणून दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. शीख समाज कॅनडामध्ये मोठ्या संख्येने आहे. त्यातील लहानसा, पण प्रभावी गट खलिस्तानी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा आहे. प्रारंभी भारताचे म्हणणे कॅनडाकडून गांभीर्याने घेतले जात नव्हते. अनेक खलिस्तानी दहशतवादी त्या देशात आश्रयाला असल्याकडेही भारताने लक्ष वेधले होते, पण त्याकडे दुर्लक्ष केले गेले. मात्र आता कॅनडा सरकारचेही डोळे उघडले. कॅनडाच्या लोकप्रतिनिधींनी संमत केलेल्या 'कोम्बॅटिंग हेट अॅक्ट'मुळे त्या देशात सक्रिय असलेल्या खलिस्तानी गटांना पायबंद बसेल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

दुसरीकडे भारत आणि कॅनडामध्ये ऊर्जा, व्यापार, शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील सहकार्याच्या एका महत्त्वाच्या अध्यायाचा प्रारंभ झाला आहे. विशेषतः युरेनियम पुरवठ्याचा करार हा भारताच्या दीर्घकालीन ऊर्जा धोरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या करारानुसार, कॅनडा भारताला मोठ्या प्रमाणात युरेनियमचा पुरवठा करणार आहे. भारताच्या अणुऊर्जा प्रकल्पांसाठी आवश्यक असलेले इंधन स्थिरपणे उपलब्ध राहावे यासाठी हा करार निर्णायक ठरणार आहे. भारताची ऊर्जा-मागणी सातत्याने वाढत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि 'डिजिटल' अर्थव्यवस्थेच्या विस्तारामुळे ऊर्जा-वापरात प्रचंड वाढ होताना दिसते. अशा परिस्थितीत स्वच्छ, स्थिर आणि दीर्घकालीन ऊर्जास्रोत म्हणून अणुऊर्जेचे महत्त्व अधिक वाढले आहे.

भारताने गेल्या काही वर्षांत नूतनीकरणक्षम ऊर्जा क्षेत्रात मोठी झेप घेतली असून सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर उभारले जात आहेत. तथापि, या ऊर्जा स्रोतांची एक मर्यादा आहे. हवामानावर हे प्रकल्प अवलंबून असल्याने त्यातून सातत्याने ऊर्जा निर्माण होत नाही. अशा परिस्थितीत अणुऊर्जा ही स्थिर आणि विश्वासार्ह ऊर्जा म्हणून महत्त्वाची ठरते. त्यामुळे भारताने अणुऊर्जेच्या क्षमतेत मोठया प्रमाणात वाढ करण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. अशा या अणुऊर्जा प्रकल्पांसाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे युरेनियम. भारतामध्ये युरेनियमचे साठे असले तरी त्यांचे उत्पादन मर्यादित आहे. देशाच्या एकूण गरजेच्या तुलनेत देशांतर्गत उत्पादन अपुरे पडते. त्यामुळे भारताला युरेनियम आयातीवर अवलंबून राहावे लागते. कॅनडासारख्या विश्वासार्ह आणि संसाधन समृद्ध देशाकडून दीर्घकालीन पुरवठा मिळणे, हे भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. कॅनडा हा जगातील प्रमुख युरेनियम उत्पादक देशांपैकी एक. भारताला कॅनडाकडून मिळणारा पुरवठा अणुऊर्जा क्षेत्राच्या विस्तारासाठी महत्त्वाचा आधार ठरू शकतो. भारताने भविष्यात अणुऊर्जा उत्पादन वाढवण्याची योजना आखली आहे. त्यामुळे अशा करारांमुळे दीर्घकालीन ऊर्जा-सुरक्षिततेला बळ मिळते.

कार्नी यांच्या दौ-याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे महत्त्वाच्या खनिजांसाठीच्या दोन्ही देशांतील सहकार्याचाही मार्ग खुला झाला आहे. लिथियम, निकेल, कोबाल्ट आणि इतर दुर्मीळ खनिजे भविष्यातील तंत्रज्ञान उद्योगासाठी अत्यंत आवश्यक मानली जातात. इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी तंत्रज्ञान, 'सेमीकंडक्टर' उद्योग आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रासाठी या खनिजांचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. भारताने अलीकडच्या काळात या क्षेत्रात सक्रिय धोरण स्वीकारले आहे. जगभरातील संसाधन समृद्ध देशांसोबत सहकार्य वाढवून भविष्यातील तंत्रज्ञान उद्योगासाठी आवश्यक असलेली खनिजे सुरक्षित करण्याचा भारताचा प्रयत्न आहे. कॅनडासोबतचे सहकार्य या धोरणाला अधिक बळ देणारे ठरते.

या दौऱ्यात व्यापार सहकार्यालाही नवी चालना देण्याचा प्रयत्न झाला. भारत आणि कॅनडाने द्विपक्षीय व्यापार मोठ्या प्रमाणात वाढवण्याचा संकल्प केला आहे. दोन्ही देशांमधील मुक्त व्यापार करारासाठी चर्चा पुन्हा सुरू करण्याचे संकेतही देण्यात आले आहेत. कॅनडासाठी भारत हा वेगाने वाढणारी आणि जगातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे, तर भारतासाठी कॅनडा हा संसाधन समृद्ध आणि गुंतवणुकीसाठी महत्त्वाचा असा भागीदार आहे. कॅनडातील आर्थिक गुंतवणूकदार संस्था भारतातील पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रांत गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे आर्थिक सहकार्याचा पाया अधिक मजबूत होऊ शकतो.

खलिस्तानी प्रश्नावर तणाव कायम ठेवणे कोणाच्याही हिताचे नसल्याचे दोन्ही बाजूंना उमगले आहे. कार्नी सरकारच्या कार्यकाळात कॅनडास्थित खलिस्तानी उग्रवाद्यांवर प्रथमच गंभीर कायदेशीर आणि राजनैतिक अंकुश लावण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत, ज्याचा योग्य उपयोग केल्यास दोन्ही देशांमध्ये परस्पर विश्वास आणि सहकार्याचा नवा अध्याय सुरू होऊ शकतो.

**ब्रि. हेमंत महाजन**

# प्रहारच्या उपोषणाची आमदार गजानन लवटे यांच्या मध्यस्थीने सांगता

## शासकीय साहित्य चोरी प्रकरणावर कारवाईची मागणी मात्र कायम

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

येथील नगरपरिषदेतील शासकीय साहित्य चोरी प्रकरणामुळे निर्माण झालेले राजकीय व सामाजिक वादळ अखेर नवे वळण घेताना दिसत आहे. प्रहार संघटनेचे उपजिल्हाप्रमुख शंभू मालठाणे यांनी सुरू केलेले बेमुदत आमरण उपोषण १० एप्रिल रोजी आमदार गजानन लवटे यांच्या मध्यस्थीने स्थगित करण्यात आले.

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणामुळे नगरपरिषद प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला होता. मात्र, सुरुवातीला प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल न घेतल्याने आंदोलन चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर आमदार गजानन लवटे यांनी मध्यस्थी करत



संबंधितांशी चर्चा केली व आंदोलनकर्त्यांची समजूत काढली.सदर प्रकरणात नगरपरिषदेतील शासकीय साहित्य चोरी झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यामध्ये संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदार यांच्यावर मिलीभगतीचे आरोप होत असून, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची ठाम मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत होती.

उपोषणादरम्यान शंभू मालठाणे यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत, 'जोपर्यंत दोषींवर गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही,' अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली होती.दरम्यान, या प्रकरणातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संबंधित ठेकेदाराचे साहित्य निवडणुकीच्या काळात नगरपरिषदेतून बाहेर नेण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच, १८ मार्च २०२६ रोजी देण्यात आलेल्या पत्रात 'सामान आपण सांगाल त्या दिवशी त्या ठिकाणी आणण्यास तयार आहोत,' असा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, निवडणुका पार पडून अनेक महिने उलटल्यानंतर असे पत्र देण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय अधिकच गडद झाला आहे.

आमदार गजानन लवटे यांच्या हस्तक्षेपानंतर उपोषण स्थगित करण्यात आले असले तरी आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्यांवर ठाम भूमिका कायम ठेवली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.या प्रकरणामुळे अंजनगाव सुर्जी परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. जर योग्य वेळी ठोस निर्णय घेतला गेला नाही, तर हे प्रकरण अधिक व्यापक स्वरूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# किरणताई महल्ले यांचा श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे सत्कार



**अमरावती/का.प्र.**

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या, माजी महापौर किरणताई महल्ले यांची केंद्र शासनाने राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, नवी दिल्लीच्या सदस्यपदी निवड केल्याबद्धल श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतीचिंह देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती भवन येथे भाऊसाहेबांना पुष्पांजली अर्पण करण्याकरिता किरणताई आल्या असता संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे यांनी किरणताई महल्ले यांचे स्वागत केले.व त्यांच्या निवडीबद्धल आनंद व्यक्त केला.

# कॉंग्रेस नेत्यांबद्दल अपशब्द वापरणाऱ्या हिमंता शर्माचा युवक कॉंग्रेसतर्फे निषेध

## पोस्टर जाळून केले आक्रमक आंदोलन

**अमरावती/का.प्र.**

येथे आज युवक कॉंग्रेसच्या वतीने आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. आसामचे मुख्यमंत्री व भाजपचे नेते हिमंता बिस्व शर्मा यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसेच राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरोधात केलेल्या अपशब्दांचा निषेध करत युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोस्टर जाळून आणि जोडे मारून आंदोलन केले.

शहरातील कॉंग्रेस भवन येथे जमलेल्या युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला.'कॉंग्रेस नेत्यांचा अपमान सहन केला जाणार नाही,' असे म्हणत आंदोलनकर्त्यांनी हेमंता बिस्वा सरमा यांच्या प्रतिमेचे पोस्टर



जाळून निषेध नोंदवला. त्याचप्रमाणे दलितविरोधी भाजपा नेत्यांच्या विरोधात तीव्र नारेबाजी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने युवक कार्यकर्ते उपस्थित होते.युवक कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, देशातील वरिष्ठ नेत्यांविषयी अशा प्रकारची भाषा वापरणे ही अत्यंत निंदनीय बाब आहे. लोकशाहीत मतभेद असू शकतात, मात्र वैयक्तिक टीका आणि अपमानास्पद वक्तव्ये योग्य नाहीत, असे त्यांनी नमूद केले. संबंधित नेत्यांनी तत्काळ माफी मागावी, अन्यथा राज्यभर आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

आंदोलनात राहुल येवले, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, समीर जवंजाळ, सागर कलाने, निलेश गुहे, आशिष यादव, राहुल साबळे, अक्षय साबळे, ऋत्विक देशमुख, केदार भेंडे, गोकुल देशमुख, सागर यादव, मोहित भेंडे, कुणाल गावंडे ,वेदांत केने, प्रियाल मोहाड, शुभम बांबल , अक्षय साबळे, धनंजय बोबडे, राहुल येवले, ओम कुबडे, चैतन्य गायकवाड, व्यंकटेश नेरकर, अनय वाटाणे, सुजल इंगळे, शशिकांत बोंडे, विजू खंडारे, प्रफुल तंतरपाडे, गोविंद ठाकरे, पार्थ धानोरकर, जयंत बंदीवान, रोहित खोब्रागडे, अमेय येऊतकर, मुकेश लालवानी, आकाश गेडाम, रोहीत खंडेराव, हर्षल साखरकर, युवराज सोलव,शुभम वानखडे, आनंद बरडे, श्रेयस गाडे, श्रेयस धर्माळे, जिगर शिंदे, लकी धनाडे व इतर युवक कॉंग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.प्रवीण तायडे यांच्या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## नागरिकांच्या अनेक तक्रारी मार्गी

**अचलपूर/वार्ताहर**

तालुक्यातील नागरिकांचे विविध विभागांशी संबंधित प्रलंबित प्रकरणे मार्गी लागावे ,शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना सामना करावा लागणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या संकल्पनेतून दर गुरुवारी अचलपूर शहरातील विदर्भ मील येथील आ.प्रवीण तायडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात जनता दरबाराचे आयोजन केले जाते.नुकतेच आ.प्रवीण तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसंपर्क कार्यालयात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते.या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.

यावेळी शेकडो नागरिकांनी तहसील कार्यालय,अचलपूर नगर परिषद कार्यालय ,कृषी



विभाग,महावितरण विभागाशी संबंधित नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणे,तक्रारी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे नागरिकांनी मांडल्या .याची तत्काळ दखल घेत अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी मोबाईल वरून संपर्क साधत नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणे तत्काळ मार्गी लावण्याचे निर्देश दिले.यामुळे या जनता दरबाराचा माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी माराव्या लागणाऱ्या अनेक चकरा आणि त्यामुळे मानसिक व आर्थिक भुर्दंडातून सुटका झाल्याने नागरिकांनी आ.प्रवीण तायडे यांचे आभार मानले आहे .या कार्यालयात नागरिकांना बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.गेल्या ९ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजतापासून कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी होती.यावेळी आ.प्रवीण तायडे यांनी दुपारी १२ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत जनता दरबार सुरू होते .नागरिकांची मोठी गर्दी होती.यात ज्येष्ठ नागरिक,महिला मंडळी,तरुण वर्ग,शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.नागरिकांच्या विविध विभागाशी संबंधित समस्या आ.प्रवीण तायडे यांच्या जनता दरबाराच्या माध्यमातून मार्गी लागल्याने त्यांचे समाधान अनेक नागरिकांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाले .यावेळी भाजपा पक्षाचे नेते प्रमोद कोरडे,जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,शंकर मालखेडे,प्रफुल बर्वे,नगरसेवक अक्षय पखाले, सतीश शर्मा,अक्षय जनवारे,महेश कडू ,कौस्तुभ मुंदे, सचिन कडू, अविश कडू,महेश देशमुख , शंकर भाषांनी,गौरव रघुवंशी आदी उपस्थित होते.

# ऑडिओ क्लिप प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

## अचलपूर भाजपाचे एसडीओंना निवेदन



**अचलपूर/वार्ताहर**

माजी आमदार बच्चू कडू यांच्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणावे तसेच संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अचलपूर भाजपाच्या वतीने उपविभागीय राजस्व अधिकारी व उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.

ऑडिओ रेकार्डीगमध्ये धमकावण्याचा व जिवे मारण्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आवश्यक ती सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावे व आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत भाऊ अभिजीत तायडे यांना पोलिस संरक्षण प्रदान करण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. याप्रसंगी तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे, विशाल काकड, रूपेश ढेपे, सतीश शर्मा, सचिन कडु, रितेश केने, सारंग जावरकर, निखील भुजाडे, विनोद ढाकुलकर, अवेश कडू, संजय आवारे,सागर हरणे, रमेश उघडे, यशपाल धोटे, मोहन आमझरे, उज्वला माकोडे, आशिष धोपटे, अंकुश मडघे, प्रविण पोटे, दिपक हाडोळे, स्वप्नील जावरकर, दिपक पावडे,अभिषेक वाडोकर व भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जी. एच. रायसोनी विद्यापीठात राज्यस्तरीय हॅकेथॉन २०२६

**अमरावती/का.प्र.**

जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागाने 'इनोव्हेट महाराष्ट्र – जेमिनी ॲण्ड जनरेटिव्ह एआय हॅकेथॉन २०२६' या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या हॅकेथॉनमुळे महाराष्ट्रातील युवा तंत्रज्ञानप्रेमींच्या प्रतिभेला जनरेटिव्ह एआयच्या माध्यमातून वास्तविक समस्या सोडवण्याची संधी मिळाली.

भारतीय ओपन सोर्स कम्युनिटी आणि गुगल फॉर डेव्हलपर्स यांच्या सहकार्याने आयोजित या हॅकेथॉनचे उद्दिष्ट नवोन्मेष वाढवणे, तंत्रज्ञान कौशल्ये विकसित करणे, ओपन सोर्स योगदान प्रोत्साहित करणे आणि व्यावहारिक आव्हानांसाठी स्केलेबल एआय सोल्यूशन्स विकसित करणे हे होते.नाशिक,



पुणे, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नागपूर आणि अमरावतीसह विविध शहरांतील एकूण ५५ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. हा कार्यक्रम दोन टप्प्यांत पार पडला.प्रोटोटाइप राउंड २३ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन झाला. तर भव्य फायनल विद्यापीठाच्या कॅम्पसवर झाला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबवण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून सौरभ सिसोदिया,आशुतोष भाकरे, रचना भाकरे, जितेंद्र गुप्ता, राजरत्न डोंगरे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायस्वाल आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अमित गायकवाड, प्रा. नावेद हक आणि प्रा. सपना नंदनवार यांनी उत्कृष्ट नियोजन केले.नवोन्मेष, तांत्रिक अंमलबजावणी, सामाजिक प्रभाव आणि सादरीकरण यांच्या कठोर मूल्यमापनानंतर १ लाख रोख बक्षीस आणि २० लाख शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या एकूण पुरस्कार रकमेतून विजेत्या संघांची घोषणा करण्यात आली.

प्रथम क्रमांक: टीम वनआयरिक (जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी) सदस्य: हिताक्षी रामदास नेवारे, ध्रुवी राकेश सुचक, यशश्री नेमिनाथ रौलकर, देवाश्री धर्मेंद्र दुधे, नक्षत्र अनंत बिडवे,प्रथम उपविजेता: टीम टेकस्पायर (प्रोफ. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च) सदस्य: मोहिनी रमेश राठोड, वैभवी राजेंद्र ठाकरे, अदिती संजीव माधपूर, जान्हवी मनोज राणे, शांतनू नितेश कदम,द्वितीय उपविजेता: टीम स्टील आयएक्स (जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग) सदस्य: कौशिक खोडके, ओम भुरके, प्रतीक वाठ, ओमकार बचकवार, देवांश ठवरे ठरले.'इनोव्हेट महाराष्ट्र २०२६' च्या यशस्वी आयोजनामुळे महाराष्ट्रातील तंत्रज्ञान उत्कृष्टतेला चालना मिळाली असून, युवा पिढीतील पुढील एआय नवोन्मेषकांना प्रोत्साहन मिळाले आहे. असे उपक्रम भविष्यातही समाजातील आव्हानांसाठी तंत्रज्ञान-आधारित उपाय निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करतील.

# शेतकऱ्यांसाठी कर्ज मर्यादा पाच लाखांपर्यंत वाढवा

## राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पालकमंत्री यांना निवेदन

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर तालुक्यातील सेवा सहकारी संस्थांमधिल सभासद शेतकऱ्यांना सध्या मिळणारी कर्ज मर्यादा अपुरी ठरत असल्याने ती वाढविण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सादर करण्यात आले.



सध्या शेतकऱ्यांना बँकेमार्फत तीन लाखापर्यंत कर्ज जाते. मात्र, दर्यापूर तालुका हा बहुतांश खारपाण पट्टा असल्यामुळे शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे.शेती करतांना बियाणे,किटकनाशक, रासायनिक खते, व इतर औषधे व शेती खर्च भागवण्यासाठी अधिक आर्थिक सहाय्याची आवश्यकता भासत आहे. सध्याची कर्ज मर्यादा अपुरी पडत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र सभासद शेतकऱ्यांसाठी कर्ज मर्यादा तीन लाखावरून पाच लाख रुपयापर्यंत वाढविण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ही मागणी मान्य झाल्यास शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळून शेती उत्पादनात वाढ होईल व त्यांच्या आर्थिक स्थैर्यास चालना मिळेल हे निवेदन अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, संचालिका सुरेखा ठाकरे, संचालक अजय मेहकरे यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष निलेश पाटील मोपारी, शहराध्यक्ष अमोल गहरवार तसेच जिल्हा सरचिटणीस कुलदीप पाटील काळे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.शेतकऱ्यांच्या हितासाठी ही मागणी तात्काळ मान्य करण्यात यावी.

# संक्षिप्त

## डॉ सम्युअल हॅनिमन जयंती



**अमरावती-**महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन तर्फे डॉ. मोहोड्स ॲडव्हान्स होमिओपॅथी क्लिनिक अमरावती येथे स्टेट प्रेसिडेंट डॉ रुपाली गोसावी , डॉ आरती नल्लू यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ सम्युअल जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मंचावर डॉ स्वाती पडोळे, अमरावती जिल्हाच्या च्या नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ प्रिया मोहोड, प्रमुख अतिथी डॉ चंदा निंभोरकर,, उपाध्यक्ष डॉ मधुरा कहाळे, सचिव डॉ स्नेहा पिंजानी, सह सचिव डॉ वैशाली टेम्भे, डॉ शीतल आचार्य, समिती सल्लगार डॉ अलका राजपुरिया उपस्थित होत्या. दीप प्रज्वलन आणि डॉ सम्युअल हॅनेमान यांचा प्रतिमेला हरार्पण करून जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख अतिथी जेष्ठ होमिओपॅथ डॉ चंदा निंभोरकर यांनी CME मध्ये 'Clinical Tips in Acute cases in homoeopathy' बद्दल विशेष मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ स्वाती पडोळे यांनी आपल्या भाषणात होमिओपॅथी बद्दल माहिती दिली.डॉ प्रिया मोहोड यांनी आपल्या भाषणात MHFDA च्या पुढील कार्यप्रणाली आणि होमिओपॅथी बद्दल सांगितले. डॉ अलका राजपुरिया, डॉ मधुरा कहाळे यांनी सुद्धा आपल्या भाषणातून हॅनेमान जयंती च्या शुभेच्छा देऊन होमिओपॅथी बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव डॉ शितल आचार्य यांनी केले. आभार प्रदर्शन सचिव डॉ स्नेहा पिंजानीने केले. कार्यक्रमाला नवनिर्वाचित सदस्य डॉ राणी चौधरी,, डॉ मीनल चौधरी,डॉ पल्लवी चौधरी, डॉ प्रियांका गौतम,डॉ सपना व्यास, डॉ प्रज्ञा घाटोळ, डॉ शिल्पा काळे, डॉ रीना मालनी, डॉ स्नेहल खेरडे सह अन्य सदस्य उपस्थित होते.

## डॉ पंजाबराव देशमुख यांची पुण्यतिथी

**नांदगाव खंडेश्वर-**शिक्षण महर्षी, थोर समाज सुधारक, कृषी क्रांतीचे प्रणेते डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची ६१ वी पुण्यतिथी निमित्त नांदगाव हायस्कूल नांदगाव खांडेश्वर येथे मानवंदना अर्पण



करण्यात आली. भाऊसाहेबांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून शाळेचे माजी विद्यार्थी दर्शन मारोटकर, करण ब्राह्मणवाडे,प्रणव मानकर या पोलीस भरतीत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ असे सत्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून धामक शाळेचे मुख्याध्यापक बावणे होते. त्यांचाही भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचा ध्वजारोहण करून गौरव गीत गायन घेण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप ठाकरे तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्याध्यापिका भारती वाटाणे होत्या. सदर कार्यक्रमात भाऊसाहेबांच्या जीवनावर ज्ञानेश्वरी डांगे वर्ग ६अ व जिविका बनसोड ६ ब मधल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषण केले. सदर कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.संचालन कराळे तर आभार प्रदर्शन ज्युनिअर कॉलेजचे भोसले यांनी केले.

## मनपात महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी



**अमरावती-**महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम मनपात संपन्न झाला. महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे हस्ते महात्मा फुले यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी उपमहापौर सचिन भेंडे,आयुक्त वर्षा लड्डा,चेतन गावंडे,विलास इंगोले, गटनेता नाना आमले,ममता आवारे, शिक्षण समिती उपसभापती वंदना मडघे, नगरसेवक बबलु शेखावत, मिलींद चिमोटे, धिरज हिवसे, आशिष अतकरे, अजय जयस्वाल, विनोद तानवैस, दिपक साहू सम्राट, ॲड.प्रशांत देशपांडे, सचिन वैद्य, प्रशांत महल्ले, गुड्डु उर्फ प्रशांत धर्माळे, मनीष बजाज, इस्माईल लालुवाले, नगरसेविका सुनिता भेले,राजश्री जटाळे,विद्या माटे,अर्चना पाटील,अर्चना पांडे, कल्याणी तायडे,अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक,उपायुक्त योगेश पिठे, मुख्यलेखाधिकारी श्यामसुंदर देव, भुषण पुसतकर, डॉ.अजय जाधव, नगरसचिव संदिप वडुरकर,भुषण खडेकार,शिवा फुटाणे, अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

**मुलांच्या संगोपनाची पालक म्हणून आई - वडील जेवढी काळजी घेतात, तसेच उत्तरदायित्व त्या राज्याकडे येते. त्यामुळे बाल तस्करीच्या घटना एखाद्या राज्यात घडत असतील, तर संबंधित राज्याने 'मानवी तस्करी विरोधी पथक' सक्रिय करून बेपत्ता मुलांचा शोध घेणे गरजेचे आहे.**

# देवाघरच्या फुलांची तस्करी...

'मुले ही देवाघरची फुले' या सुविचारातून भारतीय संस्कृतीतील मुलांचे निष्पापपण आणि त्यांचे महत्त्व अधोरेखित होते. हीच मुले देशाची भावी पिढी असल्याने त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारची भूमिका तितकीच महत्त्वपूर्ण ठरते. मुलांच्या संगोपनाची पालक म्हणून आई-वडील जेवढी काळजी घेतात, तसेच उत्तरदायित्व त्या राज्याकडे येते. एखाद्या मुलाने खेळात किंवा अन्य क्षेत्रात देदीप्यमान कामगिरी केली की, संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्याला तो अभिमान वाटत असतो. अशा मुलांना अनेकदा राज्य सरकारकडून सन्मानित केले जाते. त्यामुळे बाल तस्करीच्या घटना एखाद्या राज्यात घडत असतील तर, संबंधित राज्याने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच झालेल्या सुनावणीत एका 'बाल तस्करी' या गंभीर विषयाकडे पुन्हा एकदा संपूर्ण देशाचे लक्ष वेधले आहे. २०२५ साली सर्वोच्च न्यायालयाने बाल तस्करी प्रकरणी काटेकोरपणे अंमलबजावणीचे निर्देश दिले होते. त्याकडे राज्य सरकारांनी गांभीर्याने पाहिले नाही, ही बाब लक्षात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'मानवी तस्करीशी संबंधित खटल्याची सुनावणी दररोज घेऊन सहा महिन्यांच्या आत पूर्ण करा, मानवी तस्करी विरोधी पथके समक्ष करून तपासात सुधारणा करा आणि हरवलेल्या मुलांची प्रकरणे मानवी तस्करी म्हणून समजून तपास करा', असे यापूर्वी दिलेले न्यायालयीन निर्देश असताना काही राज्यांकडून 'डोळ्यांत धूळ फेकण्यासारखे' अहवाल सादर केले गेले असेही खंडपीठाने नमूद केले आहे. मध्यप्रदेश, गोवा, हरियाणा, लक्षद्वीप, मिझोराम, ओडिशा आणि पंजाब या राज्यांनी विहित नमुन्यात अहवाल सादर केला नाही. अन्य १५ राज्यांनी मानवी तस्करीसंदर्भातील संवेदनशील क्षेत्रे ओळखण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी समित्याच स्थापन केल्या नाहीत, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले आहे. मध्य प्रदेशच्या गृह सचिवांनी या प्रकरणी अखेर माफी मागण्याची वेळ न्यायालयासमोर आली. इतके हे गंभीर प्रकरण असताना, राज्य सरकारे उदासीन का प्रश्न सर्वोच्च न्यायालयाला पडला.



देशात मानवी तस्करी करणाऱ्या अनेक टोळ्या सक्रिय आहेत, ही बाब नव्याने सांगण्याची गरज नाही. त्यात भारतात बाल तस्करीचे प्रमाण मोठे असून, दरवर्षी हजारो मुले या दुष्टचक्रात अडकतात. भारतात दर आठ मिनिटाला एक मूल वेपत्ता होते, असा 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो'चा अहवाल सांगतो. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या काळात देशभरातून ५३ हजारांहून अधिक मुलांची बालमजुरी, तस्करी आणि अपहरणातून सुटका करण्यात आली आहे. मानवी तस्करीच्या सर्वाधिक प्रकरणांमध्ये ओडिशा, विहार, तेलंगणा, महाराष्ट्र आणि राजस्थान ही राज्ये आघाडीवर असली, तरी ओडिशा हे राज्य अल्पवयीन मुलांच्या तस्करीच्या बाबतीत देशात प्रथम क्रमांकावर आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांची तस्करी आणि लैंगिक शोषण करण्याच्या घटनांमध्ये २०२० नंतर मोठी वाढ झाली आहे. दरवर्षी यासंदर्भातील सुमारे १६ लाख तक्रारी ऑनलाइन नोंदवल्या जातात. ही महत्त्वपूर्ण बावही पुढे आली आहे. बिहारमधून दरवर्षी १२ हजार ते १४ हजार व्यक्ती बेपत्ता होतात त्यात मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तस्करीत अडकलेली मुले कोण असावीत, असा विचार आपल्या मनात येईल. देशाच्या कानाकोपऱ्यात अनेक कुटुंबे गरिबीत जगत असतात. अशा परिस्थितीत मुलांना कामाला लावण्यासाठी किंवा पैशांच्या आमिषाने तस्करांच्या जाळ्यात सापडतात. पालकांमध्ये असलेल्या अज्ञानाचा फायदा घेऊन तस्कर मुलांना चांगले शिक्षण किवा नोकरीचे आमिष दाखवून पळवून नेतात. हॉटेलमधील स्वस्त मजूर, घरकाम, भीक मागणे आणि लैंगिक शोषणासाठी मुलांची बाजारात मोठी मागणी आहे. पूर, भूकंप किंवा दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीत विस्थापित झालेली ही मुले तस्करांची सोपी सावज झाली आहेत. रेल्वे स्थानके, बस स्टँड आणि सार्वजनिक ठिकाणी देखरेखीचा अभाव असल्याने तिथून या तस्करांना मुलांचे अपहरण करणे सोपे जाते.

पोलिसांनी सुटका केलेल्या मुलांच्या माहितीतून तस्करीच्या गुन्ह्यांच्या अनेक पद्धतीची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

मुलांचा शोध घेणे शक्य असूनही केवळ प्रबळ राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीअभावी या टोळ्यांचे जाळे नष्ट होत नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे

. बाल तस्करी रोखण्यासाठी 'पोक्सो 'सारख्या कायद्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात पालकांना आणि मुलांना तस्करांच्या पद्धतींबद्दल जागृत करणे गरजेचे आहे. प्रत्येक मुलाला सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळेल याची हमी राज्य सरकारने घ्यायला हवी. रेल्वे स्थानके आणि बस स्थानकांवर 'मानवी तस्करी विरोधी पथक' सक्रिय करून सीसीटीव्ही निगराणीसोबत पोलिसांची गस्त वाढवणे गरजेचे आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये वेपत्ता मुलांची नोंद होताच ती माहिती केंद्र आणि राज्याच्या संबंधित पोर्टलवर तत्काळ अपलोड करणे बंधनकारक करावे. चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान वापरून शोधमोहीम राबवावी. या सर्व वावी राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने 'बाल तस्करी रोखणे ही केवळ केंद्राची नव्हे, तर राज्यांचीही प्राथमिक जबाबदारी आहे', हे सर्वोच्च न्यायालयाने ठामपणे सांगितले आहे. त्यामुळे राज्यांनी याकडे दुर्लक्ष केले, तर मुलांचे भविष्य धोक्यात येईल, याचा विचार प्रत्येक राज्यांनी करायला हवा.

# 'कॉर्पोरेट जिहाद' वास्तव, वाद आणि विश्लेषण

अलीकडच्या काळात 'कॉर्पोरेट जिहाद' हा शब्द काही घटनांनंतर चर्चेत आला असून, त्याभोवती सामाजिक आणि राजकीय वाद निर्माण झाले आहेत. विशेषतः काही कथित प्रकरणांमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या शोषणासोबत धार्मिक दबाव किंवा धर्मांतराच्या आरोपांचा उल्लेख झाल्यानंतर या संज्ञेला अधिक प्रसिद्धी मिळाली.

या संदर्भात Nitesh Rँहा आणि उदज्म्र्ष्ह्‌ ईॅर्त्ते यांसारख्या नेत्यांनी 'कॉर्पोरेट जिहाद' हा शब्द वापरून, कॉर्पोरेट क्षेत्रात एक संघटित पद्धतीने महिलांना लक्ष्य केले जात असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, उच्चशिक्षित आणि कामकाजी महिलांवर प्रभाव टाकून त्यांचे मानसिक व सामाजिक शोषण केले जाते.

तथापि, या संज्ञेचा वापर अत्यंत वादग्रस्त मानला जातो. अनेक तज्ज्ञांच्या मते, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण हे प्रामुख्याने सत्तेचा गैरवापर, लैंगिक अत्याचार किंवा व्यवस्थापनातील त्रुटी यांच्याशी संबंधित असते. त्याला धार्मिक किंवा संघटित कटाचे स्वरूप देणे योग्य आहे का, यावर प्रश्न उपस्थित होतात.

कायद्याच्या दृष्टीने पाहता, भारतात 'POSH' कायदा महिलांच्या सुरक्षेसाठी लागू आहे. कोणत्याही प्रकारचे शोषण, दबाव किंवा भेदभाव हा गुन्हा आहे आणि त्यावर कठोर कारवाई होऊ शकते. म्हणूनच, 'कॉर्पोरेट जिहाद' हा शब्द भावनिक आणि राजकीय पातळीवर प्रभावी ठरू शकतो, परंतु प्रत्येक प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक आहे. कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी पुरावे, तपास आणि न्यायप्रक्रिया यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. निष्कर्षतः, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, समानता आणि पारदर्शकता राखणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. कोणतीही घटना धार्मिक किंवा राजकीय चौकटीत बसवण्याऐवजी न्याय आणि सत्य यांवर आधारित विचार करणे समाजासाठी अधिक हितकारक ठरेल.

**विरेंद्र सोनवणे**

# ऊर्जा क्षेत्रात भारताचे अतुलनीय यश!

अलीकडेच, भारताने अणुऊर्जेच्या क्षेत्रात अनेक ऐतिहासिक टप्पे गाठत नवा इतिहास रचला आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे ६ एप्रिल २०२६ रोजी तामिळनाडूतील कल्पक्कम येथील ५०० मेगावॅट क्षमतेच्या प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टरची पहिली क्रिटिकॅलिटी. या घटनेने भारताच्या तीन-टप्प्यांच्या अणुकार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे, ज्यामुळे देशाला आपल्या विशाल थोरियम साठ्याचा उपयोग करून भविष्यात ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण बनणे शक्य होईल. ६ एप्रिल रोजी रात्री ८:२५ वाजता, या रिक्टरने पहिली दीर्घकाळ टिकणारी अणुसाखळी अभिक्रिया सुरू केली. ही जगातील सर्वात प्रगत रिक्टरपैकी एक आहे, जी वापरलेल्या इंधनापेक्षा जास्त इंधन तयार करते. रशियानंतर हे तंत्रज्ञान यशस्वीपणे चालवणारा भारत दुसरा देश ठरला आहे. हे तंत्रज्ञान भारतीय नाभिकीय विद्युत निगम लिमिटेड द्वारे संपूर्णपणे भारतातच डिझाइन आणि विकसित केले गेले आहे. भारताने अणुऊर्जा क्षेत्रात जागतिक स्तरावर एक मोठा टप्पा गाठला आहे. ही ३-टप्पीय अणुऊर्जा कार्यक्रमातील दुसरी महत्त्वाची पायरी असून, यामुळे थोरियमवर आधारित ऊर्जा निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे भारत



स्वयंपूर्णतेकडे वेगाने वाटचाल करत आहे.

**अणुऊर्जा क्षेत्रातील भारताच्या यशाचे महत्त्वाचे पैलू:-** कलपक्कममधील ५०० मेगावॅटचा स्वदेशी फास्ट ब्रीडर रिक्टर सक्रिय झाल्यामुळे भारत अशा प्रगत तंत्रज्ञान असलेल्या मोजक्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे.

**थोरियमचा वापर:** या रिक्टरमुळे देशात विपुल प्रमाणात उपलब्ध असलेल्या थोरियमचा वापर करून ऊर्जा निर्मिती करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येण्यास सुरुवात झाली आहे .

ऊर्जा सुरक्षा: फास्ट ब्रीडर रिक्टर वापरलेल्या इंधनापेक्षा जास्त इंधन तयार करू शकतात, ज्यामुळे भारताची दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा मजबूत होणार आहे.

स्वच्छ ऊर्जा: ५० टक्क्यांहून अधिक वीज निर्मिती क्षमता आता बिगर-जीवाश्म स्त्रोतांतून येत असून, अणुऊर्जा हे यातील प्रमुख स्वच्छ ऊर्जा स्त्रोत आहे .

**खाजगी क्षेत्राला संधी:** सरकारने अणुऊर्जा निर्मितीमध्ये खाजगी क्षेत्राला गुंतवणुकीची परवानगी दिली आहे, ज्यामुळे २०२५-२०३५ या काळात या क्षेत्रात मोठी क्रांती अपेक्षित आहे.

**लक्ष्य २०४७:** भारत २०२४७ पर्यंत अणुऊर्जा क्षमता किमान १०० गिगावॅट पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवून वाटचाल करत आहे.

भारताची ही प्रगती केवळ वीज निर्मितीसाठी नाही, तर 'विकसित भारत' घडवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर ऊर्जा महासत्ता बनण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. भारत सर्व चाचण्यांमध्ये यशस्वी झाला आणि व्यावसायिक ग्रीडशी जोडला गेला तर रशिया नंतर व्यावसायिक स्तरावर फास्ट ब्रिडर रिक्टर चालवणारा भारत जगातील दुसरा देश ठरेल हे भारताच्या त्रिस्तरीय अणुऊर्जा कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील सर्वात मोठे यश आहे जे भविष्यात भारताच्या अफाट थोरियम साठ्याचा वापर करण्याचा मार्ग सुकर करते फास्ट ब्रिडर तंत्रज्ञान अत्यंत क्लिष्ट आहे अमेरिका फ्रान्स आणि जपान सारख्या प्रगत देशांनीही तांत्रिक व आर्थिक कारणांमुळे त्यांचे कार्यक्रम बंद केले आहेत. अशा परिस्थितीत भारताचे हे यश अतुलनीय आहे.

भारताकडे जगातील केवळ एक टक्का युरिनियमचा साठा आहे मात्र जगातील एकूण थोरियम पैकी २५टक्के साठा एकट्या भारतात आहे सध्या भारत ऊर्जेसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे परंतु या रिक्टरच्या यशामुळे भारत आपल्या थोरियम साठ्यातून पुढील चारशे वर्षापर्यंत५०० गिगा वॅट वीज निर्माण करू शकेल यामुळे भारत परदेशी इंधनाशिवाय अणुऊर्जेत पूर्णपणे आत्मनिर्भर होईल. देशातील स्वस्त आणि मुबलक वीज मिळाल्यास स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल, आणि डिझेलवरील आपले अवलंबित्व कमी होईल. तसेच पश्चिम आशियातील तणाव किंवा लाल समुद्रातील संकटासारख्या जागतिक घडामोडींमुळे उद्भवणाऱ्या तेल आणि गॅसच्या टंचाईपासून भारताची अर्थव्यवस्था सुरक्षित होईल त्यामुळे भारत ऊर्जा क्षेत्रातही आत्मनिर्भर होईल!

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

## हुंडाप्रथा घातकी...

आई बाबांची लाडकी
लेक चालली सासरी
हृदयात घालमेल,
वरपांगी ती हासरी ...

पाठवण लाडकीची
खूप आनंदाने केली
कुठे काही कमी नको
वधुपक्ष शब्द झेली...

काही दिस आनंदाचे
सासरचे सांगे वारे
पैशासाठी लावी नांदा
मनी साठवेच सारे...

मारठोक, शिव्याशाप
रोज खावून थकता
मायबापा त्रास नको
दुःख सही, ती जाणता...

लेक माहेरची शान,
जीवातला जीव जाण
त्रास साहवेना जेंव्हा
दिला विहिरीत प्राण...

हुंडाबळी गुन्हा ठरे
दोषी भोगतील शिक्षा
पण लेक कशी आणु?
द्या हो लेकराची भिक्षा..

सुन मुलासाठी आणी
वंशवृध्दी, कुलवधु
तिला त्रास देण्याआधी
लेक तिच्यातच बघू....

**ॲड.सुलभा गोगरकर,**
अमरावती

# ग्रेस नावाचं गारूड

## समीक्षण

वलयांकित शास्त्रीय गायकांच्या मैफिलीला नट्टापट्टा करून पुढच्या रांगेतील तिकीट काढून फक्त शरीराने हजर असलेले त्यानंतर त्या मैफिलीचे किस्से रंगवून सांगत असतात तेंव्हाच, कुठेतरी कोपऱ्यात बसलेले रोजच्या कपड्यातले रसिक निःशब्दपणे डोळे झाकून ती मैफल काळजात साठवून ठेवत असतात. अशी काळजात साठवून ठेवणारी माणसं जेंव्हा एकमेकांना भेटतात तेंव्हा मैफिलीचा विषय निघताच धो धो कोसळत, एकमेकांना चिंब भिजवतात, हसतात
रडतात, एकमेकांना सावरत असतात, त्या पावसाचा अनुभव घेण्यासाठी आतुरलेल्या इतरांनाही त्यात सामील करून घेतात...

'ग्रेस नावाचं गारूड' या पुस्तकातील तो वलयांकित गायक म्हणजे कवी ग्रेस, ते रोजच्या कपड्यातील रसिक म्हणजे या पुस्तकातील लेखांचे लेखक ( यातील प्रत्येकजण स्वतःची मैफल जमवण्याएवढा कसबी आहे ,ही वस्तुस्थिती) आणि या पुस्तकाचे वाचक म्हणजे आपण त्या आतुर इतरांच्या यादीतील एक! कवी ग्रेस उर्फ माणिक सीताराम गोडघाटे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह ...

ग्रेस नावाचं गारूड.....ग्रेस बस्स नाम काफी है, ग्रेस नावातच गुढ आहे, नावाचे गारूड आहे कारण ते ग्रेस आहेत. कशीही फिरवून मांडणी करा ग्रेस कळतात ही, आणि कळत नाहीतही, हा पाठशिवणीचा खेळ या पुस्तकातील प्रत्येक लेख वाचताना चालूच रहातो.

माणूस स्वतःला तरी कधी ओळखू शकतो का?( इतरांचे सोडून द्या ) ग्रेस जन्मभर स्वतःला आणि इतरांना हाच प्रश्न विचारत, कधी सापडलेली उत्तरे सांगत, कधी न सापडलेली उत्तरे मागत जगले, त्याचा 'कॅलिडोस्कोपिक व्ह्यू म्हणजे ग्रेस नावाचे गारूड.

सत्तावीस जणांनी लिहिलेला हा मजकूर नववाचकाला 'ग्रेस 'हे काय प्रकरण आहे हे शोधायला भाग पाडेल असा आहे. मामासाहेब घुमरे – ( माजी संपादक , नागपूर तरुण भारत) लिहितात एका दिवाळी अंकासाठी संपादकाने ग्रेसना कविता मागितली तेंव्हा ते म्हणाले...'आदेशच आला नाही,.. वरुन आदेश आल्याशिवाय लिहित नाही. कविता ही त्या ईश्वराने माझ्या एकांताचा सोबती म्हणून देऊ केलेले वरदान आहे. ते इतरांसारखे खरडून टाकत नाही. आकाशातून वीज कडाडून खाली येते ना, तशी कविता माझ्या कडे येते, माझ्यात भिनते मग ती कागदावर उतरते.

रामदास भटकळ लिहितात, ग्रेस समजून घ्यायला काही युक्त्या असल्या तरी पूर्णपणे त्याची कविता समजून घेणे कठीण आहे.

पहिली युक्ती-त्यातील इंद्रियगोचर संवेदनांना आपल्या मनात झंकारू द्यायचे का? ते माहीत नाही.

दुसरी युक्ती-ग्रेसच्या कवितेत अनेक कलाकृतींतील व्यक्तींचे संदर्भ येतात ते समजून घेण्यासाठी संवेदना निर्माण व्हायला हवी.

तिसरी युक्ती-ग्रेसचा शब्दसंभार. ग्रेस जुन्या नव्या शब्दांचा उपयोग करतात त्यांचा अर्थ शब्दकोशात सापडणार नाही, तो स्वतःच्या मनाच्या कोपऱ्यातच शोधावा लागतो. आपल्याला सापडला तोच अर्थ असे मानावे लागते आणि तरी ग्रेसला काय म्हणायचे हे कळत नाही. ग्रेसचे लेखन हे जिगसॉ खेळाचा प्रत्यय देणारे आहे.



महेश एलकुंचवार- लिहितात, त्याची कविता बुध्दीने समजून घेण्याची गोष्टच नाही, ती अनुभवण्याची गोष्ट आहे. त्याच्या कवितेला असलेल्या अंगभूत लयीतून, अनवट प्रतिमांमधून तो जी स्वप्नभूमी जागी करतो ती फार थोड्या कवींना साधते. दृश्य शब्दांच्या खाली अनेक गुढ व अनाम अनुभवांचे पाणी सारखे हिंदकळत असते. हा अनुभव आदिम आहे व तात्कालिकतेच्या पलिकडे जाऊन चिरंतनालाच गळामिठी मारतो. तो कलावंत होता आणि कलावंताला आभाळाएवढे मोठे व्हावे लागते, हेच आपले कवी म्हणून ब्रीद आहे हे ग्रेसना माहिती होते.

सुरेश द्वादशीवार-लिहितात, या आत्मनिष्ठ माणसाला आपल्या प्रत्येक शब्दाचे मोल आणि वजन यांची जबर जाणीव होती. तो उच्चारायचा कसा, लिहायचा कसा आणिआपल्या रचनेतले त्याचे नेमके स्थान कोणते याची विलक्षण दक्षता तो घ्यायचा. ज्याला शब्द कळतो त्याला जीवनही कळलेले असते. त्यामुळे याचा शब्द अर्थाचा गर्भहोऊनच प्रकट होत राहिला. आपल्या कवित्वाएवढे आपल्या उंचीचे व स्वतःच्या एकलेपणाचे भान असणारा ग्रेस एवढा मोठा कवी मराठीत दुसरा नाहीही.

श्रीमती वीणा आलासे- लिहितात, काही तरी होते त्यांच्यात, कुठल्याही अनुभवातून हीणत्व काढून ते निर्मितीच्या क्षणी मन स्वच्छ व मुक्त ठेवू शकत होते .

नारायण कुलकर्णी कवठेकर- लिहितात, ग्रेस, प्रवीण म्हणाला, कवितेवर नाही. ग्रेस या व्यक्तीवर लिही, पण कवितेशिवाय तुम्ही संभवतच नाही. म्हणून तुमची आठवण अशी काढतो-तुमचेच शब्द तुमच्यापर्यंत पोचतील का नाही मला माहीत नाही. मी थांबतो ग्रेस, नाही तर मला रडू येईल..

या इथे झाडांना उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशात...मी जेव्हा ईश्वरी करुणांची स्तोत्रे म्हणू लागतो; मावळतीला, शेवटच्या किरणांची फुले समुद्राच्या दिशाहीन पाण्यात बुडून जातात...कुठे जातात?

डॉ शिरीष गोपाळ देशपांडे - लिहितात, बाळबोध कवितेला चटावलेली रसिकता आणि गुढ आध्यात्मिकतेला कवटाळून बसलेली उच्चभ्रू विद्वत्ता यांच्यासाठी ग्रेस यांची कविता म्हणजे बर्फगार ज्वालामुखीचा जहर डोस होता, यांत शंका नाही. सावकाश कालांतराने रसिकतेला आकलनाची जोड मिळाली व ग्रेस थोडेफार कळू लागल्याचा भास झाला, म्हणून ठीक अन्यथा तो शोकेसमध्ये चिणून बंद करण्याजोगा कवी उरला असता आणि दुःखाच्या कवीला हे लौकिक दुःख ही सोसावे लागले असते.

अरुणा ढेरे लिहितात, ग्रेस यांचे झपाटलेपण निराळे होते. उजेडही नाही अंधार ही नाही, अशी संध्याकाळची वेळ ही माणसांची वेळ नसते अशी आपल्याकडची जुनी समजूत आहे. ती प्राचीन शक्तींच्या जागरणाची वेळ असते, आत्मे जागे होण्याची वेळ असते. त्यावेळच्या विजेसारख्या संधी रेषेवर ग्रेस उभे राहिले आणि त्यांनी तो निर्मितीशक्तीला आवाहन करणारा बीजमंत्र उच्चारला. मग धुसरातून त्यांच्याकडे एक विलक्षण दुःखदग्ध असेआकारहीन, विकारशरण असे अर्थसंचित चालत आले आणि त्याने त्यांच्या कपाळावर आपली एक रक्तखूण उमटवली . त्यांना मिळालेल्या प्रतिभेचा तो शाप ही होता आणिवर ही होता.

शुभा गोखले लिहितात, 'शोखियो मे घोला जाये फुलोंका शबाब, उसमे फिर मिलाई जाये थोडीसी शराब' अशी काही सिक्रेट रेसिपी होती का तुमची?

एक चमचाभर वास्तव घेऊन ते पेलाभर दुःखात रातभर भिजत ठेवणे, सरणाच्या विस्तवावर ते आटवून कवटीत काढून हाडाच्या बत्त्याने ते बारीक कुटणे व त्यात रक्त, पेशी, आतडी यांचे मिश्रण करून कवीची त्वचा सोलून त्यात हे मिश्रण भरून बाभळीच्या काट्याने ते शिवूनही पुरचुंडी संधीप्रकाशात सात दिवस ठेवणे, यावर धुके पसरवून थोडा नक्षत्रांचा चुरा पेरुन ते रसिकांना देणे'

होगा यु नशा जो तय्यार वोह तो ग्रेस की कविता है!'

प्रवीण बर्दापूरकर लिहितात, इतक्या वर्षानंतर ग्रेस मला कळाले आहेत असा माझा तिळमात्र दावा नाही. पस्तीस वर्षेमैत्री असणे खरे तर तो माणूस समजण्यासाठी पुरेसंच नाही तर पुरुनही उरणारे आहे. खरेतर, मनात खोलवर रूजलेला पण, मुळीच आकलन न झालेला आत्ममग्न कवी-माणूस असेच वर्णन ग्रेस यांचे करावे लागेल.

श्रीकांत बोजेवार लिहितात, ग्रेस म्हणजे पारा आहेत. ग्रेस आणि त्यांची कविता, हे दोन्ही सहजी हाती लागत नाहीत आणि लागले तरी ते हाती लागल्याचे समाधान लाभू देत नाहीत; कारण त्यांना नेमके काय म्हणायचे असावे याचा आपण कयास बांधावा तो वर त्या ओळीचा आधी लागलेला अर्थ उडून गेलेला असतो, मग नवा अर्थशोधण्यासाठी आपली पुन्हा धडपड सुरू होते.

याशिवाय विश्वास वसेकर, दिनकर बेडेकर, बबन नाखले, आशुतोष शेवाळकर, शशिकांत सावंत, प्रल्हाद जाधव, सतीश सोळांकूरकर, अंजली अंबेकर, श्रद्धा बेलसरे-खारकर, दिलीप गौर, अमर रामटेके, स्वानंद बेदरकार, सुदेश हिंगलासपूरकर, प्रा. विलास जाधव, म.गो.हस्तक दीपक आगवण, निरंजन मार्कंडेयवार यांनीही त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहेत.

आपल्या आत्ममग्न प्रतिमेचा आणिप्रतिभेचा अभिमान बाळगणारे ग्रेस आपल्याला कसे गवसले आणि कसे गवसलेले नाहीतही, याचा या सगळ्यांनी घेतलेला शोध आपल्या समोर येतो. ग्रेस काळजात साठवून ठेवलेल्या ग्रेस भक्तांनी तर वाचलच पाहिजे, पण कोण हे ग्रेस, त्यांच्यावर एवढे लेख? असा प्रश्न पडणारे वाचक लेखक कवी यांनीही हे पुस्तक वाचायलाच हवे. ग्रेसांच्या गुणदोषांसकट त्यांचे व्यक्तीचित्र आणि त्यांच्यातला गूढ कवी लेखक दोन्हीही शब्दबद्ध करताना स्वतःला पडणाऱ्या मर्यादा मान्य करत हे ग्रेस गारूड त्यांनी शब्दबद्ध केले आहे. आपल्यालाही ते आपलसे वाटेल म्हणूनच नक्की वाचा.

**डॉ श्रीकांत कामतकर**
सोलापूर

ग्रेस नावाचं गारूड-तिसरी आवृत्ती
संपादक-प्रवीण बर्दापूरकर
प्रकाशक-देशमुख आणि कंपनी पुणे
पाने २४६
किंमत-३५०

### रामनगर वासियांचे दशकांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी

# लीजधारकांना फ्रीहोल्ड प्रमाणपत्र वाटप

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांचा पुढाकार

**वर्धा/जनमाध्यम**

रामनगर परिसरातील नागरिकांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला भूखंडांच्या लीज नूतनीकरणाचा आणि मालकी हक्काचा प्रश्न अखेर मार्गी लागला. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते लीजधारकांना फ्रीहोल्ड प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. नगाजी महाराज देवस्थान येथे झालेल्या या कार्यक्रमाला नगराध्यक्ष सुधीर पांगूळ, उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर, मुख्याधिकारी विजय देशमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.



रामनगरमधील भूखंडांची लीज १९३० पासून अस्तित्वात होती. मात्र, लीज संपल्यानंतर कागदपत्रांच्या अडचणी, कायदेशीर गुंतागुंत आणि तांत्रिक बाबींमुळे नागरिकांना मालकी हक्क मिळत नव्हता. या समस्येवर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर राज्य सरकारने विशेष निर्णय घेत हा प्रश्न सोडवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाने नाममात्र दरात आणि कोणत्याही जाचक अटींशिवाय लीजधारकांना फ्रीहोल्ड करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या प्रक्रियेत कोणत्याही नागरिकाला अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली जात असल्याचे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे रामनगरच्या विकासाला चालना मिळणार असून नागरिकांना स्थैर्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# 'ग्रीन टॅक्स'च्या नावाखाली वाहनधारकांची कोंडी, सरकारचा नवा फटका

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्याच्या नावाखाली सरकारने आता सर्वसामान्य वाहनधारकांच्या खिशालाच चांगलाच चटका दिला आहे. महाराष्ट्र मोटार वाहन कर (दुरुस्ती) विधेयक २०२६ मंजूर करत जुन्या वाहनांवर 'ग्रीन टॅक्स'चा बोजा जवळपास दुप्पट करण्यात आला असून, हा निर्णय म्हणजे नागरिकांवर लादलेला आणखी एक आर्थिक डोंगरच ठरत आहे.

नव्या नियमांनुसार, वाहनाच्या पहिल्या नोंदणीनंतर १५ वर्षे पूर्ण होताच दर पाच वर्षांनी कर आकारणी होणार आहे. वाहनाचा प्रकार, इंधन आणि उत्सर्जनाच्या आधारे कर ठरवला जाणार असल्याने जुनी वाहने वापरणाऱ्यांना अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी उपाय असा दावा सरकार करत असले तरी प्रत्यक्षात हा निर्णय म्हणजे खिशावर डल्ला, अशीच भावना वाहनधारकांमध्ये व्यक्त होत आहे.

एकीकडे कराचा बोजा वाढवायचा, तर दुसरीकडे पर्यायी सोयीसुविधा कितपत उपलब्ध करून दिल्या आहेत, हा मोठा प्रश्न आहे. इलेक्ट्रिक वाहनांचे गोडवे गाताना चार्जिंग स्टेशनची कमतरता, महागडी ई-वाहने आणि ग्रामीण भागातील अपुरी पायाभूत सुविधा याकडे सरकार डोळेझाक करत असल्याची टीका होत आहे.

सरकारने 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५' जाहीर करत इमारतींमध्ये चार्जिंग सुविधा अनिवार्य करण्याचा गाजावाजा केला आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीची गती मंदच आहे. अटल सेतूसह काही पथकर नाक्यांवर ई-वाहनांना टोलमाफी देण्याची घोषणा झाली असली तरी सर्वसामान्य नागरिकांसाठी ती कितपत उपयोगाची ठरणार, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

प्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहे, यात शंका नाही. मात्र त्यावर उपाय म्हणून केवळ कराचा फास आवळणे आणि जनतेला आर्थिक कोंडीत पकडणे, हा मार्ग कितपत योग्य, असा प्रश्न आता जोर धरू लागला आहे. सरकारने केवळ कर वाढवण्यापेक्षा पर्यावरणपूरक पर्याय सहज, स्वस्त आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे गरजेचे आहे, अन्यथा 'ग्रीन'च्या नावाखाली जनतेचा 'रेड सिग्नल'च लागणार, हे नक्की.

## संक्षिप्त

### हनुमान मंदिरातील दानपेटी फोडून रोकड लंपास

**वर्धा-** शहराजवळील नागठाणा येथील हनुमान मंदिरात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत दानपेटी फोडून अंदाजे २० ते २५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. मंदिर सेवा मंडळाच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. मंदिरातील साफसफाईचे काम करणारा कर्मचारी मागील खोलीत वास्तव्यास असताना रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर दानपेटी फोडून त्यातील रक्कम घेऊन पसार झाले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन संशयित दिसून आले असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### भरधाव दुचाकीची धडक; पादचारी गंभीर जखमी

**देवळी-** कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात भरधाव दुचाकीच्या धडकेत एक पादचारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. विजय तेलंग (रा. देवळी) हे पायी जात असताना वेगाने येणाऱ्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, तेलंग यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी दुचाकी चालक पीयूष वाघमारे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. शहरात वाढत्या वेगामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### कत्तलीसाठी नेली जाणारी गुरे पकडली; वाहनासह मुद्देमाल जप्त

**तळेगाव (शा. पंत)-** कत्तलीसाठी नेली जात असलेल्या चार गुरांची पोलिसांनी सुटका करत मोठी कारवाई केली. पारडी बसस्थानक परिसरात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, गुरांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून संशयित वाहन अडवून तपासणी केली असता त्यात गुरे आढळून आली. पोलिसांनी तत्काळ गुरांची सुटका करून वाहनासह सुमारे ४ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी शंकर सुरजुसे, अजय चरडे व शैलेश बालपांडे (रा. कारंजा) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### सर्पदंशाने शेतकऱ्याचा मृत्यू

**वडनेर-** शेतात काम करत असताना सर्पदंश झाल्याने एका वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. नागोराव गायकवाड (६१, रा. फुकटा) हे स्वतःच्या शेतात कापूस वेचणी करत होते. यावेळी अचानक सर्पदंश झाल्याने त्यांची प्रकृती बिघडली. तातडीने उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वडनेर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. शेतात काम करताना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### जम्मू-काश्मीर दौऱ्यात शिक्षण व क्रीडा विकासाचा आढावा

# खा.अमर काळे संसदीय समितीसह सक्रिय

## सीएसआरच्या माध्यमातून स्वदेशी व हिवाळी खेळांना चालना

**वर्धा/जनमाध्यम**

देशातील शालेय शिक्षण व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि क्रीडा विकासाचा सर्वांगीण आढावा घेण्यासाठी संसदेच्या शिक्षण, महिला व बालकल्याण, युवा व क्रीडा स्थायी समितीचा जम्मू-काश्मीर दौरा पार पडला. या समितीत सदस्य असलेले खासदार अमर शरदराव काळे यांनी शिक्षणातील अडचणी, विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने आणि क्रीडा क्षेत्रातील संधी यावर ठोस मते मांडली.

दौऱ्याच्या पहिल्या दिवशी श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात उच्च शिक्षण विभाग, भारत सरकार, जम्मू-काश्मीर प्रशासन, केंद्रीय विद्यापीठ, एनआयटी श्रीनगर तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय सेवा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. या बैठकीत उच्च शिक्षण संस्थांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणी, मनुष्यबळाची कमतरता, प्रशासकीय अडथळे आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षण संस्थांना सक्षम करण्यासाठी वित्तीय सहाय्य अधिक प्रभावी करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.यानंतर शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत दुर्गम भागातील शाळांची कमतरता, डिजिटल साधनांचा अभाव, शिक्षकांची रिक्त पदे आणि विद्यार्थ्यांची गळती या मुद्द्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याबाबत चर्चा झाली.

दुसऱ्या दिवशी युवा व क्रीडा क्षेत्रावर भर देण्यात आला. नेहरू युवा केंद्र संघटन आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. युवकांना संघटित करून त्यांच्या उर्जेचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी कसा करता येईल, यावर समितीने विचारमंथन केले. तसेच युवक कार्य व क्रीडा मंत्रालय आणि जम्मू-काश्मीर प्रशासन यांच्यात समन्वय वाढवण्यावर भर देण्यात आला. जम्मू-काश्मीरमध्ये हिवाळी क्रीडा प्रकारांना मोठी संधी असून, स्कीइंग व माउंटेनिअरिंगसारख्या खेळांच्या विकासासाठी शासनाबरोबरच णएं निधीचा प्रभावी वापर करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. पहलगाम येथील जवाहर इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग अँड विंटर स्पोर्ट्स तसेच गुलमर्ग येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कीइंग अँड माऊंटेनिअरिंग यांच्या माध्यमातून क्रीडा प्रशिक्षणाला चालना देण्याबाबत चर्चा झाली.

या दौऱ्यादरम्यान खासदार अमर काळे यांनी श्रीनगर येथील नेहरू युवा केंद्रालाही भेट दिली. युवकांमध्ये कौशल्यविकास, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी वाढवण्यासाठी या संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. एकूणच, शिक्षण व क्रीडा क्षेत्रात



समन्वय साधून नव्या पिढीला सक्षम करण्याचा उद्देश या दौऱ्यामागे असल्याचे स्पष्ट झाले. शासन, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नातून शिक्षणाची गुणवत्ता उंचावून क्रीडाक्षेत्रात नव्या संधी निर्माण करण्याचा मार्ग या दौऱ्यामुळे मोकळा होणार असल्याचे संकेत मिळाले.

### हमालीच्या वादातून मारहाण

**देवळी-** हमालीच्या कामावरून झालेल्या वादातून एका इसमाला मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. अनिल पेंदोर (३४, रा. मुरदगाव) याला गावातील किसना करपे याने मारहाण केली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अनिल पेंदोर याला हमालीसाठी पाठविण्यात आले होते. कामावरून परत आल्यानंतर मजुरी परवडत नसल्याचे सांगत यापुढे असे काम देऊ नये, असे त्याने करपे याला स्पष्ट केले. यामुळे संतप्त झालेल्या करपे याने अनिलवर हल्ला चढविला. यात अनिल जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

#### गळफास घेऊन आत्महत्या

**देवळी-** तालुक्यातील वायगाव (निपाणी) येथे एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. राजू कांबळे (४१) यांनी स्वतःच्या घरी गळफास घेत जीवन संपविले. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. गावात शोककळा पसरली आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने बालकांच्या असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रणासाठी सामंजस्य करार

**मुंबई/जनमाध्यम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांमधील असंसर्गजन्य आजारांवर (एनसीडी) प्रभावी नियंत्रणासाठीनागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. कराराच्या माध्यमातून बालकांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने ठोस पाऊल या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे आरोग्य हे राज्याच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही केवळ आरोग्य क्षेत्राची जबाबदारी नसून समाजाची एकत्रित बांधिलकी आहे. या कराराच्या माध्यमातून आपण मुलांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ



वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकत आहोत.

हा करार नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत करण्यात आला असून, या अंतर्गत राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये चाइल्डहुड एनसीडी क्लिनिक्स स्थापन व कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या उपक्रमातून टाईप-१ मधुमेह, जन्मजात हृदयरोग, दमा, स्थूलता, सिकलसेल, मानसिक आरोग्य आणि विकासात्मक विकार यांसारख्या आजारांचे प्रतिबंध, लवकर निदान आणि प्रभावी उपचार सुनिश्चित करण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मानकीकृत उपचार पद्धती, डेटा संकलन प्रणाली आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यावर विशेष भर दिला जाणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेले हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारांमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच डॉ प्रशांत जोशी, एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक, डॉ मीनाक्षी गिरीश, बालरोग तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते. एम्स, नागपूर संस्थेचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

## रानमेवा नामशेषाच्या उंबरठ्यावर; जंगल ओस, परंपरा हरवण्याच्या मार्गावर

**सेलू/जनमाध्यम**

उन्हाळा सुरू होताच ग्रामीण भागातील मजूर वर्ग जंगलात जाऊन रानमेवा गोळा करण्याची परंपरा वर्षानुवर्षे टिकून होती. चारोळी, टेंभुर, खिरणी, करवंद, कवठ, मोहफुल, चिंच यांसारख्या नैसर्गिक देणगीवर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. मात्र बदलत्या काळात ही परंपरा आता लोप पावत असून रानमेवा दुर्मिळ होत चालल्याचे चित्र समोर येत आहे.


उन्हाळ्यात जंगल ओस पडत असल्याने रानमेवा मिळणे कठीण झाले आहे, तर पावसाळ्यातही परिस्थिती फारशी वेगळी नाही. शेतीमध्ये तणनाशकांच्या वाढत्या वापरामुळे तरवटा, कुंजळ, जीवतीची फुले, काटवल, फांद यांसारख्या वनभाज्या हळूहळू नाहीशा होत आहेत. परिणामी, ग्रामीण भागातील नैसर्गिक अन्नसाखळीच धोक्यात आली आहे.

पूर्वी गावालगतच्या शेतांमध्ये आंब्याची मोठी झाडे असायची. कैरीची चव ही ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग होती. मात्र आता शेतीचे लेआऊटमध्ये रूपांतर होऊन निवासी वसाहती उभ्या राहत आहेत. यामुळे झाडांची संख्या घटली असून रानमेव्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

दरम्यान, बदलत्या जीवनशैलीचा परिणाम नव्या पिढीवरही दिसून येत आहे. फास्टफूड संस्कृतीमुळे रानमेव्याकडे दुर्लक्ष होत असून पोषक अन्नापासून तरुणाई दूर जात आहे. तरीही काही ज्येष्ठ नागरिक आजही या पारंपरिक चवीच्या शोधात जंगलाची वाट धरताना दिसतात.

### रोजगारावरही परिणाम

पूर्वी टेंभुर्णी व पळसाच्या पानांपासून पत्रावळी तयार करून अनेकांना रोजगार मिळत होता. लग्नसमारंभात या पत्रावळींना मोठी मागणी होती. मात्र कॅटरिंग पद्धतीच्या वाढत्या वापरामुळे ही परंपरा मागे पडली असून संबंधित कुटुंबांचे उत्पन्नही घटले आहे. वनसंवर्धन आणि नैसर्गिक संपत्तीचे जतन करणे ही काळाची गरज बनली असताना, प्रशासन आणि समाजाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.



# वसतीगृहासाठी जागा उपलब्ध करुन निधीसाठी प्रस्ताव सादर करा-संजय शिरसाट

## समाज कल्याण विभागाची आढावा बैठक, रोबोटच्या माध्यमातून देणार विद्यार्थ्यांना शिक्षण

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक न्याय विभागामार्फत सुरु असलेल्या सर्व शासकीय वसतीगृहाच्या इमारती ह्या शासकीय असाव्यात. ज्या वसतीगृहाच्या इमारती खाजगी इमारतीमध्ये भाडेतत्वावर आहे. त्यासाठी तात्काळ जागा उपलब्ध करुन घ्याव्या तसेच जीर्ण झालेल्या इमारतीच्या नवीन बांधकामाकरीता प्रस्ताव सादर करावा,अशा सूचना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज समाज कल्याण विभागाच्या आढावा बैठकीत दिल्यात.

जिल्हाधिकारी कार्यालयात समाज कल्याण विभागाच्या कामकाजाचा आढावा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी



घेतला. यावेळी त्यांनी सुचना केल्या. बैठकीला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अपर जिल्हाधिकारी संजय तेली, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष दत्तप्रसाद नडे, समाज कल्याण उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर,जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य तथा उपायुक्त जया राऊत,डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठाण नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर आदी उपस्थित होते.

राज्य शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत बौध्दगया, अयोध्या तसेच इतर धार्मिक स्थळासाठी दुसऱ्या टप्प्याला सुरवात करण्यात येणार असून राज्यातून नागपूर, संभाजीनगर व मुंबई येथून मे महिन्यात रेल्वे सोडण्यात येणार आहे. वर्धा जिल्ह्यातील लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी या योजनेची जनजागृती करुन जास्ती जास्त नागरिकांना कसा लाभ देता येईल यासाठी प्रयत्न करावे किमान ८०० लार्भार्थ्यांचे नियोजन करावे, अशा सुचना संजय शिरसाट यांनी दिल्यात.बऱ्याचशा शाळेत मुलांना शिकविण्यासाठी शिक्षकांची कमतरता आहे.

### विद्यार्थ्यांसाठी वातानुकूलित अभ्यासिक मंजूर करावी - डॉ.पंकज भोयर

मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या वसतीगृहांची क्षमता वाढवून दिली तसेच नवीन दोन मुलींची वसतीगृह इमारत मंजूर केल्याबद्दल पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सामाजिक न्यायमंत्र्यांचे आभार मानले. सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीवर वर्धेतील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज आणि वातानुकूलित अभ्यासिका मंजूर करावी. वर्धा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या पुढील विकासासाठी आणि देखभालीसाठी विशेष निधीची तरतूद करावी. अशा मागण्या पालकमंत्र्यांनी यावेळी केल्या.

रोबोटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रायोगिक तत्वावर नागपूर येथून हा उपक्रम लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे शिरसाट म्हणाले. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या निधीमधून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे एआयच्या माध्यमातून सर्वेक्षण करा. आवश्यक असणाऱ्या निधीचा तातडीने प्रस्ताव सादर करा, असे त्यांनी सांगितले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १३५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# डॉ.पंजाबराव देशमुख हे काळाच्या पुढचा विचार करणारे नेते होतेः डॉ.केशव तुपे

## श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत महामानव पर्व

### तक्षशिला महाविद्यालयात आयोजन







**अमरावती :** 'पंजाबराव देशमुख हे काळाच्या पुढचा विचार करणारे नेते होते. तत्कालीन अनिष्ठ प्रथा व रुढी यांच्याविरुद्ध सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ते झपाटलेले होते. त्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी स्नेहाचे आणि जिव्हाळ्याचे बंध होते. अमरावतीचे अंबादेवी मंदिर दलितांसाठी खुले करण्याच्या लढ्यात त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्याला मोठे सहकार्य दिले होते, हे त्यांचे सामाजिक क्रांतीमधील महत्त्वाचे योगदान आहे,'असे प्रतिपादन डॉ. केशव तुपे यांनी केले. तक्षशिला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय, तक्षशिला महाविद्यालय श्याम नगर आणि तक्षशिला महाविद्यालय दारापूर यांच्या संयुक्त विद्यमाने, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सम्राट अशोक यांची जयंती आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून 'महामानव पर्व' हा भव्य वैचारिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे. १० ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान चालणाऱ्या या पाच दिवसीय उत्सवाचा प्रारंभ १० एप्रिल रोजी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृती दिनी अभिवादन करून करण्यात आला.

तक्षशिला महाविद्यालयाच्या अजिंठा सेमिनार हॉलमध्ये आयोजित या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कीर्तीताई राजेश अर्जुन होत्या. मुख्य वक्ते म्हणून शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचे मराठी विभाग प्रमुख डॉ. केशव तुपे उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रा.पी आर एस राव, प्राचार्य डॉ. माधुरी फुले, प्राचार्य, मल्लू पडवाल, प्रा.प्रितेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.तुपे म्हणाले, पुढील काळात भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. राष्ट्रीय स्तरावर त्यांनी आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनाची चर्चा परदेशातही झाली होती. 'विशेषतः, शेती तंत्रज्ञान या विषयात त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. आज ज्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावरून शेतीचा विचार होत आहे, त्याचा विचार पंजाबराव देशमुखांनी त्या काळातच केला होता,' असे डॉ. तुपे यांनी अधोरेखित केले.

आजच्या युवा पिढीला मार्गदर्शन करताना डॉ. तुपे म्हणाले की, 'केवळ तंत्रज्ञानाच्या मागे धावून चालणार नाही. भारतामध्ये ज्या समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनासाठी लढा दिला, त्यांचे विचार नवीन पिढीला देणे आवश्यक आहे. जेव्हा तंत्रज्ञान आणि या महापुरुषांचे विचार एकत्र येतील, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने प्रगतीपथावर जाईल.'

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात कीर्तीताई अर्जुन म्हणाल्या 'डॉ. केशव तुपे यांचे विचार ऐकून आमच्यातही परिवर्तन झाले आहे. या विचारांचा उपयोग आम्ही आमच्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगी विकासासाठी करू,' असे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १० ते १४ एप्रिल पर्यंत आयोजित या महामानव पर्वाचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शितल तायडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सारिका दांडगे यांनी केले.

या पाच दिवसीय महोत्सवात वैचारिक व्याख्याने, संगीत संध्या, एकपात्री प्रयोग, गीत गायन स्पर्धा आणि आरोग्य शिबिरासारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले असून, महामानवांच्या विचारांचा जागर या माध्यमातून केला जात आहे. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रहार जनशक्ती पक्षाकडून महात्मा फुले यांना चित्रा चौकात अभिवादन



**अमरावती:** क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज, ११ एप्रिल रोजी प्रहार जनशक्ती पक्ष अमरावती महानगरच्या वतीने चित्रा चौक येथे सामूहिक अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, प्रशांत देशमुख, अकबर भाई, अभिजीत गोंडाने, संदीप चव्हाण, समीप तायडे, नंदू वानखडे, कुणाल खंडारे, अजय तायडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारांनी प्रेरित होऊन समाजकार्यात अग्रभागी राहण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# जिरे माळी समाज बहुद्देशीय संस्थेतर्फे महात्मा जोतिराव फुले यांना अभिवादन

**अमरावती:** क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त जिरे माळी समाज बहुद्देशीय संस्था, अमरावती यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. अमरावती येथील चित्रा चौक स्थित महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापाशी हा सोहळा पार पडला.



या प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'महात्मा फुले यांनी मांडलेले सत्यशोधक विचार आणि बहुजन समाजाच्या उत्थानासाठी केलेले कार्य हे आपल्या सर्वांसाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल,' अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

कार्यक्रमाची सुरुवात पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी 'महात्मा फुले यांचा विजय असो', 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

या अभिवादन कार्यक्रमाला जिरे माळी समाजातील प्रतिष्ठित नागरिक शिवाजीराव नांदगावकर, वासुदेवराव बोराडे, अविनाशराव भ पंकज सपकाळ, पंकज गोरे, अरुण नांदगावकर, उत्तमराव सपकाळ, किशोर खंडारे, प्रमोद लोमटे गजाननराव मते,, मनिष झिमटे, नंदाबाई नांदगावकर, दिपिका बोरकर,क्षितिजा लायबर, स्वाती नांदगावकर , सावी नांदगावकर, ओवी लायबर,आणि 'सावित्रीबाई फुले फेम ईशानी स्नेहल दिपक नांदगावकर' तसेच

महिला भगिनी व समाज बांधवाची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात



**अमरावती :** येथील श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. पुष्पलता देशमुख सह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी आपल्या मनोगतात महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातीय भेदभाव व अन्याय याविरुद्ध कठोर लढा दिला. स्त्री शिक्षण व शेतकरी, दलित आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन असल्याचे त्यांनी सिद्ध केले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात समता, बंधुता व मानवतेची मूल्ये रुजवावीत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र राऊत यांनी.

# महात्मा फुले हे भारतातील लोकशाही क्रांतीचे अग्रदूत - डॉ.कुमार बोबडे

## -श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात 'समता पर्व'चे आयोजन

**अमरावती –** महात्मा जोतिबा फुले हे भारतातील लोकशाही क्रांतीचे अग्रदूत असून त्यांनी मांडलेले व्यक्तिस्वातंत्र्य आणि समतेचे विचार हे भारतीय राज्यघटनेत समाविष्ट झाले आहेत.त्यांनी मांडलेल्या सामाजिक समतेच्या विचारांचे प्रतिबिंब संविधानाच्या मुलभूत हक्क आणि उद्धेशिकेमध्ये दिसून येते जेथे सर्व नागरिकांना समानतेची हमी देण्यात आली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व जनसंवाद विभागप्रमुख डॉ.कुमार बोबडे यांनी केले.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'समता पर्व' मध्ये 'क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची सामाजिक समता' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. किशोर साबळे हे होते तर डॉ.शिवाजी कानफाडे, अधीक्षक किशोर राजगडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.



महात्मा फुले यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म'हा विश्वकुटुंबवादाचा जाहीरनामा आहे.त्यात भारतीय लोकशाही क्रांतीची मुलभूत तत्त्वे विशद करून सांगितली आहेत.मानवी हक्काची खऱ्या अर्थाने जाणीव करून देणारा हा ग्रंथ आहे,जात, धर्म, पंथ यावरून माणसाने भेदभाव करू नये असे महात्मा फुले यांनी सांगितले होते.संविधानात कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे, असे सांगून कुमार बोबडे यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत ज्या कलमान्वये मांडण्यात आले आहेत त्यांची माहिती दिली. समता, न्याय, स्वातंत्र्य व बंधुता यांचा उल्लेख महात्मा फुले यांच्या प्रत्येक ग्रंथात आला आहे.केवळ विचार मांडून ते थांबले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी समतावादी समाज घडविण्याचा प्रयत्न केला आहे.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कृषिरत्न डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी त्यांची परंपरा पुढे चालविली असून खऱ्या अर्थाने हे दोघेही महात्मा फुले यांचे वैचारिक वारसदार आहेत, असेही ते म्हणाले.

# मालखेड रेल्वे ते दहिगाव धावडे मार्गाची दुरावस्था

## -अडीच वर्षापासुन नुतनीकरणाचे काम प्रलंबित



**अंजनगाव बारी :-** परिसरातील मालखेड (रेल्वे) ते दहिगाव धावडे हा मुख्य मार्ग थेट चांदूर (रेल्वे) जोडला गेला असुन, मालखेड पासून दहिगाव धावडे या मार्गाची दुरावस्था आहे. या मार्गाबाबत परिसरातील गावकऱ्यांनी सन २०२४ पासून नुतनीकरणाची मागणी संबधीत शासणाकडे रेटून धरली आहे. मात्र अडीच वर्षे उलटून अद्यापही नुतनीकरण झाले नाही.

मालखेड रेल्वे हि जवळपासच्या छोट्या गावांची प्रमुख बाजारपेठ असुन रेल्वे स्थानकही आहे. तेव्हा अशा हलाखीच्या मार्गाने दळणवळणासाठी संबंधीत गावकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. यातच दहीगाव धावडे कडे जाणाऱ्या वळणदार रस्त्या वरील नदीजवळील पूलावर १०० मी. रस्ता खोलगट असल्याने किरकोळ अपघातांबरोबर मालवाहु जड वाहणे पलटी झाल्याच्या घटना घडत आहे.

मार्गाची दूरावस्था लक्षात घेता, तात्पुरती डागडुजी करून जाण्या-येण्यास सुविधा होईल असेही म्हणता येत नाही. कारण संपूर्ण रोड उखरलेला आहे. याबाबत गावकऱ्यांनी सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकी आधी संबंधीत आमदारांना याबाबत प्रत्यक्ष तसे लेखी स्वरुपात तक्रार देऊनही आजगायताही त्याचा काही उपयोग नाही. परिसरातील नागरीकांनी? प्रशासनाकडे धाव घेउन या मार्गाबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी जि.प. बांधकाम विभाग यांचे कडे लेखी स्वरूपात तक्रार दिली आहे.

## सायटेशन / जाहिरनामा

### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोशी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क. १७१ /२०२६ ने.ता. ८/५/२०२६

**अर्जदार . १) श्रीमती रत्नाबाई रंगराव खंदारे,** वय ५९ वर्ष, व्यवसाय -घरकाम
**२) श्री.शिवा रंगराव खंडारे,** वय ३९ वर्ष, व्यवसाय -व्यवसाय
**३) वंदना राजु रोकडे,** वय ३४ वर्ष,व्यवसाय -घरकाम
सर्व रा. घोडगव्हाण, ता. मोर्शी, जि. अमरावती. ह. मु. रमाबाई नगर, पत्राशेड, लिंक रोड पूणे शहर पूणे.

**//विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण** दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील नामे **रामराव शामराव खंडारे हे दिनांक ११/१२/२०१७** रोजी Ghodgavhan, Tq.Morshi, Dist-Amravarai येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारसे नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

## सायटेशन / जाहिरनामा

### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क. २६९/२०२६ ने.ता. ८/५/२०२६

**अर्जदार.१) श्रीमती अनिता सचिन हेले,** वय ३७ वर्ष, व्यवसाय -घरकाम
**२) कु.नौमी सचिन हेले,** वय-१५ वर्ष, व्यवसाय -शिक्षण
**३) कु. आराध्या सचिन हेले,** वय-१३ वर्ष, व्यवसाय -शिक्षण
**४) सोहम सचिन हेले,** वय ०६ वर्ष,
अर्जदार नं.२, ३ व ४ करीता अ.पा.क. आई अर्जदार नं.१
सर्व रा. रोहणखेड, पो. विचोरी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल** केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडील **नामे सचिन देविदासराव हेले** हे दिनांक २५/०१/२०२६ रोजी **Mahuli Jahangir, Tq.Dist-Amravati** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आशेष नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

## तहसीलदार मोशी यांचे न्यायालय

रा.मा.क्र./ /MRC-८१/ /२०२५-२०२६

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार **नसीम बानो सलिम खान** यांनी त्यांचे जन्माची नोंद **खेड** येथील जन्म ग्रामपंचयात **खेड** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा. पं.. मृत्यु नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

तसेच ग्राम पंचायत कार्यालय **खेड** येथे स्वतःचे **जन्म** दि.-१०-०५-१९७८ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयच्या असेल त्यांनी, सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आंत** लेखी स्वरूपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार, मोर्शी**

## सायटेशन / जाहिरनामा

### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत

आर.एम.जे.सी.क. २३८/२०२६ ने. ता. २८/०४/२०२६

**अर्जदार. १) इंद्रकला मधुकर चक्रपाणी,** वय ७५ वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. तारासावंगा, जि. वर्धा. **२) प्रमिला राजकुमार मेश्राम,** वय ५० वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर.
**३) बेबी एकनाथ ढोके,** वय ६० वर्ष,व्यवसाय -घरकाम रा.नारा, ता. कारंजा, जि. वर्धा.
**४) प्रतिभा भारतराव वासनिक,** वय ४६ वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. उतरा, पो. थडीपवनी, ता. नरखेड, जि. नागपूर.
**५) उर्मिला गोवर्धन गजभिये,** वय ४२ वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. आरंभी, पो. रामठी, ता. नरखेड, जि. नागपूर.

**// विरुध्द//कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७प्रमाणे प्रकरण** दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे वडील **नामे व्यंकटराव गोविंदराव पाटील हे दिनांक ०२/१०/२०२०** रोजी Chincholi Gavali, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मरण पावलेले आहे तसेच अर्जदारांची आई **नामे पार्बती व्यंकटराव पाटील ही दिनांक १६/११/२०२५** रोजी Arambhi, Tq. Narkhed, Dist-Nagpur येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

## तहसीलदार मोशी यांचे न्यायालय

रा.मा.क्र./ /MRC-८१/ /२०२५-२०२६

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार **जमीला बी रशीद शा** यांनी त्यांचे जन्माची नोंद **खेड** येथील जन्म ग्रामपंचयात **खेड** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा. पं.. मृत्यु नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

तसेच ग्राम पंचायत कार्यालय **खेड** येथे स्वतःचे **जन्म** दि.९-०७-१९७२ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयच्या असेल त्यांनी, सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आंत** लेखी स्वरूपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार, मोर्शी**

## सायटेशन/ जाहिरनामा

### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क. २३६ / २०२६ ने. ता. २८/०४/२०१६

**अर्जदार.१) श्रीमती लिला माधव पाटील,** वय ७८ वर्ष, व्यवसाय -घरकाम
**२) श्री. अजय माधव पाटील,** वय ४४ वर्ष, व्यवसाय -मजुरी
सर्व रा. चिंचोलीगवळी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण** दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ चे वडील नामे **माधव गोविंदराव पाटील हे दिनांक १६/०२/२००२** रोजी **Chincholi Gavali, Tq.Morshi, Dist-Amravati** येथे मव्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेपः नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**


**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## सुशीला सूर्यवंशी मानजमेंट इनस्टिटूट ऑफ टेकनॉलॉजी अॅडव्हान्समेंट येथे ओपन कॅम्पस ड्राइव्ह



**अमरावती/का.प्र.**
सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅडव्हान्समेंट, अमरावती येथे अभियांत्रिकी व एमबीए विद्यार्थ्यांसाठी विदर्भस्तरीय ओपन कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे यशस्वी आयोजन करण्यात आले.
या उपक्रमात नागपूर (भारत) येथील मुख्यालय असलेल्या तसेच सेंट पॉल, मिनेसोटा (अमेरिका) येथे जागतिक उपास्थिती असलेल्या e Verse.AI Pvt. Ltd. या नामांकित कंपनीने सहभाग घेतला. या कंपनीने पहिल्यांदाच सुशीला सूर्यवंशी मानजमेंट इनस्टिटूट ऑफ टेकनॉलॉजी अॅडव्हान्समेंट येथे त्यांचा पहिला ड्राईव्ह घेण्यासाठी निवडल्यामुळे संस्थेसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला. कंपनीचे उपाध्यक्ष शैलेन्द्र नरवाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृत्रिम बुद्धिमत्ता ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले. AI नोकऱ्या कमी करत नाही, तर नव्या संधी निर्माण करत आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी बहुकौशल्य आत्मसात करून स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडली. प्रारंभी प्री-प्लेसमेंट टॉकद्वारे कंपनी व DairyTech/Climate-Tech या विशेष क्षेत्राची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखत घेण्यात आली. सहभागी झालेल्या उमेदवारांमधून ८ पदवीधर व ८ पदव्युत्तर विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली असून, पुढील फेरी कंपनीकडून ऑनलाईन पद्धतीने घेतली जाणार आहे.
या यशाबद्दल संस्थेचे खजिनदार अभय सूर्यवंशी यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. याप्रसंगी संचालक प्रा. अमोल करमरकर म्हणाले,'विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे हेच आमचे ध्येय आहे.' ड्राईव्हच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमित देशमुख आणि प्रा. स्वप्नील तिजारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### भाजीपाला पिकवणाऱ्यांना भाव नाही; विकणाऱ्यांची चांदीच चांदी!

# दर कोसळल्याने शेतकरी आर्थिक संकटात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
परिसरात मेथी, कोथिंबीर, पालक, शेपू, भेंडी, दोडका, टमाटे, वांगे, आलू आदी भाजीपाल्यांना बाजारात अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. उत्पादन खर्च, मजुरी, वाहतूक आणि खत-बियाणांच्या दरात प्रचंड वाढ झालेली असताना भाजीपाला विक्रीतून खर्चही निघत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.
गेल्या काही दिवसांत अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे भाजीपाला उत्पादन खराब झाले. परिणामी बाजारात पुरवठा अनिश्चित तर मागणी घटल्याने दर घसरले. शेतकऱ्यांना मिळणारा महसूल सतत कमी होत असून त्यांना कर्जबाजारीपणाचा धोका वाढत आहे.
सद्यस्थितीत बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने वाहतूक खर्चही निघत नाही.
अंजनगाव बारी परिसरातील भाजीपाल्याचे दर कोसळून शेतकरी मोठ्या अडचणीत असताना अमरावतीच्या किरकोळ बाजारात याच भाजीपाल्याचे दर दुप्पट–तिप्पट आहेत. शेतकरी मेथी, शेपू, कोथिंबीर २०–३० रुपयांत विकतात पण शहरात तेच भाजीपाल्याचे ८०- १०० रुपये दराने विक्री होत असल्याने संताप उसळला आहे.उत्पादन खर्च वाढत असताना शेतकऱ्यांना मिळणारा दर अत्यल्प, तर चिल्लर विक्रेत्यांची कमाई मात्र भरभराटीत आहे. या फरकावर सरकारने तातडीने पावले उचलावी, हमीभाव आणि नियंत्रणाची व्यवस्था करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.




**बाजारातील स्थानिक वर्तमान ठोक दर (किलोमध्ये)**
**मेथी :** २० ते ३० रुपये, **शेपू :** २० ते ३० रुपये, **आंबड चुका :** २० ते ३० रुपये, **चवळी, पालक :-** २५ ते ३०रुपये, **वांगी :** १५ ते २० रुपये, **भेंडी, दोडका :-** २५ ते ३०रुपये, **टमाटर :-** १५ ते २०रुपये, **बटाटा :-** १५ ते २०रुपये, **फणस :-** ३० ते ४०रुपये, **ढेमसे, कारले :-** ३० ते ४०रुपये, **कोबी ( पत्ता व फुल ) :-** २०रुपये

## आसरा माता मंदिराबाबत नाहरकत मिळवून उपोषण समाप्त



**बेलोरा**-येथील मुख्यचौक ते स्मशान भूमी रोडवरील आसरा माता मंदिराचे बांधकामात अडथळा ठरत असलेल्या कडूलिंबाचे झाडाचा फांदा तोडण्यासाठी नाहरकत मिळण्याकरीता सुरु असेलेल्या आसरा भक्तांच्या अन्नत्याग आंदोलनाला अखेर यश मिळाले.आंदोलनच्या तिसऱ्या अॅड. नितीन अंबुलकर यांची खालावलेली प्रकृती व जनमतांचा प्रतिसाद याचा विचार करून प्रशासनातर्फे आंदोलनस्थळी प्रदीर्घ चर्चा करून अखेर आंदोलनकर्ते यांची मागणी मान्य केली. ग्रामपंचायत अधिकारी जे. यु. ठाकरे यांनी याबाबत नाहरकत उपोषणकर्ते यांना देऊन त्यांचे उपोषण सोडविले. याकरिता माजी पंचायत समिती सदस्य अरुण गोंडेकर यांनी मध्यस्थी केली. उपोषणकर्ते यांचेकडून ग्रामपंचायत कार्यालय बेलोरा, प्रशासन व सरपंच भैय्याभाऊ कडू यांचे व उपोषणस्थळी भेट देणारे नागरिक व कार्यकर्ते यांचे प्रत्यक्ष आभार मानले. लवकरच मंदिराचे काम सुरु होणार असल्याची व त्या दरम्यान वनविभागाची परवानगी घेऊन झाडाचा फांदा तोडण्यात येईल अशी माहिती देण्यात आली.

## अभिलाष वाचनालयात निबंध स्पर्धा उत्साहात



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
येथील अभिलाष स्मृती सार्वजनिक वाचनालयात स्वर्गीय अॅड. जयप्रकाशराव वाटाणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त 'वाचन संस्कृतीचे संवर्धन व विकास ही काळाची गरज' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिलाष स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या अध्यक्षा निता ज. वाटाणे या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. गोपाल औतकर (उपाध्यक्ष, अभिलाष वाचनालय), गणेशराव मदनकर (सेवानिवृत्त पोस्ट निरीक्षक, परतवाडा) तसेच बाजड व पाटील उपस्थित होते.यावेळी बाजड यांनी स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास व वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन केले. गणेशराव मदनकर यांनी वाचनालयाच्या कार्याची सविस्तर माहिती देत ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पाटील सर यांनी स्व. जयप्रकाशराव वाटाणे यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाची माहिती दिली.
अध्यक्षीय भाषणात निता वाटाणे यांनी स्व. जयप्रकाशराव वाटाणे यांनी वाचन संस्कृतीच्या विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांची आठवण करून दिली. वाचनाची आवड निर्माण करून समाज प्रबोधन घडविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या शेवटी वाचनालयाचे सचिव काळे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या ३८ विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पाडण्यासाठी वाचनालयाच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

## डॉ.सारंग तापडिया यांचा सत्कार



**अमरावती**-होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमॅन यांचा १० एप्रिल हा जन्मदिवस, जागतिक होमिओपॅथी दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे ओचित्य साधून मित्र मंडळातील दिवंगत होमिओपॅथ स्व. डॉ. रामगोपाल तापडिया यांचे सुपुत्र होमिओपॅथ डॉ. सारंग तापडिया यांचा त्यांच्या दवाखान्यात त्यांच्या रुग्णासमोर डॉ. गोविंद कासट मित्र मंडळींनी शाल व पुस्तक प्रदान करून सत्कार केला.

### उन्हाळी सुट्टीत एसटीचा प्रवास भाडे रकमेत हंगामी भाडेवाढ

## अमरावती विभागाकडून साध्या बसच्या भाड्यात १० टक्के वाढ

**अमरावती/का.प्र.**
उन्हाळी सुट्टया, सण-उत्सव आणि लग्नसराईच्या काळात होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने साध्या बसच्या भाड्यात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ १५ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्रीपासून लागू होणार असून १५ जून २०२६ पर्यंत कायम राहणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने महामंडळाला गर्दीच्या काळात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची मुभा दिली आहे, त्याअंतर्गत अमरावती विभागाचे सक्षम प्राधिकारी यांनी ही १० टक्के दरवाढ मंजूर केली आहे.




या निर्णयामुळे साध्या बसचा सध्याचा १०.०५ रुपये प्रति टप्पा दर आता ११.०५ रुपये इतका होईल. अमरावती येथून विविध महत्त्वाच्या शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना आता जास्तीचे पैसे मोजावे लागणार आहेत. सुधारित दरपत्रकानुसार, अमरावती ते नागपूर प्रवासासाठी आता २९० रुपये (आधी २६२), अमरावती ते धारणी २६८ रुपये (आधी २४२) आणि अमरावती ते अकोला १९१ रुपये (आधी १७२) मोजावे लागतील. तसेच परतवाडा, दर्यापूर आणि मोर्शी या मार्गांसाठी ९१ रुपयांऐवजी १०२ रुपये भाडे आकारले जाईल. महत्त्वाची बाब म्हणजे ही भाडेवाढ केवळ 'साध्या बस' प्रकारासाठीच लागू असून, महामंडळाच्या इतर प्रगत सेवांचे दर पूर्वीप्रमाणेच स्थिर राहणार आहेत. प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन महामंडळाला सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती विभागाचे नियंत्रक सचिन डफळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. वाढत्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि प्रवाशांना सेवा देण्यासाठी ही दरवाढ आवश्यक असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## कमलाबाई बेलोरकर यांचे निधन

**कुऱ्हा**-तिवसा तालुक्यातील मारडा येथील बांधकाम ठेकेदार किशोर



गोविंदराव बेलोरकर यांच्या मातोश्री ग.भा. कमलाबाई गोविंदराव बेलोरकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात मुलगा, स्नुषा, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. यावेळी श्रध्दांजली देण्यात आली.

# शिक्षण विभागात सर्वसमावेशक आढावा बैठक

### पटसंख्या वाढ, वाचन संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विशेष भर

**अमरावती/का.प्र.**
शिक्षण विभागात शिक्षण अधिकारी व शिक्षण समितीच्या सर्व सदस्यांची विस्तृत आणि महत्त्वपूर्ण आढावा बैठक उत्साहात पार पडली. शिक्षण सभापती अॅड. प्रीती रेवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस महानगरपालिकेच्या ६३ शाळांचे मुख्याध्यापक तसेच प्रभारी मुख्याध्यापक उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करत आगामी शैक्षणिक वर्षासाठी दिशा ठरविण्याचा या बैठकीचा प्रमुख उद्देश होता.
बैठकीदरम्यान सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांकडून त्यांच्या शाळांची सद्यस्थिती, विद्यार्थ्यांची पटसंख्या, शाळांमध्ये राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक व सहशालेय



उपक्रम, तसेच उपलब्ध सुविधा यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याचबरोबर, शाळा चालविताना मुख्याध्यापकांना येणाऱ्या अडचणी, प्रशासकीय अडथळे, मनुष्यबळाची कमतरता, तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित समस्या यांवरही खुल्या चर्चेद्वारे उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला.बैठकीस संबोधित करताना शिक्षण सभापती अॅड. प्रीती रेवणे यांनी विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविणे ही सर्व शाळांची प्राथमिक जबाबदारी असल्याचे ठळकपणे नमूद केले. यासाठी शाळांनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रयत्न करणे आवश्यक असून, शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी स्थानिक स्तरावर पालकांशी संवाद साधत घरोघरी भेटी देण्यावर भर द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. आगामी नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक शाळेने आपल्या परिसरात जनजागृती मोहीम राबवून अधिकाधिक विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्याचे आवाहन त्यांनी केले.
वाचन संस्कृती ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत प्रत्येक शाळेत 'वाचन कोपरा' किंवा सुसज्ज ग्रंथालय उभारण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शिक्षकांनी स्वतः पुढाकार घेऊन विविध उपक्रम राबवावेत, जसे की वाचन स्पर्धा, कथाकथन सत्र, पुस्तक प्रदर्शन आदी. शिक्षक व विद्यार्थी यांनी एकत्रितपणे वाचनावर आधारित उपक्रम राबविल्यास शाळांमध्ये सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण होईल, असेही त्यांनी सांगितले.बैठकीत शिक्षण क्षेत्रातील विविध पैलूंवर सखोल चर्चा होऊन आगामी काळात शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. शिक्षणाच्या दर्जात सुधारणा, विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि शाळांमध्ये सकारात्मक वातावरण निर्मिती यासाठी प्रशासन, शिक्षक आणि पालक यांचा समन्वय महत्त्वाचा असल्याचे या बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

## स्त्री शिक्षण,शेतकरी आणि बहुजनाच्या उन्नतीसाठी महात्मा फुले यांचे विचार मार्गदर्शक- बबलू देशमुख

**अमरावती/का.प्र.**
सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचा दीप प्रज्वलित करणारे महान समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आज काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला खासदार बळवंत वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती ,जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख म्हणाले की,'महात्मा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन आहे, हा



त्यांचा विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे. काँग्रेस पक्ष त्यांच्या विचारसरणीवर चालत समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचे कार्य करत आहे. त्यांच्या आदर्शांवर चालणे हीच खरी त्यांना अभिवादन ठरेल.' सर्वांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.या कार्यक्रमाला राजीवकाका ठाकूर,हरिभाऊ मोहोड, जयंतराव देशमुख, प्रकाशराव काळबांडे, रामेश्वरराव अभ्यंकर तसेच पदाधिकारी सतीशराव हाडोळे, संजयराव नागोणे, मुकद्दर खा पठाण, सिद्धार्थ बोबडे, बिट्टूभाऊ मंगरोळे, नंदकिशोर यादव, निखिल काटोलकर, गजानन देशमुख, विनायकराव ठाकरे, समीर जवंजाळ, आशिष यादव, वैभव देशमुख, सरकार रायबोले यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुऱ्हा येथील रोजगार सेवकाविरोधात तक्रार

**कुऱ्हा/वार्ताहर**
रोजगार सेवक सुरेश सपाटे यांच्यावर मनमानी कारभाराचा आरोप होत असून, त्यांच्या विरोधात संतोष श्रीराम भैसे (प्रहार जनशक्ती पक्ष शाखा प्रमुख कुऱ्हा) यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. मजूर कामावर असतानाही त्यांची उपस्थिती नोंदविण्यात आली नाही. तसेच कुऱ्हा ते भिवापूर पांदण रस्त्याच्या कामात अनियमितता, नातेवाईकांनाच कामावर लावणे, आदी आरोप तक्रारीतून निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली. निवेदन देतेवेळी दिलीप लिल्हवें, संदिप कावरे, आनंद चिरडे, रामकृष्ण पोकळे, पंकज नारळे, जयवृष्ण पोकळे, केशव धामणकर, अशोक शिरभाते, सुभाष चिरडे, मनोहर सुरसाऊत, पुरुषोत्तम निस्ताने, भाष्कर मानकर, अनिल ओकटे, रवी इखार, शरद निस्ताने, मधुकर नंदनवार, फुलचंद नेवारे, राजू सहारे, संजय मेश्राम, मधुकर गायगोले, रामकृष्ण तायवाडे, विजय लाडेकर आदी कामगार व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जाहिरनामा**
**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर)**
**मोर्शी यांचे न्यायालयांत**

आर.एम.जे.सी.के.२७२/२०२६ ने.ता. ६/५/२०२६

**अर्जदार**
१) **श्री. शंकर जानराव इसळ,** वय-६१ वर्ष, व्यवसाय-शेती रा. निंभार्णी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
२) **सौ. पुष्पा दादाराव पुनसे,** वय ४० वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. अमरावती, ता.जि. अमरावती.

**--- विरुद्ध ---**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे वडील नामे **जानराव महादेवराव इसळ** हे दिनांक २५/०१/२०२२ रोजी Rajurwadi, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्रं मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी**

**जाहिरनामा**
**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर)**
**मोर्शी.यांचे न्यायालयांत**

आर.एम.जे.सी.के. २७०/२०२६ ने.ता. ६/५/२०२६

**अर्जदार**
१) **सौ. सुनीता अशोक हाडे,** वय-६१ वर्षे, व्यवसाय-घरकाम. रा.जरुड, ता. वरुड, जि. अमरावती.
२) **सौ. अश्विनी सतिशराव मांडळे,** वय-४२ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.पुसला,ता. वरूड, जि. अमरावती.

**- विरुद्ध -**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांची आई नामे **मंदाकिनी उर्फ लिलाबाई विष्णुपंत पाटणे** ही दिनांक ०३/०१/२०२६ रोजी Ravi Nagar Amravati, Tq.Dist-Amravati येथे मय्यत झालेली आहे. तीचे मृत्युनंतर तीचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे, आत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

**जाहीर सूचना**
सर्व आम जनतेस या द्वारे सूचित करण्यात येते कि माझे पक्षकार श्री सतीश किसनलाल सोनी, रा. दादर पूर्व, मुंबई यांनी खालील नमूद शेत जमीन **श्री राजेंद्र गोविंदराव निर्मल रा. वलगाव** यांचेकडून विकत घेण्याचा सौदा / व्यवहार केलेला असून दिनांक १८/०४/२०२६ रोजी सादर शेत जमिनीची खरेदी आहे. श्री सतीश सोनी यांनी सदर चा व्यवहार हा **श्री अविनाश प्रमोदराव उगले व श्री आनंद दत्तात्रय बारब्दे** दोघेही रा वलगाव यांचे कडून त्यांनी श्री राजेंद्र गोविंदराव निर्मल रा वलगाव यांचे सोबत केलेल्या ईसार चे व्यवहार वरून केलेला आहे आणि त्यास राजेंद्र निर्मल यांची संमती आहे.
त्या शेत जमिनीचे वर्णन : नोंदणी पोट तुकडी भातकुली ग्रामीण कचेरीचे कक्षेतील आणि जिल्हा परिषद अमरावती च्या हद्दीतील **मौजे खारतलेगाव भाग १**, प्रगणे पथ्रोट, तालुका भातकुली, जिल्हा अमरावती **येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ४४४**, भो वर्ग १, मधील एकूण क्षेत्रफळ ३ हे १५ आर + पोटखराब ० हे ०९ आर, आ रु १९.४० यापैकी मूळ मालक यांचे मालकी व ताब्यातील उत्तर दक्षिण भागाची १हे ५३ आर पोटखराब ० हे ०९ आर आ.रु. ९.४२ पै असून यातील पोटखराब ० हे ०९ आर शेतजमीन सोडून **उर्वरित १ हे ५३ आर** शेतजमीन काळी कोरडवाहू शेतजमीन यात असलेल्या झाडंझुडपं, जलपाशान, बोरवेलसह तसेच सदर शेतावर हद्दकायम मोजणी करून कुंपण घातलेले आहे या शेताची चतुःसीमा
पूर्वेस : श्री अमीत राम पांडे व श्री राम श्यामराव पांडे यांचे शेत
पश्चिमेस : श्री जायनारायण जयस्वाल यांचे शेत
उत्तरेस : अमरावती दर्यापूर रास्ता
दक्षिणेस : तळेगाव वाले यांचे शेत
येणेप्रमाणे वरील चतुःसीमेचं आतील शेतजमीन माझे पक्षकार खरेदी करून घेतील. सदर व्यवहार बद्दल कोणालाहि कोणतेही तक्रार असल्यास किंवा कोणत्याही व्यक्ती संस्था बँक पतपेढी भागीदार संस्था सार्वजनिक संस्था यांचे सादर शेतजमिनीबद्दल कर्ज, गहाण, बोजा, ताबा, हिट, संबध, वारसा किंवा न्यायालयीन प्रकरण वाद असल्यास त्यांनी ७ दिवस चे आत खालील पत्त्यावर लेखी आक्षेप नोंदवावा आणि कळविणे त्यानंतर माझे पक्षकार खरेदी करण्यास मोकळे राहतील आणि कोणाचाही कोणताही उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**दि.११/०४/२०६**
**अॅड.पवन प्रकाश सोनी**
द वॉर रूम,
४०३, ४था माळा, ध्रुवी प्रोफेशनल पार्क,
मनीबाई गुजराथी शाळेजवळ,
अंबापेठ, अमरावती.
मोबा ९२७१५३५५५५

# वन्यप्राणी-वाहन अपघात रोखण्यासाठी रस्त्यावर आकर्षक वन्यजीव चित्रकला








**अमरावती/प्रतिनिधी:** गेल्या काही वर्षांत अमरावतीतील रस्त्यांवर वन्यप्राणी-वाहन अपघात मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. वाढती वाहतूक, रस्त्यांचे जाळे आणि वन्यजीवांच्या अधिवासांचे तुकडीकरण यामुळे ही समस्या अधिक गंभीर होत आहे. या अपघातांमध्ये

### -प्रेरणादायी वैज्ञानिक उपक्रम

बिबट्या,चितळ,काळवीट आणि निलगाययांसारख्या अनुसूची-१ प्रजातींचा मृत्यू होत आहे, जे जैवविविधतेसाठी चिंताजनक आहे.या समस्येवर उपाय म्हणून Bigcats Conservation Trust, Iåia DeeefCe Wildlife Resc} Fouåation यांनी एक वैज्ञानिक आणि जनजागृतीवर आधारित उपक्रम सुरू केला आहे. या (पान २ वर)

# संत पगडीवाला सेल्स दुकानात भीषण आग, २० लाखांचे नुकसान






**अमरावती /प्रतिनिधी:-** कोतवाली पोलीस ठाण्यासमोरील संत पगडीवाला सेल्स दुकानात आज शनिवार ११ एप्रिल रोजी भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. या आगीत दुकानाचे २० लाखांचे नुकसान झाले असल्याची माहिती आहे. माहिती नुसार संत कवर राम मार्केटच्या दुसऱ्या मजल्यावर असणाऱ्या संत पगडीवाला सेल्स दुकानात शनिवारी दुपारी एक वाजता सुमारास अचानक आग लागली. दुकानातून धूर निघताना येथे कार्यरत वाहतूक विभागाच्या पोलीस इन्स्पेक्टर उईके यांना दिसले. त्यांनी याची माहिती अग्निशमन विभागाला दिली. घटनेची माहिती मिळता अग्निशमन (पान २ वर)

## डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय येथे

# बाल रुग्णावर किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

### वडिलांनी दिले मुलाला जीवनदान

**अमरावती/प्रतिनिधी:-** स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आणखी एक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली.विशेष बाब म्हणजे अमरावती शहरात वयाच्या बारा वर्षाच्या बाल रुग्णावर होणारी ही पहिली शस्त्रक्रिया ठरली. बारीपुरा जुनी वस्ती येथील मध्यमवर्गीय कुटुंबातील रहिवासी अनंता मधुकर लांडोरे यांचा मुलगा



सिद्धेश अनंत लांडोरे याला जन्मजात एकच किडनी होती. परंतु सिद्धेश ची ती एक असलेली किडनी देखील बरोबर काम करत नसल्यामुळे त्याला दम लागणे, श्वास भरून येणे, ताप येणे, असे होत असल्यामुळे त्यांनी शहरातील सुप्रसिद्ध नेफ्रॉलॉजिस्ट डॉ अविनाश चौधरी यांच्याकडे उपचार घेणे सुरू केले. परंतु सिद्धेश ची तब्येत खालावत असताना त्यांनी त्यांच्या कुटुंबाला किडनी प्रत्यारोपण हा यावरील उत्तम पर्याय असल्याचे सुचवले व त्यानुसार डॉ अविनाश चौधरी व ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी अवघ्या तीन आठवड्यात संपूर्ण कागदपत्र, वैद्यकीय चाचण्या, कायदेशीर बाबीची पूर्तता ,पोलीस वेरिफिकेशन करून संपूर्ण फाईल तयार करून प्राधिकरण समिती, आथोराझेशन कमिटी , (पान २ वर)

# पालकमंत्री चषक विदर्भ केसरी महिला - पुरुष कुस्ती स्पर्धा १६ पासून

### अचलपूर मध्ये भव्य आयोजन

**अमरावती /प्रतिनिधी:-** विदर्भ कुस्तीगीर संघाच्या मान्यताने हनुमान आखाडा बिलनपुरा, अचलपूर नगरपरिषद व जिल्हा कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमानाने अचलपूर विठ्ठलवाडी मैदान येथे १६ ते १८ एप्रिल पर्यंत पालकमंत्री चषक व ३८ वी विदर्भ केसरी पुरुष व महिला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.



अचलपूरच्या नगराध्यक्ष रूपाली अभय माथने यांच्या पुढाकाराने ही स्पर्धा घेतली जात असल्याची माहिती आज शनिवार ११ एप्रिल रोजी पत्रकार परिषदमध्ये माजी खासदार रामदास तडस यांनी दिली. त्यांनी सांगितले की स्पर्धामध्ये विदर्भातील अमरावती ,नागपूर, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली ,भंडारा, वर्धा, बुलढाणा,वाशिम, यवतमाळ जिल्ह्यातील एकूण १५ संघ सहभागी होणार आहे. ३०० पैलवान आणि २५ रेफ्री, ५० कार्यकर्ता यांचे अचलपुर मध्ये आगमन होणार आहे. त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था आयोजकांनी केलेली आहे. विदर्भ केसरी बहुमान मिळणाऱ्याला प्रथम पुरस्कार ३१ हजार रोख (पान २ वर)

# १४ एप्रिलला अमरावतीत वाहतूक बदल

### बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त इर्विन चौक परिसरात निर्बंध

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी शहरात मोठ्या उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही बौद्ध बांधव मोठ्या संख्येने इर्विन चौक येथे एकत्र येणार असून पहाटे ५ वाजल्यापासूनच स्मारक दर्शन, मूर्ती व साहित्य खरेदीसाठी नागरिकांची



गर्दी होणार आहे. याशिवाय शहरातील विविध भागांतून मिरवणुका व शोभायात्रा काढण्यात येणार असून त्यांचे विसर्जन इर्विन चौकात (पान २ वर)

#### हे मार्ग पूर्णतः बंद राहणार

इर्विन चौक–खापर्डे बगीचा, गर्ल्स हायस्कूल चौक–इर्विन चौक, बाबा कॉर्नर–इर्विन चौक, मर्क्युरी टी पॉइंट–इर्विन चौक तसेच इर्विन चौक–मालवीय चौक हे सर्व मार्ग वाहतुकीसाठी बंद राहतील.

#### पार्किंगवरही निर्बंध :

मर्क्युरी टी पॉइंट ते इर्विन चौक, ट्रॅफिक ऑफिस परिसर तसेच होलीक्रॉस शाळा गेटपर्यंत कोणतेही वाहन पार्क करण्यास मनाई करण्यात आली आहे.

# निवृत्त प्राध्यापकाला ‘पुरस्कार’ आणि परदेश दौऱ्याचे स्वप्न ठरले महागात

**अमरावती/प्रतिनिधी:-** सोशल मीडियावर दाखवलेल्या आकर्षक आमिषांना बळी पडल्याने शहरातील एका निवृत्त प्राध्यापकाची लाखोंची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. फेसबुकच्या माध्यमातून ओळख करून विश्वास संपादन करत आरोपीने ‘कृषिरत्न गुणीजन पुरस्कार’ आणि सिंगापूर दौऱ्याचे आमिष दाखवत तब्बल ४ लाख ४ हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघड झाला आहे.

नवसारी परिसरातील छत्रपती पार्क कॉलनी येथे वास्तव्यास असलेले तथा अकोला येथील विद्यापीठातून निवृत्त झालेले प्राध्यापक राजेंद्र नामदेवराव जाणे (७२) यांच्याशी आरोपीने फेसबुकवर संपर्क साधला. स्वतःला एका प्रतिष्ठित अकादमीचा अध्यक्ष असल्याचे भासवत त्याने जाणे यांचा विश्वास जिंकला. पुढे झूम मीटिंगद्वारे बनावट (पान २ वर)

# शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधी:--** स्त्री शिक्षणाचे अग्रदूत, बहुजन,शेतकरी व कष्टकरी समाजाला शिक्षणाची दारे खुली करणारे क्रांतिसूर्य, थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आज चित्रा चौक येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी खासदार बळवंतराव वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख,



अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर तथा विरोधीपक्षनेता मनपा विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले.यावेळी राजीव भेले, सुनीता भेले, राजश्री जठाळे, संजय वाघ,अभिनंदन पेंढारी, संजय शिरभाते,सुरेश रतावा, (पान २ वर)

# तरुणाची आत्महत्या

**अमरावती /प्रतिनिधी:-** करजगांव नजीकच्या गोविंदपुर येथे एका तरुणाने आपल्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. अमोल रवींद्र भूरुंब्दे (३५, गोविंदपुर) आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार अमोल भूरुंब्दे गुरुवारी रात्री घरी एकटे होते .त्यांची पत्नी काही कामानिमित्त बाहेरगावी गेली होती. मध्यरात्रीच्या सुमारास त्याने घरातील छताला साडी ने गळफास लावून आत्महत्या केली. पत्नी घरी आल्यावर ही घटना समोर आली. तिने घटनेची माहिती शिरसगाव पोलिसांना दिली. माहिती मिळता शिरजगाव पोलीस तिथे पोहचली. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. पुढील तपास पोलीस करत आहे.



# मध्यरात्री नागपुरी गेटमध्ये रक्तरंजित हल्ला

### ४० वर्षीय व्यक्ती गंभीर, आरोपी फरार

**अमरावती /प्रतिनिधी:-:** शहरातील नागपुरी गेट परिसरात गुरुवारी मध्यरात्री घडलेल्या धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. अज्ञात हल्लेखोरांनी एका ४० वर्षीय व्यक्तीवर चाकूने प्राणघातक हल्ला केल्याने तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



जखमीचे नाव केसर अली करामत अली (रा. सुफीयाननगर, नागपुरी गेट) असे आहे. प्राथमिक माहितीनुसार, काही तरुणांनी अचानक त्याच्यावर हल्ला चढवला. चाकूने वार करत त्याला रक्तबंबाळ अवस्थेत सोडून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी केसर अली यांना तातडीने रात्री सुमारे १.३० वाजता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार (पान २ वर)

# दारापूर विक्रमशिला तंत्रनिकेतनचे परीक्षा केंद्र ऐन वेळेवर बदलले, मनविसे व विद्यार्थ्यांचे आंदोलन

**खल्लार /प्रतिनिधी:-** दारापूर येथील विक्रमशिला तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रशासनाने ऐन वेळेवर परीक्षा केंद्र बदलल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गोंधळ आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या (मनविसे) नेतृत्वात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयासमोर निदर्शने केली. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित

विक्रमशिला तंत्रनिकेतन,



दारापूर येथे गेल्या कित्येक दिवसांपासून प्रॅक्टिकल लॅब तसेच प्रसाधनगृह, पाण्याची संपूर्ण व्यवस्था बंद करून ठेवण्यात आली होती. प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षक ठेवून विद्यार्थ्यांना आत मध्ये प्रवेश दिला जात नव्हता.असे असतांना ऐन वेळेवर एमएसबीटी यांना प्राचार्यांनी सदर सेंटर रद्द करण्याची पत्र दिले.परंतु आपल्याच विद्यालयांमध्ये सदर परीक्षा केंद्र ठेवून परीक्षा घ्यावी असे पत्रव्यवहार एम एस बी टी यांनी विद्यालयाला केलेला असताना सुद्धा प्राचार्य यांनी एम एस बी टी ला पुन्हा पत्र व्यवहार करून आमचे येथे सदर परीक्षा घेऊ शकत नाही आमचे सेंटर रद्द करण्याची पत्रव्यवहाराद्वारे मागणी केली. त्यामुळे ऐन वेळेवर मुलांचे (पान २ वर)

# लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती /प्रतिनिधी:-** लग्नाचे आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आले.यामुळे ती गरोदर झाली. गरोदर झाल्यानंतर आरोपीने लग्नापासून नकार दिला. यामुळे पिडिताने आरोपी विरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी दीपक हेमराज गंगन (२०,मराठा कॉलनी ) विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



माहिती नुसार राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या एका जिम मध्ये पिडितची आरोपी सोबत ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. दोन्ही तासंतास बोलू लागले भेटू लागले. डिसेंबर २०२४ मध्ये दोघांची ओळख झाली. यानंतर त्यांचे नाते आणखीन घट्ट होत गेले. यामुळे आरोपी दीपक गंगन घरी कोणी नसताना तिला भेटायला बोलवत होता. ३ जानेवारी ते १० एप्रिल रोजी (पान २ वर)

# नारी शक्ती वंदन अधिनियम नवीन युगाची चाहूल

### -भाजपा महिला अध्यक्ष तिखिले यांचा दावा

**अमरावती /प्रतिनिधी:-** महिलांच्या विकासासाठी केंद्र सरकारने लागू केलेले नारी शक्ती वंदन अधिनियम नवीन युगाची चाहूल असल्याचा दावा भाजपा ग्रामीण महिला अध्यक्ष अनिता तिखिले यांनी आज शनिवार ११ एप्रिल रोजी आयोजित एका पत्रकार परिषदेतून केला आहे. त्यांनी सांगितले आहे की यामुळे महिला सशक्त होणार आहे. महिला जिथे जास्त असतात तिथे अर्थव्यवस्था मजबूत होते आणि विकासाला प्रोत्साहन मिळते. वित्तीय आणि आरोग्य सशक्तिकरण होणार आहे. यामुळे महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण विधानसभा मध्ये राहणार आहे. काही वर्षांपूर्वी पंचायत राज मध्ये महिलांचा



सहभाग वाढविण्यात आला. त्यानंतर नगरपालिका ,नगरपरिषद, महानगरपालिका मध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले. यामुळे जीवन स्तर सुधारले. आरोग्य, शिक्षा आणि इतर सुविधा मध्ये वाढ झाली. पूर्वीच्या तुलनेत वर्तमान मध्ये आरोग्य, शिक्षा आणि चांगल्या नागरिक सोयी सुविधा उपलब्ध आहे. याच संपूर्ण श्रेय महिलांना जात आहे. कुठेही महिलांचा सहभाग वाढला तर परिवर्तन होतात. गेल्या काही दशकापासून (पान २

# आज टाकरखेडा संभू येथे भाजप महिला मोर्चाची बैठक

**टाकरखेडा संभु / प्रतिनिधी:-** टाकरखेडा संभु येथे आज सोनाली जामठे यांच्या निवासस्थानी सकाळी ११ वाजता भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस प्रमुख उपस्थिती म्हणून आरती राजेश वानखडे या लाभणार आहेत. तसेच छाया दंडाळे,आशा जुमळे माया जुनघरे,सोनाली काटोले, भाग्यश्री सावरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या बैठकीचे आयोजन भाजप महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष सोनाली निलेश जामठे यांनी केले असून, परिसरातील महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जामठे यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

बैठकीमध्ये महिला सशक्तीकरण, संघटन मजबुतीकरण तसेच आगामी कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच महिला कार्यकर्त्यांना (पान २ वर)

सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
❒ रविवार, १२ एप्रिल २०२६ ❒ E-paper - www.janmadhyam.com

# पुन्हा .... चंद्रमाच्या दिशेने



५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे. फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'क्रूड फ्लायबाय' मोहीम आहे.

याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावरउतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे.

ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे.

अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही.

तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे.

या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लॉंचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल.

अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले.

# गोलमाल

**काळजी किंवा चिंता या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत, पण याचा आयुष्यावर नकारात्मक परिणाम होत असेल तर त्यासाठी मानसिक उपचार, समुपदशेन अनिवार्य ठरते. अशावेळी कोणत्याही मार्गाने सामाजिक उन्मादाचा बळी होण्याआधी काही गोष्टींचा विचार आपण सगळ्यांनी विशेषत महिला वर्गानेही करायला हवा. मनस्वास्थ्याशी निगडित ब-याच मनोविकारांशी संबंधित समस्या, त्याच्याशी झगडत असलेल्या व्यक्ती आपण या सदरामध्ये बघितल्या आहेत. आज मात्र आपण अशा केसेसबद्दल चर्चा करणार आहोत ज्या आपल्या घरात, आजूबाजूला असतील किंवा 'आपण स्वतही' अशा केसेसपैकी एक असू शकू.**

काळजी किंवा चिंता या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत, पण याचा आयुष्यावर नकारात्मक परिणाम होत असेल तर त्यासाठी मानसिक उपचार, समुपदशेन अनिवार्य ठरते. अशावेळी कोणत्याही मार्गाने सामाजिक उन्मादाचा बळी होण्याआधी काही गोष्टींचा विचार आपण सगळ्यांनी विशेषत महिला वर्गानेही करायला हवा. मनस्वास्थ्याशी निगडित ब-याच मनोविकारांशी संबंधित समस्या, त्याच्याशी झगडत असलेल्या व्यक्ती आपण या सदरामध्ये बघितल्या आहेत. आज मात्र आपण अशा केसेसबद्दल चर्चा करणार आहोत ज्या आपल्या घरात, आजूबाजूला असतील किंवा 'आपण स्वतही' अशा केसेसपैकी एक असू शकू.

हे सांगण्याचं कारण एवढंच की, गेले काही दिवस आपण अशाच एका बातमीने अस्वस्थ झालो आहोत. एका स्वयंघोषित सिद्धपुरुषाने स्त्रियांवर कशा प्रकारे आणि काय अत्याचार केले, त्याची काळी जादू वगैरे बातम्या वाचून आणि त्यासंबंधित व्हिडीओज पाहून हादरून गेलो आहोत. या सगळ्याला कोण आणि कसे जबाबदार आहेत याचा ऊहापोहही आतापर्यंत बराच झाला आहे. या बातमीशी संबंधित बरीच सामाजिक, नैतिक चर्चासत्रंही झडली आहेत आणि झडत आहेत. पण मानशास्त्रीयदृष्ट्या त्यावर विचार करणं हे आता तितकंच महत्त्वाचं ठरलं आहे. कारण हे फक्त या घटनेपुरतंच मर्यादित नसून अशा प्रकारच्या अनेक घटना आणि अनेक सिद्ध पुरुष-सिद्ध माता असे अनेक अवतार या कलियुगात आपल्या लोकांना आधार (?) देण्यासाठी अवतरले आहेत आणि यापुढेही अवतरत राहतील.

हे असे बुवा किंवा माता खरंच दैवी अवतार असतात का? तर नाही, पण एक निश्चितपणे इथे मी सांगेन की यालाही मानसशास्त्रीय पार्श्वभूमी आहे. ती म्हणजे मानसशास्त्रीय भाषेत ज्याला 'स्वप्रेमी', 'आत्मपूजक' किंवा नार्सिसिस्टिक म्हटलं जातं अशा व्यक्ती या बुवाबाजीमध्ये अडकलेल्या दिसतात. नार्सिसिझम या मनोविकाराचं हे लक्षणच आहे की, अशा व्यक्ती या स्वतमध्ये भरपूर गुरफटलेल्या असतात. त्यांना इतरांबद्दल सहानुभूती नसते. अशा व्यक्ती आपल्या शाब्दिक सामर्थ्यावर स्वतभोवती प्रशंसकांचे जाळे उभ्या करतात. कारण अशा व्यक्तींना स्व प्रिय असतो, स्वतची स्तुती प्रिय असते. (सरसकट सगळ्याच व्यक्ती या नार्सिसिझम प्रकारात येत नाहीत. परंतु या आजाराची काही लक्षणे त्यांच्यामध्ये निश्चित आढळतात). बरेचदा हे बुवा अनैतिक कृत्यांमध्येही सहभागी असतात. त्यांच्यामध्ये असामाजिक व्यक्तिमत्त्व विकार म्हणजेच अँटीसोशल पर्सनॅलिटी डिसऑर्डरची लक्षणे आढळतात. हा मनोविकार गंभीर स्वरूपाचा आहे. ज्यामध्ये बेपर्वाई, गुन्हेगारी, अनैतिकता या समाजविघातक बाबी आढळतात.

जरी असं असलं तरी या लोकांबद्दलचं जनमानसातलं आकर्षण कमी होताना दिसत नाही.

आताही कानावर अशाच काहीशा आंधळ्या भक्तीच्या घटना आणि त्यामधील व्यक्ती; विशेषत स्त्रियांचे शोषण होताना दिसलं की, एकच विचार येतो की समाजामध्ये या व्यक्तींचा प्रभाव का? तर याचं उत्तर हेच आहे की, समाजामध्ये दिवसेंदिवस वाढत जाणारी 'असुरक्षिततेची भावना आणि अपराधगंड' आणि समाजाची हीच नस या अशा भोंदूगिरी करणा-यांनी बरोबर पकडली आहे. अशा समाजाला रुचेल ते आणि तसेच वश करायचे ही खुबी त्यांनी अंगीकारली व त्यांच्या सो कॉल्ड वशीकरणाचा परिणाम हा 'सामाजिक उन्माद' किंवा मास हिस्टेरियाचा नमुना आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्रत्येक जण आज वेगवेगळ्या विवंचनेमध्ये गुरफटलेला आहे. काही जणांना आर्थिक स्थैर्य हवंय, तर काहींना रात्रीची शांत झोप हवीय. काही जण नातेसंबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करताहेत, तर काही जण



आजारापासून मुक्ती मिळावी यासाठी झटत आहेत. सगळ्याच बाबतीत परिपूर्णतेचा ध्यास व्यक्तीला अजून नैराश्येच्या खोलात लोटू शकतो आणि याचाच फायदा या बाबांकडून, मातांकडून घेतला जातो.

वर म्हटल्याप्रमाणे या भोंदू लोकांना विवंचनेत अडकलेल्या लोकांच्या वर्मावर बोट ठेवणं व्यवस्थित जमतं. कोणाला कसली चिंता आहे? कोणाला काय बोललं तर बरं वाटेल याबाबतीत ही लोक भरपूर 'स्मार्ट' असतात. मग त्यांच्याच अनुयायांकडून काही गोष्टींची 'प्रॅक्टिस' करून घेतली की, पुढच्या गोष्टी सोप्प्या होतात. आजकालच्या इंटरनेटच्या जमान्यात तर हे सर्व सोप्प झालं आहे. पण खरंच आपलं सगळ्यांचं खासगी आयुष्य इतकं सार्वजनिक आहे का? हा विचार आपण समाजाने करायला हवा.

**भोंदू बाबा**

हातात माळा, कपाळी टिळा,
वेष घातला भगवा पूर्ण,
भोळ्या भाबळ्या जनतेला हा,
भोंदू
करतोय चूण.
'कधी हवेतून काढतो
अंगठी, कधी लिंबातून काढतो
रक्त, अडाणी सोडा, सुशिक्षितही,
याचेच बनलेत भक्त.
घरात तुमच्या संकट भारी,
पायाला आहे शनीचा फेरा,
असे सांगून लुटतो हा,
भोंदू बाबा हातात घेऊन डेरा.
कष्ट सोडून मंत्राच्या मागे,
धावू नका तुम्ही लोकहो,
भोंदूच्या त्या शब्दांना,
जादू अजिबात म्हणू नका हो.
बुद्धीला द्या थोडा ताण,
विज्ञानाची धरा साथ,
भोंदू बाबाच्या नादी लागून,
करून घेऊ नका घात.

या विषयावरी

दुसरी गोष्ट ही की, काळजी किंवा चिंता या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत, पण जर यांचा त्रास होत असेल किंवा दैनंदिन आयुष्यावर जर त्यांच्यामुळे नकारात्मक परिणाम झाला असेल तर त्या केवळ मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणारे तज्ञच हाताळू शकतात. इतर कोणीही नाही. म्हणूनच या अशा सामाजिक उन्मादाचा बळी पडण्याआधी काही गोष्टींचा विचार आपण सगळ्यांनी विशेषत महिला वर्गानेही करायला हवा असं मला प्रामाणिकपणे वाटतं. आपण महिला भलेही सक्षमीकरणाच्या गोष्टी करतो तरीही खरंच आपण स्वतला सक्षम; मग ते मानसिकदृष्ट्या का असेना करतोय का? याचं आत्मचिंतन प्रत्येक मुलीने, महिलेने करावं असं मला मनापासून वाटतं. आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेबरोबरच मानसिक सुरक्षा ही महत्त्वाची असते. मानसिक सुरक्षा म्हणजेच – मी स्वतला सुरक्षित मानते, मी स्वतला आहे तशी स्वीकारते, मी स्वतचे निर्णय स्वत विचारपूर्वक घेऊ शकते, स्वतला निवडीचे स्वातंत्र्य देते, स्वतसाठी वेळ काढते, मी माझ्या कुटुंबाची काळजी घेण्यास समर्थ आहे.

या आणि अशाच काही गोष्टी आहेत ज्या केवळ स्त्रियांनी नाही तर पुरुषांनीही अंगीकारल्या पाहिजेत किंवा लक्षात तरी घेतल्या पाहिजेत.

# सत्पात्र आणि अपात्र

राज्यातील सुमारे साडेसातशे शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सरकारी अनुदानास अपात्र ठरवण्याचा निर्णय, हा राज्य सरकारचे आजवरचे धरसोडीचे धोरण, संस्थाचालक व सरकार यांच्यामधील साटेलोटे आणि खासगी शाळांकडे वाढता कल अशा वेगवेगळ्या दुखण्यांचा परिपाक आहे. सरकारने वारंवार संधी देऊनही आवश्यक निकषांच्या पूर्तीत अपयशी ठरलेल्या राज्यातील सव्वातीनशे माध्यमिक शाळा आणि चारशेहून अधिक कनिष्ठ महाविद्यालयांना वेतन अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र ठरवण्यात आले आहे.

या संस्था अडचणीत आल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यही धोक्यात आले आहे. आता या संस्थांमधील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये सामावून घ्यावे आणि संस्थांनी स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नव्याने मान्यता घ्यावी, असे पर्याय सरकारने ठेवले असले, तरी त्यापैकी किती शाळांची तेवढी क्षमता आहे, हा प्रश्न आहे. सध्याच्या पेचातून योग्य मार्ग काढतानाच यापुढे तरी शाळांच्या मान्यतेबाबत स्पष्ट धोरणाची गरज या निमित्ताने अधोरेखित होते.

शिक्षण सर्वदूर पोहोचविण्यासाठी राज्यात सर्वत्र जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांच्या शाळा आहेतच; या सरकारी शाळांच्या जोडीनेच खासगी संस्थांच्या शाळाही आहेत. वाढती विद्यार्थिसंख्या पाहता शाळांची गरज वाढत गेली, तशा खासगी शाळाही वाढत गेल्या. सुरुवातीला खासगी संस्थांना सरसकट अनुदान देण्याचे धोरण होते. कालांतराने वेतनेतर अनुदानावर मर्यादा आणल्या गेल्या आणि पुढे तर अनुदानासाठी पात्रतेच्या अटीही



वाढत गेल्या. शाळा सुरू करणाऱ्या बहुतांश संस्थांना शिक्षणाबद्दल आस्था असली, तरी काही संस्था या संस्थाचालकांच्या राजकीय आकांक्षांच्या पूर्ततेसाठीही आहेत. निव्वळ अनुदानासाठी संस्था सुरू करण्याचेही प्रकार झाले.


आज शिक्षण विभागाच्या तरतुदींमध्ये सर्वाधिक वाटा या अनुदानापोटीच खर्च होतो आणि वेतनवाढीमुळे तो खर्चही वाढत जातो. अनुदानाचे ओझे जड झाल्याने विना अनुदानित, पुढे कायमस्वरूपी विना अनुदानित अशी वेगवेगळी धोरणे सरकारने राबवून पाहिली. त्यापैकीच एक म्हणजे प्रारंभी विना अनुदानित संस्था काढणे आणि नंतर या ना त्या मार्गाने सरकारकडून टप्प्याटप्प्याने अनुदान मिळवणे अशी पद्धत सुरू झाली. यामध्ये राजकीय नेत्यांनी काढलेल्या संस्थांचाही समावेश आहे. अशा संस्थांना अनुदानासाठी काही सरकारी निकष आहेत. त्यामध्ये निर्धारित शैक्षणिक पात्रता असलेल्या प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती, कर्मचारी भरतीच्या आराखड्याचे पालन करणे आदींचा समावेश आहे. त्यांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यात आली. त्यातील काही संस्था वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही निकषांच्या पूर्ततेत अपयशी ठरल्या. त्या पार्श्वभूमीवर सरकारने ७३६ संस्थांना कायमस्वरूपी अपात्र ठरविले.

शाळांच्या अनुदान धोरणातील अस्पष्टता, त्यातील सातत्याचा अभाव, शाळांना मान्यता आणि अनुदान देणाऱ्या यंत्रणांमधील राजकीय दबाव-हितसंबंध आणि बदलत्या काळात पालकांचा खासगी शाळांकडे वाढता कल अशा बाबींच्या दुष्टचक्रात सध्या शिक्षण अडकले आहे. एकीकडे सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत असून, आपल्या पाल्यांना खासगी आणि शक्यतो इंग्रजी-सेमी इंग्रजी शाळांमध्ये घालण्याचा कल पालकांमध्ये वाढतो आहे.

तेथेही शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के विद्यार्थ्यांचा समावेश करून त्यांचा शैक्षणिक खर्च सरकारी अनुदानातून करण्यात येतो. मात्र सरकारी तिजोरीत खडखडाट असल्याने त्यापोटीचे सुमारे सव्वातीन हजार कोटींचे अनुदानही थकलेले आहे. अशा काळात शाळांना परवानगी मागताना आपण 'आत्मनिर्भर' आहोत, असे चित्र निर्माण केले जाते आणि कालांतराने सरकारी अनुदानासाठी लकडा लावण्यात येतो. मग राजकीय हितसंबंध आणि अन्य गैरप्रकार घडतात आणि अनियमितता असतानाही अनुदानाबाबत निर्णय घेतले जातात. अशा अनेक शाळांमध्ये 'भविष्यात अनुदान सुरू होईल,' या आशेवर शिक्षकांना विनावेतन किंवा तुटपुंज्या वेतनावर राबवून घेतले जाते.

गेली काही दशके शिक्षणमंत्री बदलले की सरकारची धोरणेही १८० अंशांच्या कोनात बदलली जातात आणि अनेकांना त्याचे फटके बसतात, असा महाराष्ट्रातला अनुभव आहे.

# सोशल मीडियाचे व्यसन



अमेरिकेत सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाबद्दल अनेक वर्षांपासून चर्चा सुरू आहे, पण नुकत्याच घडलेल्या एका महत्त्वाच्या न्यायालयीन निर्णयामुळे हा मुद्दा अधिक गंभीरपणे समोर आला आहे. एका महिलेने सोशल मीडियाच्या व्यसनामुळे तिच्या मानसिक आणि वैयक्तिक आयुष्यावर झालेल्या दुष्परिणामांचा दाखला देत संबंधित कंपन्यांविरोधात खटला दाखल केला व तो जिंकला. ही घटना केवळ एक वैयक्तिक विजय नसून संपूर्ण डिजिटल जगासाठी एक टर्निंग पॉइंट ठरू शकते. ही महिला (जिची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे) काही वर्षांपासून विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स'चा अतिवापर करत होती.

सुरुवातीला हा वापर केवळ मनोरंजन आणि मित्रांशी संपर्क साधण्यासाठी होता. मात्र हळूहळू ती या प्लॅटफॉर्म्सवर तासन्तास वेळ घालवू लागली. तिच्या दैनंदिन आयुष्याव र त्याचा परिणाम दिसू लागला. झोपेचा अभाव, चिंता, नैराश्य, आत्मविश्वास कमी होणे आणि सामाजिक आयुष्यापासून दूर जाणे वाढत गेले.

महिलेच्या म्हणण्यानुसार, सोशल मीडिया कंपन्यांनी जाणीवपूर्वक अशा अल्गोरिदम्सचा वापर केला, जे वापरकर्त्यांना जास्तीत जास्त वेळ पीनसमोर ठेवण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. 'Infinite scroòing', 'pushed notifications' आणि 'dopamine triggering content' यांसारख्या तंत्रांचा वापर करून वापरकर्त्यांना व्यसनाधीन बनवले जाते, असा तिचा आरोप होता. या प्रकरणात काही महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले आहेत.

डिझाइनद्वारे व्यसन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सने जाणीवपूर्वक अशी रचना केली आहे की, वापरकर्ते त्यावर जास्त वेळ घालवतील. हे तंबाखू किंवा जुगार उद्योगासारखेच आहे, असा वकिलांनी युक्तिवाद केला. इशा-यांचा अभाव कंपन्यांनी वापरकर्त्यांना संभाव्य मानसिक परिणामांबद्दल योग्य सूचना दिल्या नाहीत. युवकांवर परिणाम विशेषत तरुण वयोगटातील लोकांवर या व्यसनाचा जास्त परिणाम होतो, हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. कंपन्यांची जबाबदारी – केवळ प्लॅटफॉर्म पुरवणे पुरेसे नाही, तर त्याच्या वापरामुळे होणा-या परिणामांची जबाबदारीही कंपन्यांनी घ्यावी, असा मुद्दा मांडण्यात आला.

न्यायालयाने महिलेच्या बाजूने निर्णय देताना काही महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. सोशल मीडिया कंपन्यांनी वापरकर्त्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करून त्याचा व्यावसायिक फायद्यासाठी वापर केला, वापरकर्त्यांच्या आरोग्य आणि कल्याणापेक्षा 'engagement' आणि 'profit' यांना प्राधान्य दिले गेले, या कंपन्यांनी संभाव्य धोके माहीत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले. न्यायालयाने या प्रकरणात नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला आणि भविष्यात अशा प्रकारच्या डिझाइन पद्धतींवर नियंत्रण आणण्याचे संकेत दिले. आता मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांवर त्यांच्या उत्पादनांच्या डिझाइनमध्ये बदल करण्याचा दबाव वाढेल. 'screen time limits', 'usage warnings' आणि यांचा अधिक वापर होऊ शकतो. या निर्णयानंतर अशाच प्रकारचे अनेक खटले दाखल होण्याची शक्यता आहे. विशेषत पालक आपल्या मुलांच्या मानसिक आरोग्यावर झालेल्या परिणामांबद्दल कंपन्यांवर खटले दाखल करू शकतात.

# 'भूत बंगला'च्या शूटिंग दरम्यान अभिनेता अक्षय कुमारला दुखापत

बॉलिवूडचा खिलाडी अर्थात अभिनेता अक्षय कुमारला त्याच्या आगामी 'भूत बंगला' या हॉरर-कॉमेडी सिनेमाच्या शूटिंगदरम्यान स्टंट करताना दुखापत झाली. सिनेमाच्या




निर्मात्यांनी गुरुवारी म्हणजेच ९ एप्रिल २०२६ रोजी शेअर केलेल्या एका ॉप्ह् ऊप एमहो व्हिडिओमध्ये, अक्षय अ?क्शन सीन करताना दिसतोय. आपले अनेक स्टंट्स स्वतःच करण्यासाठी ओळखणारा जाणारा अभिनेता अक्षय कुमार या व्हिडिओमध्ये, हवेत उडी मारून 'जंप किक' मारताना दिसतोय. मात्र, जमिनीवर उतरताना त्याचा पाय घसरला आणि तो खाली पडला. यावेळी अक्षयला दुखापत झाली.

अक्षयनं केवळ 'व्हिज्युअल इफेक्ट्स' किंवा कृत्रिम तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्यापेक्षा, प्रत्यक्ष स्टंट्स स्वतःच करण्याच्या आपल्या पसंदीबद्दल नुकताच भाष्य केलं होतं. अक्षय म्हणालेला की, न्र्ङ किंवा चा अतिवापर केल्यास ॲक्शन सीनचा खरेपणा आणि त्यातील थरार कमी होऊ शकतो.

तसेच, प्रत्यक्ष स्टंट्समुळे प्रेक्षकांना त्या सादरीकरणामागे घेतलेले कष्ट खऱ्या अर्थाने अनुभवता येतात, असेही यावेळी तो म्हणाला.

या सिनेमात अक्षयबरोबरच परेश रावल, असरानी, राजपाल यादव, तब्बू आणि वामिका गब्बी हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. 'भूत बंगला' सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीख नुकताच पुढे ढकलण्यात आली असून सुरुवातीला हा सिनेमा १० एप्रिल २०२६ रोजी रिलीज होणार होता, परंतु आता हा सिनेमा १६ एप्रिल २०२६ रोजी रिलीज होणार आहे.

# 'शक्ती शालिनी'मध्ये अनीत पड्डाचा डबल धमाका?

बॉलिवूडमध्ये नव्या चेहऱ्यांना मोठ्या संधी मिळत आहेत आणि त्यात अभिनेत्री अनीत पड्डा सध्या खूप चर्चेत आहे. 'सैयारा' या चित्रपटातून प्रेक्षकांची मनं जिंकणारी अनीत आता 'शक्ती शालिनी' या मोठ्या प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. या चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे, ज्यामुळे चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'शक्ती शालिनी' हा मॅडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्समधील पुढचा चित्रपट आहे. याआधी या युनिव्हर्समधील 'थामा' चित्रपटाला अपेक्षित यश मिळालं नव्हतं. तरीही निर्मात्यांनी पुढील चित्रपटांची योजना आधीच जाहीर केली आहे. त्यानुसार 'शक्ती शालिनी' हा चित्रपट डिसेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अनीत पड्डा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे, ती या चित्रपटात दुहेरी भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. काही रिपोर्ट्सनुसार, दिग्दर्शक आदित्य सरपोतदार आणि निर्माते अमर कौशिक यांनी अनीतसाठी दोन वेगवेगळे आणि दमदार कॅरेक्टर तयार केले आहेत.




या दोन भूमिकांपैकी एक 'शक्ती' आहे, जी एक सामान्य महिला आहे. पण जेव्हा तिच्या कुटुंबावर वाईट शक्तींचा हल्ला होतो, तेव्हा ती शक्तिशाली रूप धारण करते. दुसरीकडे 'शालिनी' ही एक नकारात्मक किंवा वाईट शक्ती असलेली व्यक्तिरेखा आहे. त्यामुळे या चित्रपटात चांगलं आणि वाईट यांच्यातील संघर्ष दाखवला जाणार आहे. चित्रपटाची कथा बंगालच्या लोककथा आणि पौराणिक गोष्टींवर आधारित आहे. रिपोर्टनुसार, ही कथा एका सूड घेणाऱ्या महिला भुताभोवती फिरते. ही आत्मा झाडांमध्ये आणि पाण्याजवळ राहते आणि पुरुषांना शिक्षा देते, कारण तिच्याशी अन्याय झाला होता. या पार्श्वभूमीवर 'शक्ती' ही व्यक्तिरेखा त्या वाईट आत्म्याविरुद्ध लढताना दिसणार आहे. या कथेत देवी कालीच्या शक्तीचाही उल्लेख आहे, जी वाईट शक्तींवर मात करण्यासाठी पूजली जाते.

चित्रपटाचं शूटिंग नुकतंच सुरू झालं आहे. मुंबईत शूटिंगचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून सध्या 'मध आयलंड' येथे शूटिंग सुरू आहे. तिथे पश्चिम बंगालमधील एका छोट्या शहरासारखा सेट उभारण्यात आला आहे. पुढील शूटिंगसाठी टीम मध्य प्रदेशमधील दतिया, ग्वालियर आणि मुरैना या ठिकाणी जाणार आहे.

या चित्रपटात अनीत पड्डासोबत विशाल जेठवा आणि विनीत कुमार सिंह हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक वेगळा आणि रोमांचक अनुभव ठरणार आहे. एकूणच, 'शक्ती शालिनी'मध्ये अनीत पड्डाची दुहेरी भूमिका खरोखर असेल का, याबाबत अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही.

मात्र, या चर्चेमुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता प्रचंड वाढली आहे.

# 'लव्ह अँड वॉर' सेटवर कडक नियम

प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या आगामी 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटात प्रथमच रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल हे तिन्ही मोठे कलाकार एकत्र दिसणार आहेत. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

चित्रपट मोठ्या प्रमाणावर आणि भव्य स्वरूपात तयार केला जात असल्याने, त्यातील कोणतीही माहिती किंवा दृश्ये




लीक होऊ नयेत यासाठी निर्मात्यांनी कडक नियम लागू केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सेटवर मोबाइल फोन पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत.

शूटिंगच्या ठिकाणी प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येकाला आपला फोन आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

संजय लीला भन्साळी हे त्यांच्या चित्रपटांमधील भव्य सेट, उत्कृष्ट छायांकन आणि वेगळ्या कथा सांगण्याच्या शैलीसाठी ओळखले जातात. त्यामुळे 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटातही काहीतरी खास पाहायला मिळणार, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सेटवरील या कडक नियमांमुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे.

चित्रपटाच्या रिलीजबाबतही अनेक चर्चा सुरू आहेत. कारण रणबीर कपूर सध्या 'रामायण' या मोठ्या प्रोजेक्टवरही काम करत आहेत. त्यामुळे 'लव्ह अँड वॉर' कधी प्रदर्शित होणार, याबाबत स्पष्ट माहिती अद्याप समोर आलेली नाही.

मात्र, दिवाळीच्या आसपास काही मोठे चित्रपट येणार असल्याने रिलीज डेटबाबत अंदाज वर्तवले जात आहेत.

या चित्रपटाद्वारे रणबीर कपूर पुन्हा एकदा भन्साळींसोबत काम करत आहेत.

त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात 'सावरिया' या चित्रपटातून केली होती, ज्याचे दिग्दर्शनही भन्साळींनी केले होते. दुसरीकडे आलिया भट्ट यापूर्वी 'गंगूबाई काठियावाडी'मध्ये भन्साळींसोबत झळकली होती. तर विकी कौशल यांच्यासाठी हा पहिलाच अनुभव आहे.

एकूणच, 'लव्ह अँड वॉर' हा चित्रपट भव्यता, दमदार स्टारकास्ट आणि वेगळ्या कथेमुळे आधीपासूनच चर्चेत आहे. त्यातच सेटवरील कडक नियम आणि फोन बॅनसारखे निर्णय पाहता, हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक मोठा सिनेमॅटिक अनुभव ठरणार, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नागराज मंजुळेंच्या 'मटका किंग'चा ट्रेलर प्रदर्शित



मराठी सिनेविश्वात सैराट, फॅन्ड्री, नाळ यांसारख्या सिनेमांमधून मातीतल्या वास्तव वादी कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणारे दिग्दर्शक-निर्माते नागराज पोपटराव मंजुळे आता ओटीटीवर नव्या अवतारात झळकणार आहेत. मटका किंग या वेबसिरीजच्या माध्यमातून नागराज मंजुळे पुन्हा एकदा एक दमदार कथानक घेऊन समोर आले आहेत. सध्या या वेब सिरीजची मनोरंजन विश्वात एकच चर्चा आहे. ओटीटीवर येणारी 'मटका किंग' ही वेब सिरीज केवळ एक गुन्हेगारी कथा नसून नागराज मंजुळे यांची ही नवी निर्मिती एका अशा जगात घेऊन जाते, जिथे 'मटका' हा फक्त जुगार नसून सत्ता, गणित, मानसशास्त्र आणि सामाजिक वास्तव यांचा गुंता आहे.

'मटका किंग'ची कथा एका अशा काळात घडते, जेव्हा मटका हा फक्त खेळ नव्हता, तर अनेकांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू होता. या जगात पैसा जितक्या वेगानं येतो, तितक्याच वेगानं माणसाला गिळतोही. मालिका या जगाच्या ग्लॅमरला फक्त पृष्ठभागावर ठेवत नाही, तर त्यामागचं काळं वास्तव उघड करत जाते. एक अशी दुनिया, जी कधीकाळी जगली गेली होती, आणि एक अशी व्यक्तिरेखा, जी निरीक्षण आणि अनुभवातून घडवली गेली, हे दोन्ही प्राइम व्हिडिओच्या 'मटका किंग' मध्ये एकत्र येतात.

अभय कोराणे यांनी क्रिएट आणि लिहिलेली, तसेच नागराज पोपटराव मंजुळे यांनी क्रिएट, लिखित आणि दिग्दर्शित केलेल्या या मालिकेत विजय वर्मा, कृतिका कामरा, सई ताम्हणकर, सिद्धार्थ जाधव, भूपेंद्र जडावत आणि गुलशन ग्रोवर प्रमुख भूमिकांमध्ये आहेत. याबरोबरच भारत जाधव, गिरीश कुलकर्णी, जेमी लीव्हर, किशोर कदम, सायरस सहुकार, अर्पिता सेठिया, संभाजी तांगडे, इश्तियाक खान, संजीव जोटांगिया आणि सिमरन अश्विनी देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत.

# 'धुरंधर २'च्या यशानंतर सारा अर्जुनची मोठी झेप

धुरंधर २' या चित्रपटाच्या यशानंतर अभिनेत्री सारा अर्जुन सध्या प्रचंड चर्चेत आहे. या चित्रपटात तिच्या दमदार अभिनयामुळे प्रेक्षक आणि समीक्षक दोघांनीही तिचे कौतुक केले. विशेष म्हणजे, कमी वयात इतका प्रभावी अभिनय केल्यामुळे साऱ्यांचे लक्ष तिच्याकडे वेधले गेले. या यशानंतर आता तिच्या करिअरमध्ये एक मोठी संधी आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सारा अर्जुन आता हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री मधुबाला यांची भूमिका साकारताना दिसणार आहे. हा रोल तिच्या करिअरसाठी मोठा टर्निंग पॉइंट ठरू शकतो. मधुबालासारख्या आयकॉनिक अभिनेत्रीची भूमिका साकारणे हे कोणत्याही कलाकारासाठी मोठे आव्हान असते.

ही फिल्म दिग्दर्शिका जसमीत रीन यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणार असून, प्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माते संजय लीला भन्साळी या चित्रपटाचे निर्माते असणार आहेत. त्यामुळे या प्रोजेक्टबाबत चित्रपटसृष्टीत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या हा चित्रपट प्री-प्रोडक्शन टप्प्यात असून, यावर्षाच्या शेवटी शूटिंग सुरू होण्याची शक्यता आहे.




या चित्रपटाची कथा हिंदी सिनेमाच्या सुवर्णकाळावर आधारित असणार आहे. त्या काळातील वातावरण, संस्कृती आणि सिनेमाची जादू प्रेक्षकांसमोर जिवंत करण्याचा प्रयत्न या चित्रपटातून केला जाणार आहे.

मधुबालाची भूमिका साकारण्यासाठी सारा अर्जुन विशेष तयारी करत आहे. तिच्या लुकसाठी आणि व्यक्तिमत्त्वासाठी ती शारीरिक बदल (फिजिकल ट्रान्सफॉर्मेशन) करणार आहे. त्याचबरोबर तिची वेशभूषा, मेकअप, संवादफेक आणि बोलण्याच्या शैलीवरही विशेष लक्ष दिले जाणार आहे. चित्रपटाची टीम त्या काळातील प्रत्येक तपशील अचूकपणे दाखवण्यासाठी मेहनत घेत आहे.

याआधी 'धुरंधर' आणि 'धुरंधर २' या चित्रपटांमध्ये सारा अर्जुनने यालीना जमाली ही भूमिका साकारली होती. तिच्या या भूमिकेला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. तिच्या अभिनयामुळे ही व्यक्तिरेखा अधिक प्रभावी बनली. सारा अर्जुनने खूप लहान वयातच चित्रपटसृष्टीत काम करण्यास सुरुवात केली होती. हळूहळू तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता मधुबालासारखी प्रतिष्ठित भूमिका मिळाल्यामुळे तिच्या करिअरला नवी दिशा मिळणार आहे. या बातमीमुळे सारा अर्जुनचे चाहते खूपच उत्साहित झाले आहेत. तिला मोठ्या पडद्यावर मधुबालाच्या रूपात पाहण्यासाठी ते आतुरतेने वाट पाहत आहेत.

# घर फोडणारी बाई म्हणून श्रीदेवींवर चिखलफेक



बॉलिवूडच्या पहिल्या महिला सुपरस्टार म्हणून श्रीदेवी यांना ओळखले जाते. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक सिनेमे गाजवले. पण २०१८ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बॉलिवूड व त्यांच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला होता. त्यांचे कुटुंब तर अजूनही या धक्क्यातून सावरलेले नाही. अनेक प्रसंगी नवरा बोनी कपूर, मुली खुशी आणि जान्हवी कपूर त्यांची आठवण काढत असतात.

अलीकडेच, श्रीदेवींची मुलगी आणि अभिनेत्री जान्हवी कपूरने आपल्या आईबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला. श्रीदेवीच्या निधनाचा आपल्या आयुष्यावर किती खोलवर परिणाम झाला हे देखील तिने यावेळी सांगितले. शिवाय आईला घर फोडणारी महिला म्हणून लोक डिवचायचे यावरही तिने तिचे मत व्यक्त केले. खरेतर श्रीदेवी या बोनी कपूर यांच्या दुसऱ्या पत्नी आहे. यापूर्वी बोनी कपूर यांचे अर्जुन कपूरची आई मोना यांच्याशी लग्न झालेले. पदरात दोन मुलं असताना ते श्रीदेवींच्या प्रेमात पडलेले. लग्नापूर्वीच श्रीदेवी गरोदर होत्या त्यामुळे त्यांनी घाईत लग्न उरकलेले. या प्रकारामुळे अर्जुन कपूर त्याची बहिण अंशुला आणि आई मोना खूपच एकटे पडलेले. त्यामुळेच त्यांना घर फोडणारी महिला असे लोक म्हणायचे.

राज शमानीच्या शोला दिलेल्या मुलाखतीत, जान्हवी कपूरने श्रीदेवी यांच्याबद्दल आपले विचार व्यक्त केले. यावेळी तिने एका जुन्या मुलाखतीचाही संदर्भ दिला. ती म्हणाली, 'मी तिचा संपूर्ण प्रवास अगदी जवळून पाहिला आहे. ती हयात असताना, लोक तिच्याशी फारसे नीट वागत नसत. तिला 'घर फोडणारी' आणि अशाच इतर अनेक विचित्र नावांनी संबोधले जात असे. या सर्व टीका, टिप्पण्यांचा तिच्या मनावर खूप मोठा ताण येत होता. त्यामुळे तिच्या मनाला खूप वेदना होत असत; पण नंतर एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर लोक तिच्याबद्दल चांगल्याच गोष्टी बोलतात तसे काहीसे तिच्याबाबत झाले.'

एका मुलाखतीदरम्यान, जान्हवीला विचारण्यात आले की तिला आपल्या आईबद्दल काय सांगायला आवडेल. त्यावर तिने उत्तर दिलेले, 'आता मला तिची खरी किंमत समजली आहे. मला या गोष्टीचे वाईट वाटते की मी तिला याआधी का समजून घेतले नाही. तिचा दृष्टिकोन माझ्यापेक्षा पूर्णपणे वेगळा होता. जेव्हा मी लहान होते, तेव्हा गोष्टींकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन खूपच वेगळा होता. शेवटी, तिने अवघ्या चार वर्षांच्या वयातच काम करायला सुरुवात केली होती; तरीही तिने आपल्या संघर्षाच्या कथा आमच्याशी कधीच शेअर केल्या नाहीत. ती आम्हाला फक्त छान आनंदी गोष्टी सांगायची. मी एक अत्यंत परावलंबी मुलगी होते. मी माझे निर्णय कधीच स्वतः घेतले नाहीत; मी पूर्णपणे तिच्यावरच अवलंबून होते. काय घालायचे, काय करायचे, काय बरोबर आणि काय चूक अगदी प्रत्येक गोष्टीसाठी मला ती लागायची. त्यामुळे, आयुष्याच्या मध्यात अचानक स्वतःचे निर्णय स्वतःच घेण्याची वेळ येणे आणि तेही अशा वेळी, जेव्हा हे जग मला विस्कळीत करत आहे असे वाटत होते, आमच्या कौटुंबिक नात्यांवर दोषारोप करत होते, माझ्यासाठी हे अत्यंत कठीण होते. प्रत्येक गोष्टीसाठी मी तिच्याकडेच धाव घ्यायची.'

## जान्हवीला सतावतेय आईची आठवण

जान्हवीने आपल्या आईला गमावल्यामुळे होणाऱ्या वेदनांबद्दलही मन मोकळे केले. ती म्हणाली, 'आईला गमावल्यामुळे होणाऱ्या वेदनांचा स्वीकार करणे मला अजूनही जमत नाहीये. तिच्यासारखे दुसरे कोणीच नाही. मला तिची विनोदबुद्धी आणि तिचे हास्य या गोष्टींची खूपच आठवण येते. मला तिची खूप उणीव भासते. आज आम्ही जे काही आहोत मी, माझी बहीण आणि माझे वडील तसे आम्हाला घडवण्यात तिचा किती मोठा वाटा होता.



# घामाचा वास गायब!



उन्हाळा सुरू झाला की घाम, दुर्गंधी, त्वचेचे त्रास आणि चिकटपणा यामुळे अनेकजण त्रस्त होतात. अशा वेळी घरात सहज उपलब्ध असलेली तुरटी तुमच्यासाठी खूप उपयोगी ठरू शकते. तुरटी हा एक नैसर्गिक खनिज पदार्थ असून त्यात अँटीसेप्टिक आणि ॲस्ट्रिंजंट गुणधर्म असतात. त्यामुळे त्वचेच्या आणि स्वच्छतेच्या अनेक समस्यांवर ती प्रभावी उपाय ठरते. उन्हाळ्यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे घामाची दुर्गंधी. अनेकांना वाटतं की वास घामामुळे येतो, पण प्रत्यक्षात तो बॅक्टेरियामुळे निर्माण होतो. यावर सोपा उपाय म्हणजे तुरटी. थोडी ओलसर तुरटी बगलांमध्ये हलक्या हाताने चोळल्यास दुर्गंधी कमी होते आणि दिवसभर ताजेपणा टिकतो. फंगल इन्फेक्शन, खाज, लालसरपणा यांसारख्या त्वचेच्या समस्या देखील उन्हाळ्यात वाढतात. अशावेळी आंघोळीच्या पाण्यात थोडी तुरटी घातल्यास त्वचा स्वच्छ राहते आणि संसर्गाचा धोका कमी होतो. जर तुमची त्वचा कोरडी असेल, तर तुरटीसोबत थोडी ग्लिसरीन वापरणे अधिक फायदेशीर ठरते.

ऑईली त्वचा असणाऱ्यासाठी तुरटी खूप उपयुक्त आहे. उन्हाळ्यात चेहरा खूपच तेलकट दिसतो. यासाठी तुरटीचा टोनर बनवता येतो. एक कप पाण्यात एक चमचा तुरटी पावडर मिसळून कॉटनच्या मदतीने चेहऱ्यावर लावल्यास त्वचा स्वच्छ आणि फ्रेश दिसते. पिंपल्स आणि ॲक्नेच्या समस्येतही तुरटी मदत करते.

दह्यात एक चिमूटभर तुरटी मिसळून चेहऱ्यावर लावल्यास बॅक्टेरिया कमी होतात आणि पिंपल्स हळूहळू कमी होतात. यामुळे चेहऱ्यावरील डाग-धब्बेही कमी होतात आणि त्वचा उजळ दिसते.

तोंडाच्या दुर्गंधीवरही तुरटी प्रभावी उपाय आहे. उन्हाळ्यात शरीरात पाण्याची कमतरता झाल्याने तोंडातून वास येऊ शकतो. अशावेळी तुरटी पाण्यात मिसळून गुळण्या केल्यास तोंडातील बॅक्टेरिया कमी होतात आणि दुर्गंधी दूर होते. यामुळे दात आणि हिरड्यांचे आरोग्यही सुधारते.

मात्र, तुरटी वापरताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ती खूप प्रभावी असल्यामुळे जास्त प्रमाणात वापरल्यास त्वचा कोरडी पडू शकते किंवा जळजळ होऊ शकते. त्यामुळे तिचा वापर मर्यादित प्रमाणातच करावा. संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी वापरण्यापूर्वी पॅच टेस्ट करणे किंवा डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य ठरेल.

एकंदरीत, तुरटी ही स्वस्त, सहज मिळणारी आणि बहुपयोगी उपाय आहे. उन्हाळ्यातील अनेक समस्या दूर करण्यासाठी तिचा योग्य वापर केल्यास मोठा फायदा होऊ शकतो.

# अनावश्यक केस काढण्यासाठी फेस शेविंगचा पर्याय



आजकाल अनेक महिला चेहऱ्यावरील अनावश्यक केस काढण्यासाठी फेस शेविंगचा पर्याय निवडत आहेत. हा उपाय सोपा, कमी खर्चिक आणि घरच्या घरी करता येणारा असल्यामुळे लोकप्रिय होत आहे. मात्र, योग्य पद्धतीने शेविंग न केल्यास त्वचेला इजा होऊ शकते. त्यामुळे काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं आहे.

महिलांच्या चेहऱ्यावर बारीक केस असणं हे सामान्य आहे. पण काही वेळा हे केस जास्त गडद आणि दाट होऊ लागतात. अशा वेळी ते हार्मोन्सच्या बदलांमुळे किंवा काही आरोग्य समस्यांमुळे होऊ शकतं. अशा परिस्थितीत फेस शेविंग हा एक सोपा उपाय मानला जातो.

फेस शेविंगबद्दल अनेक गैरसमजही आहेत. काहींना वाटतं की शेविंग केल्याने केस जाड आणि जलद वाढतात. पण तज्ज्ञांच्या मते हे चुकीचं आहे. शेविंगमुळे केसांच्या वाढीवर कोणताही परिणाम होत नाही. उलट, हा केस काढण्याचा सुरक्षित आणि वेदनारहित मार्ग आहे.

तथापि, शेविंग करताना काही चुका टाळणं खूप महत्त्वाचं आहे. पहिली मोठी चूक म्हणजे कोरड्या त्वचेवर शेविंग करणे. ड्राय शेविंग केल्यास त्वचेवर कट, जळजळ आणि लालसरपणा येऊ शकतो. त्यामुळे शेविंग करण्यापूर्वी त्वचेवर मॉइश्चरायझर, जेल किंवा अलोवेरा जेल लावणं आवश्यक आहे. यामुळे ब्लेड त्वचेवर सहज सरकतं आणि त्वचा सुरक्षित राहते.

दुसरी चूक म्हणजे केसांच्या उलट दिशेने शेविंग करणे. अनेकजण लवकर परिणाम मिळावा म्हणून ही चूक करतात. पण यामुळे त्वचेला त्रास होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, नेहमी केस ज्या दिशेने वाढतात त्याच दिशेने शेविंग करावी. यामुळे कट्स, रेजर बर्न आणि इनग्रोन हेअरचा धोका कमी होतो.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेविंगनंतर त्वचेची योग्य काळजी घेणे. शेविंग केल्यानंतर त्वचा संवेदनशील होते आणि पोर्स उघडे राहतात. त्यामुळे त्या दिवशी रेटिनॉइड्स, एएचए किंवा बीएचए सारखे सक्रिय घटक असलेले प्रॉडक्ट्स वापरणं टाळावं. यामुळे त्वचेवर जळजळ आणि लालसरपणा वाढू शकतो. त्याऐवजी हलकं मॉइश्चरायझर लावणं अधिक फायदेशीर ठरतं.

या साध्या टिप्स फॉलो केल्यास तुम्ही घरच्या घरी सुरक्षितपणे फेस शेविंग करू शकता आणि त्वचा गुळगुळीत व स्वच्छ ठेवू शकता. योग्य पद्धतीने केलेली शेविंग त्वचेला कोणतीही हानी न पोहोचवता सुंदर लुक देते.



# तुळशीच्या पानांत दडले आहे सौंदर्याचे रहस्य

स्वच्छ, तेजस्वी आणि निरोगी त्वचा ही सगळ्यांचीच इच्छा असते. मात्र प्रदूषण, ताणतणाव आणि बदलती जीवनशैली यामुळे मुरुम, डाग-धब्बे आणि त्वचेचा निस्तेजपणा वाढतो. अशा वेळी आपण एक घरगुती, स्वस्त आणि सुरक्षित उपाय वापरू शकतो तो म्हणजे तुळस.भारतीय घराघरांत पूजेत असलेली तुळस ही केवळ पवित्र वनस्पती नसून औषधी गुणांचा खजिना आहे. राष्ट्रीय आयुर्वेद संस्थेनुसार, तुळशीमध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-ऑक्सिडंट गुण रक्त शुद्ध करतात आणि त्वचेच्या समस्या मुळापासून कमी करण्यास मदत करतात.

**तुळस त्वचेसाठी कशी फायदेशीर ठरते?**

तुळशीमध्ये अँटी-इन्फ्लेमेटरी गुण असल्यामुळे त्वचेवरील सूज, लालसरपणा आणि मुरुम कमी होतात. तुळशीचं नियमित सेवन केल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि त्वचा आतून स्वच्छ होते. तज्ज्ञांच्या मते, तुळस ही महागड्या क्रीम्स आणि केमिकल ट्रीटमेंटपेक्षा जास्त सुरक्षित आणि परिणामकारक आहे.

**तुळशीचा फेस पॅक**

मुरुम आणि हट्टी डागांसाठी ८–१० तुळशीची पानं बारीक वाटून त्यात मुलतानी माती किंवा मध मिसळा. हा लेप २० मिनिटं चेहऱ्यावर लावा आणि नंतर कोमट पाण्याने धुवा. आठवड्यातून २ वेळा वापरल्यास त्वचेत लक्षणीय सुधारणा दिसू शकते.

**तुळशीचं पाणी**

रात्री एका ग्लास पाण्यात ५–७ तुळशीची पानं भिजत ठेवा. सकाळी उपाशीपोटी हे पाणी प्या. यामुळे शरीर आतून स्वच्छ होतं, चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि नवीन मुरुम येणं कमी होतं.

तणावामुळे होणाऱ्या मुरुमांसाठी तुळशीचा चहा फायदेशीर ठरतो. तुळशीची पानं पाण्यात उकळून त्यात थोडं मध किंवा लिंबू घालून प्या. हा चहा रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो.

# ४० नंतरही त्वचा दिसेल तरुण!



वाढत्या वयानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या येणे, त्वचा सैल होणे आणि चमक कमी होणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. विशेषतः ४० वर्षांनंतर त्वचेतील कोलेजन कमी होत असल्याने चेहऱ्याची चमक कमी होत जाते. मात्र योग्य स्किन केअर रूटीनचा अवलंब केल्यास त्वचा अधिक काळ निरोगी आणि चमकदार ठेवता येते. सध्या अनेक सेलिब्रिटी वापरत असलेला आइस वॉटर फेशियल हा त्यातील एक सोपा आणि प्रभावी उपाय मानला जात आहे.

उन्हाळ्याची सुरुवात होताच उष्णता, घाम आणि धूळ यांचा त्वचेवर परिणाम दिसू लागतो. त्यामुळे त्वचा काळवंडणे, तेलकटपणा वाढणे आणि चेहऱ्याची नैसर्गिक चमक कमी होणे अशा समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत आइस वॉटर फेशियल त्वचेला ताजेतवाने ठेवण्यासाठी उपयोगी ठरते.

अनेक अभिनेत्री आपल्या सौंदर्याच्या दिनक्रमात हा उपाय नियमित करतात. आलिया भट्ट आणि कॅटरीना कैफ यांसारख्या अभिनेत्री सकाळी उठल्यानंतर किंवा मेकअप करण्यापूर्वी काही सेकंद चेहरा बर्फाच्या पाण्यात ठेवतात. यामुळे त्वचेला त्वरित ताजेपणा मिळतो आणि चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो दिसतो.

**आइस वॉटर फेशियलचे फायदे**

**१. त्वचा घट्ट होते**

थंड पाण्यामुळे त्वचेचे पोर्स आकुंचन पावतात. त्यामुळे त्वचा अधिक टाइट दिसते आणि सुरकुत्या काही प्रमाणात कमी दिसू शकतात.

२. चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते

बर्फाच्या पाण्यामुळे चेहऱ्यातील रक्ताभिसरण वाढते. त्यामुळे त्वचेला गुलाबी आणि ताजेतवाने लूक मिळतो.

३. सूज आणि पफिनेस कमी होते

सकाळी उठल्यानंतर अनेकांच्या डोळ्याखाली किंवा चेहऱ्यावर सूज दिसते. आइस वॉटर फेशियल केल्याने ही सूज पटकन कमी होते.

४. मेकअप जास्त वेळ टिकतो

मेकअप करण्यापूर्वी हा उपाय केल्यास त्वचेतील अतिरिक्त तेल नियंत्रित होते. त्यामुळे मेकअप स्मूथ दिसतो आणि जास्त वेळ टिकतो.

**आइस वॉटर फेशियल करण्याची योग्य पद्धत**

हा उपाय खूप सोपा आहे. एका मोठ्या भांड्यात थंड पाणी घ्या आणि त्यात काही बर्फाचे तुकडे टाका. त्यानंतर चेहरा त्या पाण्यात १० ते १५ सेकंद बुडवा. ही प्रक्रिया २ ते ३ वेळा करा. यामुळे त्वचेला ताजेपणा मिळतो आणि चेहरा अधिक फ्रेश दिसतो.

**काही गोष्टी लक्षात ठेवा**

जर तुमची त्वचा खूप संवेदनशील असेल किंवा सायनसची समस्या असेल, तर हा उपाय करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तसेच चेहरा जास्त वेळ बर्फाच्या पाण्यात ठेवू नये, कारण त्यामुळे त्वचा कोरडी होऊ शकते. योग्य स्किन केअर, पुरेसे पाणी, संतुलित आहार आणि नियमित झोप यामुळेही त्वचा निरोगी राहते. त्यामुळे साध्या घरगुती उपायांसोबत चांगल्या सवयीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

# प्रेग्नेंसीत मूळव्याध का होतो?



गर्भधारणा हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील एक अतिशय नाजूक आणि महत्त्वाचा टप्पा असतो. या नऊ महिन्यांच्या प्रवासात शरीरात अनेक बदल घडत असतात, जे बाळाच्या वाढीसाठी आवश्यक असतात. मात्र, या बदलांमुळे गरोदर महिलांना काही शारीरिक व्याधींचा सामना करावा लागतो. यापैकीच एक अत्यंत त्रासदायक समस्या म्हणजे मूळव्याध, ज्याला आपण 'पाईल्स' म्हणूनही ओळखतो. कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई येथील सल्लागार स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. बंदिता सिन्हा यांच्या मते, ही समस्या जरी वेदनादायी असली तरी योग्य व्यवस्थापन आणि जागरूकतेने ती हाताळली जाऊ शकते.

**गर्भधारणेत मूळव्याध का होतो?**

गर्भधारणेदरम्यान मूळव्याध विकसित होण्यामागे प्रामुख्याने तीन महत्त्वाची कारणे असतात. पहिले कारण म्हणजे 'पेल्विक वेनस प्रेशर'. जसा जसा गर्भाशयाचा आकार वाढतो, तसा त्याचा थेट दाब ओटीपोटातील रक्तवाहिन्यांवर पडतो. या दाबामुळे गुदाशयाच्या सभोवतालच्या शिरा फुगतात आणि तिथे सूज निर्माण होते.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे हार्मोनल बदल. गरोदरपणात शरीरातील प्रोजेस्टेरॉन हार्मोनचे प्रमाण वाढते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांच्या भिंती शिथिल होतात आणि त्यांना सूज येण्याची शक्यता वाढते. तिसरे आणि सर्वात सामान्य कारण म्हणजे बद्धकोष्टता पचनसंस्था मंदावल्या मुळे आणि लोहयुक्त गोळ्यांमुळे अनेकदा गरोदरपणात पोट साफ होत नाही, परिणामी मूळव्याधाचा त्रास सुरू होतो किंवा आधीचा त्रास वाढतो.

लक्षणे आणि आईच्या आयुष्यावर होणारा परिणाम

मूळव्याध ही समस्या आईसाठी शारीरिकदृष्ट्या अतिशय अस्वस्थ करणारी असते. यामध्ये प्रामुख्याने गुदाशयाच्या ठिकाणी खाज सुटणे, तीव्र वेदना होणे, बसताना अस्वस्थता जाणवणे आणि काही वेळा मलविसर्जनाच्या वेळी रक्तस्त्राव होणे अशी लक्षणे दिसतात. डॉ. बंदिता सिन्हा स्पष्ट करतात की, जरी ही लक्षणे आईच्या दैनंदिन आयुष्याची गुणवत्ता खराब करू शकतात, तरी एका गोष्टीचा दिलासा आहे की, मूळव्याध पोटातील बाळासाठी अजिबात धोकादायक नसतो. बहुतांश प्रकरणांमध्ये, प्रसूतीनंतर शरीरातील अंतर्गत दाब कमी झाल्यावर ही समस्या आपोआप सुधारू लागते किंवा पूर्णपणे बरी होते.

**घरगुती उपाय आणि जीवनशैलीतील बदल**

मूळव्याधावर उपचार करण्यापेक्षा तो वाढू नये यासाठी व्यवस्थापन करणे अधिक महत्त्वाचे असते. या व्यवस्थापनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे बद्धकोष्टता रोखणे आणि शौचास बसल्यावर जोर लावणे टाळणे हे आहे. यासाठी खालील सवयी अत्यंत फायदेशीर ठरतात:

दिवसातून किमान ८ ते १० ग्लास पाणी प्यावे, जेणेकरून मल मऊ राहील आणि पचन सुलभ होईल.एकाच जागी तासनतास बसून राहिल्याने खालच्या भागावर दाब वाढतो. शक्य असल्यास दर तासाला थोडे चालावे.

# १८ ते ५० वयात किती वेळा संबंध ठेवावेत?



शारीरिक संबंध हा प्रत्येकाच्या वैयक्तिक आयुष्याचा अत्यंत खास आणि संवेदनशील भाग मानला जातो. 'नेमका किती वेळा संबंध ठेवणं सामान्य आहे?' किंवा 'आपलं जीवन इतरांपेक्षा वेगळं आहे का?' अशा स्वरूपाचे अनेक प्रश्न अनेकांच्या मनात डोकावत असतात; मात्र त्याचे ठोस उत्तर कुठेच मिळत नाही. कारण- शारीरिक संबंधांबाबत 'नियमांचे' कोणतेही पुस्तक नसते.

मात्र, अलीकडेच एका संशोधनाने या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या अहवालामुळे अनेकांच्या मनातील कुतूहल वाढले आहे; पण त्याच वेळी काही महत्त्वाच्या गोष्टीही समोर आल्या आहेत.

**संशोधन नेमकं काय सांगतं?**

किन्से इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च इन सेक्स, रिप्रॉडक्शन अँड जेंडर या संस्थेने विविध वयोगटांतील लोकांच्या शारीरिक संबंधांच्या वारंवारतेचा अभ्यास केला. या अभ्यासात वेगवेगळ्या वयोगटांतील व्यक्ती एका वर्षात सरासरी किती वेळा संबंध ठेवतात, याचा आढावा घेण्यात आला.

**१८ ते २९ वयोगट – सर्वाधिक वारंवारता**

संशोधनानुसार, १८ ते २९ वयोगटातील व्यक्ती वर्षभरात सरासरी सुमारे ११२ वेळा शारीरिक संबंध ठेवतात. या वयोगटात ऊर्जा, आकर्षण आणि नात्यातील उत्साह अधिक असल्याने ही संख्या जास्त असू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

३० ते ३९ वयोगट – जबाबदाऱ्यांचा प्रभाव

३० ते ३९ वयोगटात ही वारंवारता कमी होऊन वर्षाला सरासरी ८६ वेळा शारीरिक संबंध घडतो. या टप्प्यावर करिअर, कुटुंब आणि इतर जबाबदाऱ्या वाढू लागतात. त्यामुळे वैयक्तिक वेळ कमी पडतो आणि त्याचा परिणाम नात्यातील या घटकावरही दिसू शकतो.

**४० ते ४९ वयोगट – आणखी घट**

४० ते ४९ वयोगटात शारीरिक संबंध येण्याची ही संख्या आणखी कमी होऊन, वर्षाला सुमारे ६९ वेळांपर्यंत येते. वाढतं वय, आरोग्याच्या समस्या आणि जीवनशैलीतील बदल यांमुळे ही घट दिसून येते, अशी शक्यता व्यक्त केली जाते.

**विवाहानंतर चित्र बदलतं?**

संशोधनातील एक लक्षवेधी बाब म्हणजे विवाहानंतर या वारंवारतेत झालेली घट. सुमारे १३ टक्के विवाहित जोडपी वर्षातून फारच कमी वेळा शारीरिक संबंध ठेवतात; तर सुमारे ४५ टक्के जोडपी महिन्यात काही वेळाच या गोष्टीसाठी वेळ काढतात.

त्यामागे अनेक कारणे असू शकतात. दैनंदिन जबाबदाऱ्या, कामाचा ताण, घरगुती कामे, मुलांची काळजी आणि मानसिक थकवा. या सर्वांचा परिणाम वैयक्तिक आयुष्यावर होतो.

इतर काही महत्त्वाचे निष्कर्ष

या अभ्यासात असेही दिसून आले की, सुमारे ३४ टक्के लोक आठवड्यातून दोन ते तीन वेळा शारीरिक संबंध ठेवतात; तर केवळ सात टक्के लोक आठवड्यात चार ते पाच वेळा संबंध ठेवतात.

हे आकडे वेगवेगळ्या जीवनशैली, आरोग्य आणि नात्यांतील समजुतीनुसार बदलू शकतात.

**वारंवारता का कमी होते?**

तज्ज्ञांच्या मते, वयानुसार शरीरात होणारे बदल, आरोग्याच्या समस्या, तणाव, मानसिक थकवा आणि वाढत्या जबाबदाऱ्या यांमुळे शारीरिक संबंधांची वारंवारता कमी होत जाते. त्याशिवाय नात्यातील संवाद आणि भावनिक जवळीक या बाबीही या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावतात.

# सतत ढेकर येतात?

ढेकर येणे हे प्रामुख्याने आपण अन्नासोबत गिळलेल्या हवेमुळे होते. अन्नाचे पचन होताना पोटात वायू तयार होतो जो वरच्या दिशेने अन्ननलिकेतून बाहेर पडतो. 'हार्वर्ड हेल्थ' च्या संशोधनानुसार, जर ढेकर येण्यासोबत छातीत जळजळ किंवा तोंडात आंबट पाणी येत असेल, तर तो लक्षण असू शकते. आपल्या पचनसंस्थेतील लोअर इसोफेजियल स्फिंक्टर ही झडप सैल पडल्यास पोटातील हवा आणि ॲसिड वारंवार वर येते ज्यामुळे सतत ढेकर येतात.

क्लेव्हलँड क्लिनिकच्या अहवालानुसार, अनेकांना जेवताना किंवा काहीही खाताना त्यासोबत नकळत हवा गिळण्याची सवय असते, जी ढेकर येण्याचे सर्वात मोठे कारण आहे:

घाईघाईने खाणे : वेगाने जेवताना अन्नासोबत मोठी हवा पोटात जाते.

स्ट्रॉचा वापर किंवा च्युइंगम : यामुळे तोंडात सतत हवा शिरते.

कार्बोनेटेड पेये : सोडा किंवा शीतपेयांमधील कार्बन डायऑक्साइड वायू पोटात गेल्यावर ढेकर स्वरूपात बाहेर पडतो.जेव्हा अन्न नीट पचत नाही, तेव्हा पोटात त्याचे 'फर्मेन्टेशन' (कुजणे) सुरू होते.

प्रक्रिया : यामुळे कार्बन डायऑक्साइड आणि हायड्रोजन वायू तयार होतात. जर हा वायू खालच्या दिशेने बाहेर पडू शकला नाही तर तो ढेकर स्वरूपात वर येतो.

लक्षणे : पोट फुगणे आणि पोट जड वाटणे.

ॲसिड रिफ्लक्स आणि

'अमेरिकन कॉलेज ऑफ गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी' नुसार, ढेकर येणे हे ?सिडिटीचे छुपे लक्षण आहे:

जेव्हा पोटातील ॲसिड अन्ननलिकेत येते, तेव्हा व्यक्तीला अस्वस्थ वाटते आणि ती वारंवार लाळ गिळण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत जास्त हवा पोटात जाते, ज्यामुळे पुन्हा ढेकर येतात. लक्षणे : ढेकर आल्यावर घशात किंवा छातीत जळजळ होणे.काहीवेळा वारंवार ढेकर येणे हे पोटातील संसर्गाचे लक्षण असते. बॅक्टेरिया पोटाच्या अस्तराला इजा पोहोचवतो आणि अधिक प्रमाणात गॅस तयार करतो. जर ढेकर येण्यासोबत पोटात दुखत असेल किंवा भूक मंदावली असेल तर ही गंभीर समस्या असू शकते.

नियंत्रण आणि प्रतिबंध

हळू जेवा : अन्नाचा प्रत्येक घास नीट चावून खाल्ल्याने हवा कमी गिळली जाते.

# जादूटोणा कायदा



महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा अधिनियम २०१३ हा अंधश्रद्धेमुळे होणारे शोषण थांबवण्यासाठी २६ ऑगस्ट २०१३ रोजी लागू झालेला क्रांतिकारी कायदा आहे. हा कायदा जादूटोणा, अघोरी प्रथा, नरबळी प्रतिबंध करून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी बनवला आहे. एखाद्या व्यक्तीने, समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दृष्टीने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या सर्व बाबी या कृतीपैकी कोणतीही कृती स्वत: करणे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून करवून घेणे किंवा त्या कृती करण्यास इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करणे असा आहे.

**जादूटोणा कायद्याखाली शिक्षा काय आहे?**

या कायद्याखालील गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. कायद्यानुसार गुन्हा सिद्ध झाल्यास त्या व्यक्तीला किमान ६ महिने ते जास्तीत जास्त ७ वर्षांचा कारावास आणि किमान ५ ते जास्तीत जास्त ५० हजारांचा दंड होऊ शकतो.

खटला चालविण्याचे अधिकार : महानगर दंडाधिकारी किंवा प्रथमवर्ग, न्यायदंडाधिकारी व त्याच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे न्यायालय.

**या कायद्यानुसार काय गुन्हा ठरू शकतो?**

भूत उतरवण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला दोराने वा साखळीने बांधून मारहाण करणे, काठीने वा चाबकाने मारणे, तिला पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे, मिरचीची धुरी देणे, लैंगिक कृत्य करण्यास जबरदस्ती करणे.

एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे.

अलौकिक शक्तीची कृपा मिळवण्याच्या हेतूने आणि जीवाला धोका निर्माण होईल, शरीराला जीवघेण्या जखमा होतील अशा अमानुष, अघोरी, अनिष्ट प्रथांचा अवलंब करणे.

मौल्यवान वस्तू, गुप्तधन आणि जलस्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष, अनिष्ट, अघोरी कृत्य, जादूटोणा करणे.

जारणमारण वा अन्य कारणाने नरबळी देणे किंवा देण्याचा प्रयत्न करणे.आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती असल्याचं भासवून किंवा एखाद्या व्यक्तीत अशी शक्ती असल्याचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा तिचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होईल असं सांगणे, धमकी देणे, फसवणे, ठकवणे.

एखादी व्यक्ती करणी, जादूटोणा करते, भूत लावते वा मंत्रतंत्राने जनावरांचं दूध आटवते असा समज निर्माण करणे किंवा एखादी व्यक्ती अपशकुनी आहे, रोगराईला कारणीभूत आहे असं भासवून तिला त्रास देणे.करणी व चेटूक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणं किंवा तिच्या रोजच्या व्यवहारांवर बंदी घालणं.मंत्राच्या मदतीने भूत-पिशाच्च्यांना आवाहन करणे व करण्याची धमकी देऊन एखाद्याच्या मनात भीती निर्माण करणे.कुत्रा, साप, विंचू चावल्यास एखाद्या व्यक्तीला उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून त्याऐवजी मंत्रतंत्र, गंडेदोरे किंवा यासारखे उपचार करणे.बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो, असा दावा करणे किंवा गर्भवती स्त्रीच्या गर्भाचे लिंग बदलण्याचा दावा करणे.स्वतःत अलौकिक शक्ती असल्याचा दावा करणे किंवा कुणाचा अवतार असल्याचं वा स्वतःचा आत्मा पवित्र असल्याचं भासवणे.मूल न होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्तीद्वारे मूल होण्याचं आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे.

कायद्यातून काय वगळण्यात आले आहे?जोशी, नंदीबैलवाले व इतर ज्योतिषांद्वारे दिला जाणारा सल्ला आणि वास्तुशास्त्र, जमिनी खालील पाणी सांगण्याबद्दलचा सल्ला.कोणत्याही धार्मिक वा आध्यात्मिक स्थळी घातलेल्या प्रदक्षिणा, यात्रा, परिक्रमा, याप्रकारचे उपासना मार्ग.'वारकरी संप्रदायाच्या वाऱ्या.

हरिपाठ, कीतर्न, भजन-प्रवचन व इतर धार्मिक वा पारंपरिक शास्त्रांचे, विद्या-कलांचे शिक्षण, आचरण, प्रचार, प्रसार.दिवंगत संतांचे चमत्कार सांगणे, त्यांचा प्रचार-प्रसार व साहित्य वितरण करणे. शारीरिक व आर्थिक नुकसान न करणाऱ्या प्रकारचे धर्मगुरूंचे चमत्कार सांगणे, त्याचा प्रचार-प्रसार आणि साहित्य वितरण करणे.घर, मंदिर, दर्गा, गुरुद्वारा, पॅगोडा, चर्च किंवा इतर प्रार्थनास्थळ अशा ठिकाणी व्यक्तींकडून किंवा व्यवस्थापनांकडून शारीरिक वा आर्थिक नुकसान न करणारे प्रार्थना, उपासना आणि धार्मिक विधी

सर्व धार्मिक उत्सव, सण, विधी, प्रार्थना, मिरवणूक आणि त्या संबंधीची इतर धार्मिक कृत्ये. अंगात येणे, कडकलक्ष्मी, व्रतवैकल्ये, उपवास, नवस बोलणे, मन्नत मागणे, मोहरम मिरवणूक आदि सर्व धार्मिक विधी.राज्यशासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित केलेल्या कोणत्याही धार्मिक पारंपरिक कृती.

# आभाळमाया : नवे ग्रह



आपण माणसांच्या, त्यांच्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व देतो. आजकाल प्राण्यांच्या स्वातंत्र्याची चर्चा होत असते. एकूणच सजीवांनी सुखेनैव जगावे असा अगदी संतसाहित्यापासून मिळालेला सर्व जिवाच्या उत्कर्षाचा विचार सांगितला जातो, तो योग्यच आहे. परंतु ज्या निर्जीव गोष्टी विराट विश्वात आहेत, त्यांचे नैसर्गिक नियम आपोआप घडत गेले आहेत. त्याचाच शोध खूप सखोल संशोधन करून आपल्यापुढे आणण्याचा प्रयत्न खगोलतज्ञ करत असतात.

पृथ्वीपलीकडे इतर कुठे सजीव असतील तर त्यांचा निश्चित पत्ता आपल्याला लागलेला नाही. कधी कुठे सूक्ष्मजीव सापडला तरी त्याची बातमी होते. याचा अर्थ विश्वात अन्यत्र सजीव आणि आपल्यासारखे किंवा आपल्यापेक्षा अधिक प्रगत-सजीव असण्याची भरपूर शक्यता आहे. याचे कारण म्हणजे आपल्याच आकाशगंगेत २०० अब्ज तारे आहेत. त्यातले काही आपल्या सूर्यापेक्षा लहान तर काही मोठे. त्यापैकी अनेकांभोवती विशाल ग्रहमालाही आहेत. हळूहळू आपल्याला या ग्रहमालांचा थोडाथोडा शोध लागतोय. अती शक्तिशाली 'जेम्सवेब'सारख्या अवकाशी दुर्बिणी विश्वातील पसारा आणि विश्वजन्माच्या जवळच्या काळातील वैश्विक घडामोडी थेट फोटोंच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवत आहेत.

आधी उल्लेख केला तसे तारे आणि त्यांच्या ग्रहमाला तपासून एखादा ग्रह एखाद्या ताऱ्याच्या 'हॅबिटेबल झोन' किंवा वसतीयोग्य पट्ट्यात येतो का ते पाहिलं जातंय. विश्वास दूरस्थ तारकासमूहात (शौरी किंवा हर्क्युलससारख्या) रेडिओ संदेश पाठवले जातायत आणि व्हॉएजर-१ यान तर सूर्यमाला ओलांडून १ प्रकाशदिवस किंवा २६ अब्ज किलोमीटरचा प्रवास येत्या नोव्हेंबरमध्ये पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. आपल्याला आणखी कुठल्या 'जीवसृष्टी'चा वगैरे शोध घ्यायचा असेल तर एखादा तारा नि त्याभोवतीची ग्रहमाला असंच मॉडेल (आपल्या अस्तित्वावरून) शोधावं लागणार. एखाद्या ग्रहाच्या अगदीजवळ असणारा आणि सतत धगधगणारा ग्रह सजीवांना जगू देणार नाही. तीच स्थिती त्या ताऱ्यापासून खूप दूर असलेल्या अतिशीत ग्रहाची. तिथे कदाचित काही सूक्ष्मजीव (मायक्रोब) सापडू शकतील, पण आपल्याला 'काय, कसं काय?' म्हणू शकणारा सजीव शोधायचा तर एखाद्या ताऱ्याच्या 'हॅबिटेबल' झोनमधल्या सुरक्षित ग्रहाचा मागोवा घ्यायला हवा.

पण समजा काही ग्रह कुठल्या एका ताऱ्याशी, आपल्या ग्रहमालेसारखे 'बांधील' राहायला तयार नसतील तर? म्हणजे त्यांनी तसं स्वतः ठरवणं शक्य नाही, पण निसर्गतःच ते एकांडे शिलेदार असू शकतात. मग असे किती ग्रह असतील? कुठे असतील? कसे असतील? त्यांच्या एकटेपणाला किंवा मुक्त स्वातंत्र्याला कधी बाधा येत असेल का? एखाद्या प्रभावी ताऱ्याचं गुरुत्वाकर्षण त्यांना 'पकडून' स्वतःभोवती फिरायला लावत असेल का? असे कितीतरी प्रश्न या लेखात अशाच एकांड्या किंवा 'स्वतंत्र' ग्रहांविषयी माहिती घेऊ या. इंग्लिशमध्ये त्यांना 'रोग' म्हणजे निरुद्देश भटके असं म्हणतात. 'रोग'चा दुसरा अर्थ बदमाश असाही होतो. मुळात ते ग्रह म्हणजे भावभावना असलेली माणसे नव्हेत. त्यांना 'रोग' म्हणणे तितकेस उचित नाही. भटके या अर्थी ठीक आहे, परंतु 'स्वतंत्र' का नाही म्हणायचं. काही वर्षांपूर्वी सूर्याच्या करोना किंवा प्रभामंडलासारखे 'स्पाइक' आहेत म्हणून त्या व्हायरसचं नाव करोना (!) ठेवलं गेलं. नुसतं थॉर्नी (काटेरी) म्हटलं असतं तरी चाललं असतंष्ठ जाऊ द्या. आपण या भटक्या ग्रहांना 'स्वतंत्र' म्हणू या.

अवकाशात स्वतंत्रपणे तरंगणारे असंख्य ग्रह कुठल्याच ताऱ्याला 'बांधील' किंवा त्याच्या 'अंकित' नसतात. आपली ग्रहमाला आपल्या सूर्यापासून निर्माण झाली. म्हणजे ग्रहांच्या जन्मासाठी एक 'जनक' तारा (पेरेन्ट स्टार) लागतो. त्यावरून हे 'स्वतंत्र' ग्रह आधी एखाद्या ताऱ्यापासून निर्माण होऊन त्याच्या बंधनातून सुटून दूर भिरकावले गेले असण्याचीही शक्यता आहे. दुसऱ्या सिद्धांतानुसार विश्वनिर्मितीच्या प्रक्रियेत असे ग्रह एकटेच जन्माला आले असण्याची शक्यता आहे. कारण विश्वात असे अनेक 'ट्रिलियन' (एकावर १२ शून गुणिले कितीही) स्वतंत्र ग्रह भिरभिरतायत.

मग त्यातला एखादा 'चक्रम' ग्रह भरकटत आपल्या पृथ्वीवर येऊन आदळेल का? ही धास्ती अशासाठी की, आपल्या 'आकाशगंगा' दीर्घिकेतच अब्जावधी 'स्वतंत्र' ग्रह फिरतायत. मात्र अभ्यासकांच्या मते असा कुठलाही 'भटका' ग्रह पृथ्वीपर्यंत पुढच्या हजार वर्षांत येण्याची शक्यता एक अब्जाशही नाही.

विश्वात काही ग्रह-वस्तुमान, ताऱ्यासदृश पद्धतीने निर्माण झाले असावेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय खगोल अभ्यास संस्थेने त्यांना उप-तपकिरी-खुजे समजावं (सब ब्राऊन ड्वार्फ) त्याचं एक संभाव्य उदाहरण सीएचए-११०९१३-७७३४४ या क्रमांकाच्या 'रोग' ग्रहाचं असू शकेल.

हे लोन्ली (एकटे) ग्रह सन २००० मध्ये प्रथम नोंदले गेले. त्यानंतर स्पॅनिश आणि जपानी निरीक्षकांनाही 'एकल-ग्रह' दिसले. नंतर २००४ मध्ये अमेरिकन संशोधकांनीही त्यात भाग घेऊन वर्णपटाच्या आधारे त्याची निश्चिती केली. ताकाहिरो या जपानी खगोलभौतिकी संशोधकाने ओकासा विद्यापीठातील सहकाऱ्यांसह न्यूझीलँडच्या माऊंट जॉन वेधशाळेतून तसंच स्वतःच्या दुर्बिणीतून आकाशगंगेतील सुमारे ५ कोटी ताऱ्यांचं निरीक्षण केलंय. ते करताना त्यांना मायक्रोलेन्सिंग पद्धतीने सुमारे ४७४ एकल ग्रह सापडले. त्यातले १० गुरूच्या आकाराचे प्रचंड होते, परंतु या ग्रहांच्या 'जनक' ताऱ्याचा सुगावा लागला नाही किंवा मागोवा घेता आला नाही.अशा ग्रहांच्या शोधाची मायक्रोलेन्सिंग प्रक्रिया हा वेगळा विस्तृत विषय होईल. तज्ज्ञांशी चर्चा करून त्यावर सोप्या शब्दांत लिहावे लागेल. आपण सध्या एवढेच लक्षात ठेवू या की, आपला ग्रह सौर-कुटुंबाचा 'कुटुंबवत्सल' सभासद आहे,



# अहिंसा परमो धर्मः

परचक्र तेव्हाही होतं आणि आजही आहे. हिंसा तेव्हाही होती आणि आजही आहे. दुःखाचं चक्रव्यूह भेदता येत नाही. चिंध्यांच्या बाहुल्या नसतात, कोवळ्या मुली असतात शाळेत जाणाऱ्या. झाडं तोडली काय अन् शाळेवर बॉम्ब फेकला काय, चिवचिव मात्र कायमची थांबते. आपण केवळ अहिंसेच्या देवाचा धावा करू शकतो.

आपल्याकडे निखळ भक्ती तरी कुठे आहे? प्रेम कुठे आहे? परदु:खानं व्यथित होणारं मन कुठे आहे? म्हणून पदोपदी तुकोबा आठवतात.

संवसारे जालो अति दुःखे दुःखी,
मायबाप सेखी क्रमिलिया,
दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान,
स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली...

मृत्यू सारखा पाठलाग करीत असताना देवाचा ध्यास त्यांनी सोडला नाही. कुटुंब, गाव, प्रदेश, सर्वत्र मरणसावल्या पसरलेल्या; परंतु विठू माउलीची तीव्र ओढ होती. विरक्तीचा पिंड होता. मायेच्या विराट चक्रातून बाहेर पडायचं होतं.

बाइल मेली मुक्त जाली, देवे माया सोडविली, पोर मेले बरे झाले, देवे मायाविरहित केले, माता मेली मज देखता, तुका म्हणे हरली चिंता...

समाजासाठी हिताची गोष्ट सांगायची होती म्हणून वैयक्तिक दुःखाचा डोंगर काळजाआड दडवला त्यांनी. विरक्ती, भक्ती आणि नैतिकता होती म्हणून तुकोबांनी मुक्तीचा अनुपम्य सोहळा अनुभवला.

अहंकाराचा वारा लागू दिला नाही. विशेषत्वाला कायम नकार दिला. सामान्यत्व स्वीकारलं. नम्रता अंगीकारली. निःस्वार्थ सेवा केली.

निरपेक्ष भक्ती केली. मोहाचे धागे स्वहस्ते तोडले. 'मी'चं विसर्जन केलं. मग मी-तू पणाची बोळवण झाली. स्वतःकडे पाहतो, भोवतालाकडे पाहतो आणि तुकोबांच्या अलौकिक व्यक्तित्त्वाकडे पाहतो तेव्हा वाटतं आसक्तीच्या दलदलीतून बाहेर पडण्याची, विशेषत्वाच्या विळख्यातून निसटण्याची, अहंकाराच्या कैदेतून सुटण्याची किमान धडपड तरी करायला हवी.स्वतः शांततेनं जगावं आणि इतरांना त्यांच्या नैसर्गिक पद्धतीनं जगू द्यावं. मानवी जीवनाच्या यात्रेचं सूत्र बंधूभाव , मैत्र, सहभाव, आस्था आणि करुणा हेच हवं. सुखदुःखाची वाटणी करायची नसेल, विलगतेकडे झुकायचं असेल, तर ज्ञानोबा माउलींच्या वैश्विक बंधुभावाच्या आणि समतेच्या संदेशाचं विस्मरण झाल्यासारखं होईल. काळाच्या या बिंदूवर असं तर व्हायला नको.

# बोलीभाषेची समृद्धी
# बाणकोटी बोली

महाराष्ट्रातील कोकण पट्ट्यातील (रायगड व रत्नागिरी जिल्हा) एक प्रमुख ग्रामीण बोलीभाषा आहे, जी आगरी आणि मराठीच्या मिश्रणातून बनली आहे. मंडणगड, दापोली, खेड ते चिपळूण आणि मुरुड-माणगाव भागात (आगरी, कोळी, मराठा) ही राकट, पण गोड बोली बोलली जाते. एका बाजूला ही भाषा आगरी बोलीच्या खूप जवळची आहे, ज्यात अनेक शब्द आणि म्हणी सारख्याच आहेत. ही भाषा बोलणा?या व्यक्तीच्या बोलण्यात म्हणींचा वापर सर्रास आढळतो. बाणकोटी बोली ही भाषा आगरी बोली व मराठी भाषा यांच्या संगमातून तयार झाली आहे आगरी व बाणकोटीबोलींतील अनेक शब्दप्रयोग व बोलण्याचा सूर तसेच म्हणी सारख्याच स्वरूपाच्या आहेत. दोन्ही बोलींत 'ळ' अक्षरासाठी 'ल', 'मला' शब्दासाठी 'मना', करतो, देतो या शब्दांसाठी करतांव, देतांव हे शब्द वापरले जातात.

साधारणपणे अलिबाग, पेण, रोहा, खालापूर, मुरुड या भागांत 'आगरी' व 'बाणकोटी' या दोन्ही बोली सारख्याच प्रमाणात बोलल्या जातात. आगरी-





बाणकोटी या बोली बोलणारे लोक हे आगरी, कोळी, गवळी, क्षत्रिय मराठा, कुणबी या समाजातले असतात त्याप्रमाणे इतर जातिप्रवर्गातील तसेच जमातीतील काही लोक ही बोली बोलतात.

आदरार्थी संबोधनांच्या क्रियापदांना काहीसे वेगळे रूप देऊन किंचित सानुनासिक उच्चारात लोक ही बोली बोलताना आढळतात. जसे की- तुमचं नाव काय – तुमचां नांव काय, मला काय माहीत – मना काय/कय म्हाईत? ती मला जेवायला देते – ती मना ज्येवयला देते, या झाडाखाली बस – हे झाडाखाली बस.

बाणकोटी बोलीत शेवटचा शब्द अगदी ताणून बोलला जातो. त्यामुळे ऐकताना ही बोली काहीशी विनोदी वाटते. म्हणूनच हल्ली विनोदनिर्मितीसाठी अनेक कार्यक्रम व सादरीकरणात या भाषेचा वापर होतो. मालवणीच्या जवळ जाणारी ही बोली असेही म्हटले जाते. आगरी व कोळी समाजाची वस्ती असणा-या भागात हमखास ही बोली ऐकू येते. रत्नागिरी जिल्ह्यातही बरेच भागात ही बोली बोलली जाते. विशेषत खोत मराठा समाज आणि कुणबी समाजाच्या बाणकोटी बोलीत फरक आढळतो. राजापूर तालुक्यातील पठारी प्रदेशातील लोक बाणकोटी बोलीत

# बछड्याचा 'मोह'त्याग

बांधवगड आणि कुनो राष्ट्रीय उद्यानांच्या सीमावर्ती भागातील एका जंगलात अखिल भारतीय मार्जार कुळाची सभा सुरू झाली तेव्हा तिथे जमलेल्या वाघ व चित्त्यांचे चेहरे चिंताग्रस्त होते. वर्तुळाकार पद्धतीने भरलेल्या या सभेत मध्यभागी दीड वर्षाचा एक वाघाचा बछडा व बाजूला एक चित्ता मान खाली घालून बसलेले. त्या दोघांकडे रागाने बघून डरकाळी फोडत एका ज्येष्ठ वाघाने सुरुवात केलीष्ठ

'खूप विचार केल्यावर मी या मताशी आलो की बांधवगडमधील बछड्याचे मोहाच्या फुलांचे गाठोडे चोरण्याचे कृत्य पूर्णपणे गुन्हेगारी स्वरूपाचे आणि चोरीचा उद्देश अधोरेखित करणारे आहे. यामुळे आपल्या कुळाच्या प्रतिमेला जबर धक्का बसला असून प्रचंड बदनामी झाली. चोरलेल्या गाठोड्यातील मोहफुलांपासून वाघांनी दारू तयार केली व शिकारीचा आस्वाद घेत प्याली अशी चर्चा सर्वत्र सुरू झाली. बछड्याच्या या कृत्याने साऱ्या कुळाला मानवाच्या पातळीवर आणून ठेवले आहे. आपण हिंस्र असलो तरी नीतिमान आहोत.

नैतिकतेचे ढोल बडवून ती न



पाळणाऱ्या मानवात व आपल्यात हाच फरक आहे. माणूस आपला शत्रू नाही पण मित्रही नाही. त्यामुळे त्याच्या वाईट सवयी आपल्याला लागायलाच नकोत. आपल्या कुळात दारू वर्ज्य. 'मानव धैर्य एकवटण्यासाठी त्याचा आधार घेतो. आपल्यात निसर्गत:च हा गुण. भलेही या बछड्याने दारू गाळली नसेल पण मोहफुले चोरून तसा संशय मात्र निर्माण केला. त्यासाठी त्याचे पालकही तेवढेच जबाबदार. मानव असो वा आपण, मुलांकडे लक्ष ठेवणे, त्यांना वाईट सवयी लागू न देणे हे कर्तव्यच विसरून गेलेलो.

या वयात बछड्यांमध्ये कुतूहलमिश्रित भाव असतात. त्यातून त्याने हे कृत्य केले असेल हे मी समजू शकतो पण जगाला कोण सांगणार? त्याला भूक लागली असेल तर ती भागवण्याची जबाबदारी त्याच्या पालकाची. त्यांनी ती का पार पाडली नाही? आपल्या अधिवासात भरपूर सावज उपलब्ध आहेत. भूक लागल्याशिवाय आपण शिकार करत नाही. ती कितीही सपाटून लागली तरी दुसऱ्याची शिकार खात नाही. मग मानवाने गोळा केलेली मोहफुले चोरण्याचे कारण काय? शिकार ही जिवंत प्राण्यांची करायची असते हे या बछड्याला पालक कधी शिकवणार? भुकेपेक्षा जास्त गोळा करणे हा मानवाचा स्वभाव झाला, आपला नाही हे लक्षात ठेवा. अल्पसंख्य असलो तरी साऱ्या देशात आपल्याला मान आहे. त्याचा विचार करून वागा.

भविष्यात मानवाशी गाठ वारंवार पडणार. त्याच्याकडे त्रयस्थ नजरेनेच बघा. त्याच्या सवयी स्वत:ला चिकटवू नका.' एवढे बोलून ज्येष्ठ थांबला.

मग चित्त्याकडे वळून म्हणाला 'काय रे, माणसे मागे लागली म्हणून तुला पळ काढायची काय गरज होती? तुझे नाव वेगळे असले तरी कूळ एकच व या कुळाला पराक्रमाचा वारसा आहे, पळपुटेपणाचा नाही.

आफ्रिकेतून आला असलास तरी गेल्या काही वर्षांत तू भूधारकापासून भूस्वामी झाला आहे. येथे राहायचे असेल तर तुला कुळाचार शिकून घ्यावाच लागेल. मानव समोर आला वा मागे धावला तर हिंमतीने त्याला सामोरे जायचे. हे करताना स्वत:हून हल्ला करायचा नाही. तो घाबरून पळून जाईल असे वर्तन करायचे. आता परदेशीपण विसरा व स्वदेशी असल्यासारखे वागायला शिका. चला निघा सर्व आपापल्या अधिवासात.' हे ऐकताच सारे पांगले. दुसऱ्या दिवशी बछड्याने चोरलेले